# खान-बंधू

९८३६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय — नाटक
सं. नं. २८८

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. चरित्र ८२०
ता. २१/८/३५
ठाणें.

RLFBK-0005450

प्रेमा कंटक, बी. ए.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,—पुष्प १३ वें.

# खानबंधूंचा अल्प परिचय

[ श्री. महादेवभाई देसाई यांनीं लिहिलेल्या
'बे–खुदाई–खिदमतगार'
या गुजराथी पुस्तकाचा अनुवाद. ]

REFBK-0005450

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५४५०

ठाणें.


प्रेमा कंटक, बी. ए.

ऑगस्ट. १९३६ ]

[ मूल्य ९ आणे.

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,
२९१ शनवार, पुणें २.

मुद्रक :
शंकर दत्तात्रय जावडेकर,
'लोकशक्ति' प्रेस, २९१ शनवार, पुणें २.



खान अबदुल गफ्फारखान उर्फ सरहद्द गांधी

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
नं. नं.
ता.

# प्रस्तावना

खुदाई खिदमतगार एक ऐसी पुस्तक है जिसका अनुवाद हिंदकी सब भाषामें होना चाहीये. गूजराती, उर्दु, हिंदीमें तो होही गया है. संभव है दूसरी में भी होगा. उचितही है कि अब मराठी में भी अनुवाद नीकला है. और अधिक हर्षकी बात यह है कि यह अनुवाद एक सेविकाने किया है. इस शुभ प्रयत्नके लिये उसको धन्यवाद. मेरी आशा है महाराष्ट्रकी जनता दो खुदाई खिदमतगार अर्थात् ईश्वरभक्त के चरित को प्रेमसे पढेंगे.

मोहनदास गांधी.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १८ | शिलतापासून | शिला तासून |
| ७ | २ | ( राष्ट्रसंघांत ) | हे शब्द नकोत. |
| ,, | ३ | जिनीवांतसुद्धां | जिनीवांतसुद्धां (राष्ट्रसंघांत) |
| ,, | ४ | विचार | विचार करीत |
| ९ | ११ | मुसलसान | मुसलमान |
| १० | ८ | पुष्कळच | पुष्कळ |
| १२ | ७ | कराचाली | कराचीला |
| ,, | १७ | सहज | सहन |
| १४ | १८ | रोमहर्षक | रोमहर्षण |
| १५ | ९ | कांहीं आमच्या | आमच्या कांहीं |
| १६ | १२ | दुधानंतर | दुधांत तर |
| १८ | २५ | एप्रिलच्या | एप्रिल |
| १९ | ३ | देण्याचा | देण्याचा त्यानें |
| २० | २० | कुटुंबीयांतील | कुटुंबांतील |
| २१ | टीप ओळ १ | वरून | वरून किताब |
| २६ | | प्रकरण ५ वें, संस्कार (२) असा मथळा हवा. | |
| २७ | ९ | व त्याचप्रमाणें | त्याचप्रमाणें |
| २८ | शेवटली | होते | होत |
| ५१ | ,, | तरी | तरी पण |
| ५२ | १ | पण | हा शब्द नको. |
| ५६ | ७ | भाषणांत | भाषणांतील |
| ८१ | २२ | वाता | वार्ता |

मराठी ग्रंथ संग्रहालय. स्थल प्रत सं. ... नं. ... ता. ...

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | पान |
|---|---|---|
| १ लें | हा प्राचीन प्रदेश | १ |
| २ रें | नवा इतिहास | १० |
| ३ रें | बहेरामखान | १५ |
| ४ थें | संस्कार १ | २१ |
| *५ वें | संस्कार २ | २६ |
| ६ वें | त्यांचे धर्म | ३२ |
| ७ वें | खुदाइ खिदमतगार | ४२ |
| ८ वें | आरोपाची छाननी | ५४ |
| ९ वें | इंग्रजांनीं एवढें तरी समजून घ्यावें | ५९ |
| १० वें | सर्वच कुटुंब कैदेंत | ६८ |
| ११ वें | ईश्वराचे सेवक | ७४ |
| १२ वें | वर्ध्यांतील घरांत | ८१ |
| १३ वें | परत आपल्या खऱ्या घरीं | ८६ |
| १४ वें | असाधारण निष्ठा | ८९ |


---

* शुद्धिपत्र पहाणें.

# प्रकाशित झालेले ग्रंथ

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १–२ | सत्याचे प्रयोग अथवा महात्मा गांधींचें आत्मचरित्र खंड १ व २ | २–०–० |
| ३ | खादी-मीमांसा ( शिल्लक नाहीं ) | |
| ४ | स्वराज्यशिष्टाई | ०–६–० |
| ५ | संयम कीं स्वैराचार | ०–८–० |
| ६ | हिंडलग्याचा प्रसाद | ०–९–० |
| ७ | हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना | १–०–० |
| ८ | उपनिषदांतील दहा गोष्टी | ०–६–० |
| ९ | विद्यार्थी–जीवन | ०–८–० |
| १० | फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास | १–०–० |
| ११ | काँग्रेसचा इतिहास | २–०–० |
| १२ | समाजवादच कां ? | ०-१०-० |
| १३ | सोशॅलिझम अथवा समाजवादाचा ओनामा | १–०–० |
| १४ | महात्माजींचीं पत्रें | ०–४–० |
| १५ | वैभवशाली हिंदुस्थान | ०–६–० |
| १६ | सरहद्द गांधींचें चरित्र ( नुकतेंच प्रसिद्ध झालें ) | ०–९–० |

पत्ता—सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,
२९१ शनिवार, पुणें २.

# खानबंधूंचा अल्प परिचय

## प्रकरण पहिलें

### हा प्राचीन प्रदेश

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
धा. क्र. ५४४०

कविवर रवींद्रनाथांच्या एका गोष्टींत नदीचा घाट आपली कहाणी पाणी भरण्यास आलेल्या एका बाईला सांगतो. काकासाहेब कालेलकर यांनीं सुद्धां अशाच काव्यमय प्रकारानें अनेक नद्यांच्या तोंडून त्यांचा इतिहास वदविला आहे, अथवा अनेक नद्यांच्या किनाऱ्यांवर पाणी भरण्यास आलेल्या स्त्रियांचे अनेक अवतार घेऊन त्या त्या नद्यांचा इतिहास स्वतः सांगितला आहे. अशाच रीतीनें सरहद्द प्रांतांतील लहानग्या नद्या–स्वात व कुरम–आणि सिंधु नदाला मिळणाऱ्या दुसऱ्या कित्येक–जर आपला इतिहास सांगूं शकतील तर तो नवरंगी व नवरसपूर्ण होईल. तसा बहुधा इतर थोडयाच प्रांतांतील नद्यांना सांगतां येईल.

सरहद्द प्रांत आमच्या देशाच्या वायव्य दिशेकडील मुख्य द्वार. त्या दिशे-कडून येणाऱ्या प्रत्येक इसमास ह्या द्वारांतूनच प्रवेश केला पाहिजे. म्हणून "पुण्यपीयूषस्तन्यवाहिनी" "भुवनमोहिनी" अशा आपल्या पृथ्वीप्राचीन भारतमातेचा इतिहास जितका प्राचीन, तितकाच मातेच्या या पुरद्वाराचा इतिहासही प्राचीन आहे. परंतु या द्वारभूमीनें जितक्या प्रजेचे पदाघात सहन केले आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही भागानें सहन केले नाहींत. यामुळें सरहद्द प्रांताइतका विविधतेनें भरलेला इतिहास क्वचितच दुसऱ्या कोठल्याही प्रांतांचा असेल. त्याचें वर्णन काकासाहेबांसारखा कोणी कवि इतिहासकारच लिहूं शकेल. पण असा इतिहास लिहिण्याचें हें स्थळ नव्हे; या भूमींत निपजलेल्या दोन रत्नांचा परिचय करून देण्यापुरतीच या भूमीची

कथा मला लिहावयाची आहे, तेव्हां माझें काम सोपें आहे. " अटक ते कटक-पर्यंत " हा शब्दप्रयोग सर्वांच्या तोंडीं असतो, तथापि अटक व कटक हीं भूगोलांत कोठें आहेत, याची माहिती तो प्रयोग वापरणारांना क्वचितच असेल; तरीपण कटक आपल्या देशाचे पूर्वेकडील टोंक व अटक हें पश्चिमे-कडील टोंक, इतकें लोकांस ठाऊक आहे. सिंधु नदीवर बांधलेला अटक-चा पूल ओलांडून पश्चिमेकडे गेलें म्हणजे पंजाबची हद्द पुरी होते व सरहद्दीचा मुलूख सुरू होतो. " सर-ए-हिंद "—हिंदुस्थानाचें मस्तक अथवा टोंक—याचा संक्षेप 'सरहद्द' असा झाला. सरहद्द म्हणजे 'सीमा' हा अर्थ आपण केव्हांपासून समजूं लागलों हें सांगणें अवघड आहे. परंतु प्राचीन भारताचा आरंभ या सीमेपासून होत नव्हता तर थेट आजच्या अफगाणिस्तानच्या पलीकडे बलखपर्यंत त्याची व्याप्ति होती. प्राचीन आर्य या रस्त्यानें आर्यावर्तांत आले असावे. महाभारतांतील गांधारी या भागांतील गांधार म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रदेशांतून आलेली होती. आज आपल्या देशी भाषांहून फारच भिन्न वाटणाऱ्या पठाणांच्या पुश्तो* भाषेशीं आर्यांच्या संस्कृत भाषेंतील अनेक शब्द मिळते आहेत. प्राचीन वेदकालांतील अथवा त्यानंतरच्या महाभारतकालांतील अवशेष येथें सांपडतात किंवा नाहीं त्याबद्दल फारशी माहिती नाहीं. वेदकालांतील स्थापत्य सर्व कांहीं लांकडी होतें. मग वैदिक अवशेष राहतील कोठून ? शिलातापासून मूर्ति बनविण्याची कला सरहद्द प्रांतांतच विकास पावली असावी व तशा लोकांची मोठी वस्ती जेथें जमली

---

* काकासाहेब म्हणतात कीं, 'पुश्तो' भाषा संस्कृत भाषेची अपभ्रष्ट जी " पैशाची " भाषा, तिच्यापासून उद्भवली असावी. अमरकोषांत निर्दिष्ट असलेल्या देवयोनि जातींपैकीं पिशाच्च जाति ही एक होती; त्यांची भाषा " पैशाची " या नांवानें ओळखली जाई. पैशाची व्याकरण जवळ जवळ शौरसेनीसारखेंच आहे. पैशाची शब्द सिंधी व प्राचीन मराठी भाषेंतील शब्दांशीं मिळते आहेत. महाकवि गुणाढ्याची बृहत्कथा हीदेखील पैशाची भाषें-तच प्रथमतः लिहिली गेली. ही पैशाची भाषा सिंध ते हिंदुकुशपर्यंत प्रचारांत होती, तिच्या शेजारीं दरदांची भाषा चालत असे. शक व काश्मिरी यांच्याही भाषा जवळच होत्या. या सर्व भाषांचे संस्कार पुश्तोवर झाले असले पाहिजेत.

त्या स्थानास ‘ तक्षशिला ’ हें नांव मिळालें असलें तर आश्चर्य नाहीं. इराणचा डरायस राजा इ. स. पूर्वी सहाव्या शतकांत या भागावर राज्य करीत होता, तेव्हांपासूनचा इतिहास थोडाबहुत सांपडतो. इ. स. पू. चौथ्या शतकांत शिकंदरानें भारतावर आक्रमण केलें. तो स्वतः विजेसारखा आला व विजेसारखा गेला, परंतु त्याचेबरोबर जी यवन संस्कृति आली ती जवळ जवळ दोन शतकें या प्रदेशांत टिकली असें म्हणतां येईल. यानंतर चक्रवर्ती अशोकानें बौद्ध धर्माची पताका चहूं दिशांस फडकाविली तेव्हां सरहद्दीच्या भागावर बौद्ध संस्कृतीचा परिणाम पुष्कळच झाला. बौद्ध संस्कृतीच्या मुळांतच ‘ निर्वैर ’ शांति होती, अर्थात् तिच्याबरोबर विद्याकलांचे संस्कार आले आणि तक्षशिलेसारखें मोठें विद्यापीठ निर्माण होऊं शकलें. येथें पुष्कळ ठिकाणीं सांपडणाऱ्या ग्रीक नाण्यांतून व तत्कालीन अवशिष्ट इमारती आणि पडकीं घरें यांतून ग्रीक ( यवनी ) संस्कृतीचा ठसा दिसून येतो; तद्वतच बौद्ध भिक्षूंचे विशाल विहार व स्तूप आणि अशोकाचे शिलालेख यांमधून बौद्ध संस्कृतीचें दर्शन होतें.

कलकत्त्याच्या प्रसिद्ध म्युझियममध्यें—पुरातत्त्व संग्रहालयांत एक विस्तृत विभाग गांधार देशांतील स्थापत्यानें भरलेला आहे. स्थापत्यकलेच्या इतिहासांत गांधार—स्थापत्याला महत्त्वाचें स्थान मिळालें आहे. या विशाल विभागांत भगवान् बुद्धाच्या अनेक मनोहर मूर्ति व जातक कथांतील अनेक प्रसंग दाखविणाऱ्या शिला आहेत. पुरातत्त्वाचा अभ्यास करणाऱ्याला या दालनांत तासन्‌तास घालवावे असें वाटेल, आणि पेशावरच्या आसपासच्या प्रदेशांतून सांपडलेले अनेक नमुने पाहून त्या काळच्या गांधार देशाच्या संस्कृतिसौंदर्यानें तो मुग्ध होईल. डॉ. बार्नेटच्या पुस्तकांत गांधार—स्थापत्याचा एक नमुना देण्यांत आला आहे तो मीं कलकत्त्यांत पाहिलेला मला आठवत नाहीं. पण त्यांत शिबि राजाच्या अपूर्व आत्मबलिदानाचा प्रसंग कोरलेला आहे—ससाण्यापासून पारव्याला वांचविण्यासाठीं एक महान् भूपति आपल्या मांसाचा तुकडा देत असलेला—आपला प्राण तोलून देत असलेला—दाखविला आहे. अखिल प्राणिमात्रांत अभेद दाखविणारी ही संस्कृति एका काळीं जेथें होती तोच आजमितीचा वायव्य सरहद्दीवरील प्रांत असेल किंवा नाहीं याविषयीं आपणांस साहजिक शंका वाटते. पण या प्राचीन संस्कृतीचाच हा प्रदेश आहे याविषयीं लेशमात्र शंका नाहीं.

जनरल मॅकमन म्हणतात:—“काबूलजवळ आणि आपल्या सरहद्दींत बन्नुजवळ आकराचेपुढें पडक्या इमारतींतून ग्रीक नाण्यांचे ढीग सांपडतात, पेशावरच्या उत्तरेस स्वात नदीच्या खोऱ्यांत ग्रीक व बौद्ध काळांतील अवशेष असंख्य आहेत, दगडावरील फारच सुंदर नकशीकाम पाहण्यांत येतें, ग्रीक गायिका व नर्तकी यांच्या दगडांत कोरलेल्या आकृति दिसून येतात[१]......... तक्षशिलाजवळील खोऱ्यांत दिसून येणारे बौद्ध विहार कुशल व अद्भुत नकशीकामाचे आश्चर्यकारक नमुने समजले जातात[२]......वायव्य सरहद्दीचा विचार करीत असतां केवळ धर्मवेड्या आडदांड मुसलमान लोकांच्या टोळ्यांची वस्ती असलेल्या बर्फानें भरलेल्या किंवा उन्हांत तापणाऱ्या डोंगरी प्रदेशाची आपण कल्पना करतों पण तें बरोबर नव्हे. या प्रदेशांत प्राचीन बौद्ध संस्कृतीचे किती तरी अवशेष आहेत व बौद्ध व ग्रीक पुराणवस्तूंचें पुष्कळच साहित्य भरलें आहे. त्याचा पुरतेपणीं शोध देखील अजून झाला नाहीं. आजच्या काळांत तेथें लुटारू थैमान घालीत असले व प्रदेश उध्वस्त करीत असले तरी एके काळीं याच प्रदेशांत विहार व मंदिरें यांत पद्मासनें घालून अनेक भिक्षु, तपस्वी व ऋषी यांनीं असंख्य बालशिष्यांना उपदेश केला असेल, तपश्चर्या केली असेल, ईश्वराचें ध्यान केलें असेल[३]- - -आज देखील पंजाबच्या पश्चिमेस आणि सरहद्दीवरील टेंकड्यावर फिरणाऱ्या पुष्कळ देखण्या मुलांचा ग्रीक लोकांसारखा तोंडवळा दिसून येतो.”[४]

या संस्कृतीनंतर कांहीं काल तेथें संस्कृतीचा लोप झाला असें म्हटलें तरी चालेल. नंतर इस्लामी संस्कृति आली. तातार लोकांपैकीं पुष्कळजण हिंदु-बौद्धांत मिसळून गेले आणि शेवटीं खिस्तानंतर आठव्या शतकांत आलेल्या इस्लामी हल्ल्यांना बळी पडले. तत्कालीन हिंदूंनीं या नवीन संस्कृतीचें कसें

---

१. जनरल सर जॉर्ज मॅकमन, “ध रोमान्स ऑफ धि इंडिअन फ्रॉंटिअर्स” पृष्ठ ६२.

२. कित्ता पृष्ठ ६४.

३. जनरल सर जॉर्ज मॅकमन. “ध रोमान्स ऑफ धी इंडियन फ्रॉंटियर्स” पृष्ठ ५८.

४. कित्ता पृष्ठ ६३.

गोंद नं.



मराठी ग्रंथ संग्रहालय स्थलप्रत

काय स्वागत केलें त्याचा इतिहास आपणांस फारसा माहीत नाहीं. पण अकराव्या शतकांत गझनीचा महंमूद स्वारी करून आला तेव्हांपासून या प्रदेशांत इस्लामी संस्कृति प्रविष्ट झाली. हिंदु लोक या प्रदेशांतून हटून आंतल्या भागांत पसरत चालले. सरहद्द प्रांतांचे द्वारपाल म्हणून मोजके हिंदु राहिले खरे; परंतु त्यांपैकीं बहुतेक नित्य चाल करून येणाऱ्या इस्लामी प्रजेंत मिसळत गेले.

अफगाण, घोरी, खिलजी व शेवटीं मोंगल आले. १८ व्या शतकापर्यंत मधून मधून सरहद्द व अफगाणिस्तान यांवर मोंगलांचा ताबा असे. औरंगजेबा-नंतर गादीवर येणारा बहादूरशाह औरंजेबाच्या मृत्युकाळीं काबूलचा सुभेदार होता.त्यानें आपल्या बापाच्या नांवानें थोडीं वर्षे राज्य केलें;नंतर मारामारी व कापा-कापी सुरू होऊन महंमदशाहाच्या २९ वर्षांच्या नामधारी अमलानंतर १७४८त मोंगल सत्तेचा अंत झाला. तरीसुद्धां १८५७ पर्यंत नामधारी बादशाह होता. महमदशाहाच्याच कारकीर्दींत इराणच्या नादिरशहाची स्वारी आली व त्या-बरोबरच काबूल आणि पंजाब दिल्लीच्या अमलाखालून इराणच्या ताब्यांत गेले. त्यानंतर अफगाण अहमदशाह अबदाली चाल करून आला; त्यानें सिंध, मुलतान, पेशावर, हझारा, काश्मीर, कंदाहार, काबूल आणि गझनी यांचें अफगाण राज्य बनविलें. पानिपतच्या १७६१ च्या लढाईत मराठ्यांचा इतिहासप्रसिद्ध पराभव झाल्यानंतर हा प्रदेश अहमदशहानें शाहआलम मोंगल बादशहास नांवापुरता भेट म्हणून दिला, पण तो मरून थोडीं वर्षे झालीं नाहींत तोंच शीख प्रबळ झाले आणि लाहोरचा सुभेदार रणजितसिंग यानें अफगाणांना हिंदुस्थानांतून घालवून देऊन १८२० मध्यें पेशावर व नंतर कोहाट व बन्नु आणि डेरा इस्माईलखान हे प्रदेश सर केले. परंतु रणजित-सिंगानंतर शीख सत्ता अस्तंगत झाली व ब्रिटिश सत्ता सार्वभौम बनली. शीख व अफगाण, अफगाण व ब्रिटिश, ब्रिटिश व शीख, याप्रमाणें पुष्कळ तिरंगी सामने झाले. आणि अखेरीस १८४९ त आज ज्याला सरहद्द प्रांत म्हणतात तो सर्व प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यांत आला.

हा सरहद्द प्रांत म्हणजे उत्तरेस सिंधु नदाच्या किनाऱ्यावर असलेल्या अटकच्या किल्ल्याच्या उत्तरेकडील डोंगराळ हझारा जिल्हा; आणि नंतर अटकपासून थेट दक्षिणेस डेराफ ते हखानपर्यंत सिंधु नदामुळें बनलेली पूर्व सीमा

व पश्चिमेस पर्वतांमुळें बनलेली पश्चिम सीमा यांच्यामध्यें आलेले चार जिल्हे—पेशावर, कोहाट, बन्नु आणि डेराइस्माइलखान. परंतु या प्रदेशाहून जवळ जवळ दुप्पट प्रदेश आफ्रिडी, मोहंमद, वझीरी या अर्धवट स्वातंत्र्य भोगणाऱ्या डोंगरी टोळ्यांच्या ताब्यांत आहे, त्यांचीं नांवें आपण पुष्कळवेळां वर्तमानपत्रांतून येणाऱ्या सरहद्दीवरील बातम्यांत वाचतों. या डोंगरी टोळ्यांस जिंकण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें सन १८४९ पासून आजपर्यंत अनेक हल्ले केले, आणिं अजूनही ते पूर्ण झाले नाहींत हें आपणांला वर्तमानपत्रांवरून माहीत आहे. सन १८४९ ते १९०२ पर्यंत ५६ हल्ले झाले असें इम्पीरियल गॅझेटियर म्हणतें. १९०२ नंतरचे आंकडे मिळत नाहींत, त्याचप्रमाणें हिंदी लष्कराचा यांत किती फन्ना आला त्याचाही हिशोब मिळत नाहीं. या हल्ल्यांपायीं किती खर्च झाला असावा त्याचा अंदाज एकाच आंकड्यावरून कळून येईल. १८८२ पासून १८९१ पर्यंतच्या ९ वर्षांतच १३ कोट रुपये खर्च आले होते व त्यानंतर तर पुष्कळच खर्चाचे हल्ले झाले.

या हल्ल्यांसंबंधीं सरकारचे एक प्रतिनिधि जनरल सर जॉर्ज मॅकमन् हे लिहितात. “ पहिली अफगाण लढाई ज्या कारणामुळें झाली त्याच कारणामुळें दुसरी लढाई झाली. तें कारण असें कीं, अफगाणिस्तानाला संपन्न व स्नेही शेजारी बनवून रशियाच्या नव्हे तर आपल्या प्रभावाखालीं येईल असें करणें.” हेच लेखक पुढें लिहितात, “ पहिल्या पंधरा वर्षांत करण्यांत आलेले लहान मोठे अनेक हल्ले या पहाडी लोकांना **आपल्या सत्तेची कल्पना आणून देण्यासाठीं** आपण त्यांच्यावर स्नेहभावानें शेजारी या नात्यानें सत्ता चालवूं अशी त्यांना खात्री देण्यासाठींच होते.”

यानंतर हाडवैर वाढत गेलें. खुद्द १९३२ त जनरल सर मॅकमन लिहितात, “ या पहाडी लोकांना ताब्यांत आणून त्यांचीं शस्त्रें काढून घेणें व सर्व मुलूख सर करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे दीर्घकालीन रक्तपात आणि द्वेष यांचें बीज पेरणें होय. अनेक ब्रिटिश, हिंदी आणि पहाडी लोकांचे प्राण घेऊन व हिंदी प्रजेच्या कराचा पैसा खर्च करूनच हें करतां येईल.”

असें असूनही हाडवैर ओसरलें नाहींच खुद्द १९३५ मध्यें पुष्कळच रक्तपात झाला हें आपणांस विदित आहेच. जनरल मॅकमन लिहितात, “राझमाकमध्यें एका उंच ठिकाणीं एक दारूगोळ्याची जागा बांधण्यांत आली

आहे, तेथून कोणाही मलेकाच्या बुरजावर किंवा कोणाही मुल्लाच्या मशिदीवर, तोफेंतून दारूगोळ्यांचा वर्षाव करून ( राष्ट्रसंघांत ) त्यांना ताकीद देतां येते."

विमानांतून बाँब फेंकण्याच्या चालीवर–जिनीवांतसुद्धां चर्चा झाली आहे. जनरल सर मॅकमन या चालीचा नैतिक दृष्टया विचार नाहींत, पण त्याच्या उपयुक्ततेची चर्चा करतांना लिहितात, "या प्रश्नाचा निकाल करण्याचे कामीं वैमानिक दल उपयोगास येत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. प्रश्नाचा निकाल होईल अशी आशा होती. पण हुप् करून अचानक दृष्टिगोचर होणाऱ्या व फिरून टेंकडयांतून लुप्त होणाऱ्या पहाडी लोकांवर बाँबचा म्हणण्याजोगा कांहींच परिणाम होत नाहीं; मशीनगन चालवूनदेखील खडक आणि टेंकडयांतून रहाणाऱ्यांपैकीं कोणालाच गोळे लागत नाहींत.........शिक्षा म्हणून बाँब फेंकण्यांत आले तरी त्याचाही कांहींच परिणाम होत नाहीं असें दिसून आलें. ताकीद दिल्याशिवाय बाँब फेंकावे तर ( निर्दोष ) बायकामुलांचा संहार होतो; आणि ताकीद देऊन बाँब फेंकावे म्हणजे अकलेचें खोबरें झालेंच. कारण पाव घटकेंतच सर्व कोठल्या कोठें पळून जातात. आणि वर्षांतून सहा महिने तर या पहाडी टोळ्या गुहांतूनच रहातात."

सर मायकेल ओडवायरच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'सरकारच्या बलवान व महान बाहूचा' प्रसाद सरहद्द प्रांतास द्यावयाची ही पद्धति अजूनही चालू आहे. याहून उलट म्हणजे प्रेम व मैत्री यांच्या धोरणाचा प्रयोग अजून झाला नाहीं.

दीनबंधु अँन्ड्रयूज यांनीं 'मँचेस्टर गार्डियन' पत्रास एक पत्र पाठविलें होतें, त्यांत त्यांनीं एक उदाहरण देऊन या प्रेमाच्या व मैत्रीच्या धोरणाचा प्रयोग अजमावून पाहाण्यास ब्रिटिश सरकारला आग्रह केला होता. तें उदाहरण असें–" डॉ. पेनल नांवाचा एक डॉक्टर पुष्कळ वर्षांपासून सरहद्द प्रांतांत एक महान परोपकारी दुःखमोचक म्हणून प्रसिद्ध होता. एकदां एका टोळीचा नायक फार आजारी पडला. त्याला पाहण्यासाठीं त्याला सरहद्द ओलांडून जाण्याची विनंति करण्यांत आली. प्रांताच्या लष्करी अमलदारानें त्याला सांगितलें कीं, 'तुम्हांला लष्करी सोबत देतों, तिच्याबरोबर जा.' पण डॉ. पेनल यांनीं थट्टेनें उत्तर दिलें. 'नाहीं रे बोवा, लष्करी सोबत घेऊन जाईन तर उलटा मी लौकरच मरण पावेन. कोणत्याही प्रकारच्या लष्करी बंदोबस्ता-

शिवाय जाईन तर कोणी माझ्या वाटेस जाणार नाहीं. लष्करी बंदोबस्ताखालीं जाईन तर ते सरहद्दीवरचे लोक चवताळून माझा जरूर प्राण घेतील.' पण हें सांगत असतांना, 'आपल्या केंसासही धक्का पोंचणार नाहीं अशी त्याची खात्री होती. कारण तो अंधेऱ्या रात्रींसुद्धां सरहद्दीवरील लोकांची शुश्रूषा करण्यास जात असे. तो गेला तरी त्याला कांहींच इजा पोंचली नाहीं. कित्येक वर्षें सेवा केल्यानंतर या भल्या डॉक्टरास एका पठाणावर शस्त्रक्रिया करीत असतांनाच कसल्याशा रोगाचा संसर्ग लागला व तो मरण पावला. " दीनबंधु म्हणतात कीं या प्रेमाच्या व मैत्रीच्या नीतीचा मोठ्या प्रमाणावर प्रयोग करण्यांत आला नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे.

पठाणांकडे थोड्याशा तटस्थ वृत्तीनें पहाणाऱ्याला पठाणाबद्दल आदर वाटल्यावांचून राहात नाहीं. मि. रॅम्से मॅकडोनल्ड थोड्या वर्षांमागें हिंदुस्थान पहाण्यास आले होते त्या वेळीं सामान्य पठाणाची त्यांच्यावर जी छाप पडली तिचें सुंदर वर्णन त्यांनीं दिलें आहेः—

" तो तुमच्यासमोर ताठ उभा राहून डोळ्याला डोळा भिडवील आणि तुम्ही त्याची जितकी पर्वा कराल तितकीच तो तुमची करील. त्याचें स्मित सुरेख असतें. त्याचें मुख एखाद्या रमणीसारखें मनोहर असतें. घटकेच्या चकमकींत प्राणास मुकावें लागतें हें त्याला माहीत असल्यामुळें मृत्यूला मुठींत ठेवून तो फिरत असतो. आणि या जगापलीकडे त्याची नजर लागली आहे असेंच वाटतें. चालतां चालतां मैत्री करून मिळेल ते खाण्यांत त्याला संतोष वाटतो. त्याला प्राणांची पर्वा नसते. तो खेळाडू आहे. इंग्लंड व स्कॉटलंड संयुक्त झाल्यापासून या दोन्ही देशांच्या सरहद्दीवरील पहाडी लोकांचे पराक्रम आपणांस ऐकूं येत नाहींत, पण त्यानंतर त्यांच्याशीं तुलना करतां येईल असा एक पठाणच काय तो आपणांस माहीत आहे. उन्मत्तांतील उन्मत्त ॲंग्लो-इंडियनची देखील त्याचा अपमान करण्याची मगदूर नाहीं. गोऱ्यांना त्याच्या मर्दुमकीबद्दल फार आदर वाटतो व ते त्याला आपल्या बरोबरीचा समजतात. "

मृगयापटु सर मायकेल ओडवायर आपला एक अनुभव सांगतात. " एके दिवशीं एका जबरदस्त रानडुकराच्या मागें आम्ही लागलों आणि दौडत दौडत थेट एका नदींतील रेताड, उंच गवत वाढलेल्या, निसरड्या प्रदेशांत

गेलों. आम्ही घोड्यावर होतों, तो आम्हांला हुलकावणी देत होता, मी त्याला जखमी करण्यास पुढें जात होतों. इतक्यांत मीं एका पठाणास पाहिलें. त्यानें त्याचे मागले पाय पकडले व त्याला डांबून ठेविलें. मीं ओरडून म्हटलें, " गड्या, सोड त्याला, तुझ्या पोटांतील आंतडीं बाहेर काढील तो ! " अतिशय शिताफीनें त्यानें त्याला जाऊं दिलें आणि आपण परत झाडींत घुसला. मीं रानडुकराला भाल्यानें जखमी केलें, पण मरण्यापूर्वीं त्यानें माझ्या सोबत्यावर हल्ला केला. त्याच्या घोड्याला घायाळ केलें व सोबत्याला खालीं पाडलें. शेवटीं डुक्कर मेला. पण एवढ्या हिंमतीनें त्याचे दोन्ही पाय पकडणाऱ्या त्या पठाणाची ओळख करून घ्यावी असें मला वाटलें. थोडा वेळ त्याचा पत्ता लागला नाहीं. तो जितका कुशल शिकारी होता तितकाच कर्मठ मुसलमान होता. डुकराला शिवल्यामुळें त्याला विटाळ झाला म्हणून तो स्नान करण्यास नदीवर गेला होता. मी त्याला बक्षिस म्हणून कांहीं रुपये दिले. पण ज्या अपूर्व शौर्यासाठीं मी त्याला बक्षिस दिलें त्या शौर्याची त्याला कसलीच किंमत नव्हती. "

या छोट्या पुस्तकांत एका नवीन क्षेत्रांत असेंच शौर्य उत्कृष्टपणें दाखविणाऱ्या आणि दीनबन्धु अँन्ड्र्यूज यांनीं मागें वर्णिलेल्या प्रेम आणि मैत्रीच्या प्रयोगाचा परिचय करून देणाऱ्या, दोन भक्तिपरायण वीर पठाणांचें जीवनचरित्र संक्षेपानें सांगण्याचा हेतु आहे.

# प्रकरण दुसरें

## नवा इतिहास

बिहारच्या भूकंपामुळें किती ठिकाणीं स्थळाचें जळ व जळाचें स्थळ असे चमत्कार घडून आले, ते आतां सर्व लोकांना माहीत झाले आहेत. असें संकट आपल्या दृष्टीसमोर साक्षात् उभें राहिलें म्हणजे आपणांस त्याचें सत्यस्वरूप कळून येतें. हीच गोष्ट आपल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या बाबतींतही मोठ्या प्रमाणांत खरी आहे. तें युद्ध म्हणजे एक भूकंपच होता, असें म्हटलें तरी चालेल. फक्त प्राकृतिक भूकंप क्षणमात्र प्रकट होऊन तावडतोब शांत होतो; मागून त्याचे अवशेषच बाकी राहतात. परंतु राजकीय भूकंप क्षणिक नसून चिरस्थायी असतात आणि पुष्कळच वेळां त्याचे परिणाम प्राकृतिक भूकंपापेक्षां अधिक चिरस्थायी होतात. देशाला व्यापून टाकणाऱ्या या राजकीय भूकंपानें भारतवर्षाला इतकें घुसळून काढलें कीं, अनेक वर्षें खोल पाळेंमुळें पसरून कायम होऊन बसलेल्या अनेक संस्था ढांसळल्या व अनेक जमिनदोस्त होण्याच्या पंथाला लागल्या. तरी देखील प्राकृतिक भूकंपानें केलेली नासधूस जितकी असह्य असते तितकी या अहिंसक भूकंपाची नसते हें आपणांस माहीत आहे.

या दोन्ही भूकंपाची तुलना इच्छा असल्यास अधिक लांबवितां येईल; परंतु या प्रसंगीं फक्त एकाच गोष्टीची तुलना करणें प्रस्तुत होईल. प्राकृतिक भूकंपामुळें अनेक जलस्थलांची उलटापालट होऊन जाते तशीच गोष्ट आपल्या राजकीय भूकंपामुळें घडून आली नाहीं काय? बारडोली आणि चोरीचोरा हीं नांवें २० वर्षांपूर्वी कोणास माहीत होतीं? चिरलापेरला, बोरसद आणि वेदारण्य हीं तरी कोणास ठाऊक होतीं? दांडी, धारासना, वडाला, शिरोडें यांचीं नांवें त्या त्या गांवांत राहणाऱ्या मूठभर लोकांशिवाय इतरांस अज्ञात होतीं. पण भविष्यकालांत हिंदुस्थानचा इतिहास लिहिणाऱ्याला हीं व अशींच दुसरीं अनेक नांवें अज्ञात राहून कसें चालेल? नकाशावर यांच्या खुणासुद्धां

मराठी ग्रंथ संग्रहालय



कदाचित् दिसून येणार नाहींत, तरी देखील इतिहासांत त्यांचीं नांवें झांसी आणि पोर्ट आर्थर यांच्याप्रमाणें मोठ्या योग्यतेला चढतील.

हीं ठिकाणें वीस वर्षांपूर्वीं अगदींच अप्रसिद्ध होतीं, त्याचप्रमाणें गेल्या प्रकरणांत ज्याचें दिग्दर्शन केलें आहे तो सरहद्द प्रांत देखील त्यांच्यापेक्षां अधिक प्रसिद्ध नव्हता. १९३० मध्यें व त्यानंतरच्या वर्षांत आपण या प्रांताबद्दल पुष्कळच ऐकलें व जाणलें आणि अजून देखील अज्ञात असें पुष्कळच राहिलें आहे. तरी पण आपल्या राष्ट्रशरीराचें हें एक अमूल्य अंग आहे असें १९३० पूर्वीं कोणाला माहीत होतें? सरहद्द प्रांताबद्दल आपल्यापैकीं थोडया लोकांना कांहीं कल्पना होत्या. पितामह दादाभाई नवरोजी यांनीं हिंदुस्थानच्या लष्करी खर्चाचा प्रश्न पहिल्या प्रथम उत्पन्न केला. तेव्हांपासून आपणांपैकीं थोडाबहुत अभ्यास करणाऱ्यांना दिसून आलें कीं, सरहद्द प्रांत हा एक मोठा बागुलबोवा आहे; वर्तमानपत्रें वाचणाऱ्यांना या बागुलबोवाविषयीं वारंवार ऐकूं येई, पण 'साप आहे किंवा दोर आहे' याचें यथार्थ ज्ञान त्यांना क्वचितच होत असे.

सरहद्दीच्या आसपास वसणाऱ्या पहाडी प्रजेवर हिंदुस्थानापासून खर्च घेऊन व त्याच्या रक्षणाचा बहाणा करून पुष्कळ हल्ले चढविण्यांत येतात, हें इतिहासावरून आपणांला समजतें. पण याचा खरा इतिहास व मर्म जेव्हां हिंदुस्थानचा खरा इतिहास लिहिला जाईल तेव्हां समजेल. आज आपल्याला एवढेंच सांगण्यांत येतें कीं हे लोक भयंकर आहेत आणि कधीं कधीं त्यांना धाक दाखवून शांत करण्यासाठीं सौम्यांत सौम्य उपाय म्हणजे त्यांच्यावर विमानांतून बॉंब टाकणें हा होय. कुमारी ॲलिससारख्या एखाद्या गोऱ्या मुलीचें हरण होतांच वर्तमानपत्राचे रकाने या प्रसंगाच्या तपशीलवार वर्णनांनीं भरून येतात, पण त्यामुळें सरहद्दीवरील प्रजेविषयीं कांहीं माहिती मिळण्यापेक्षां ब्रिटिश राज्यांतील सर्व साधनसामुग्रीचा उपयोग एका मुलीसाठीं करतां येतो या गोष्टीचीच अधिक जाणीव होते. हिंदुस्थानांतील खेड्याच्या गरीब रहिवाशाला एवढेंच माहीत आहे कीं, सरहद्दीवरचा पठाण म्हणजे रुपयावर मासिक दोन आणे व्याज घेणारा व व्याज दिलें नाहीं म्हणजे सुरी दाखविणारा माणूस!

१९३० सालानें या अंधारांतील प्रांतावर खूप प्रकाश पाडला. १९३०–३१

या ऐतिहासिक सालांत आपणांस कळलें कीं, सरहद्द प्रांतांत आमच्याच सारखीं आमचीं भावंडें आहेत. हिंदुस्थानांतील दुसऱ्या प्रांतांप्रमाणें या प्रांतालाही स्वातंत्र्याची तळमळ लागली आहे आणि या प्रांतानें दुसऱ्या प्रांताइतकेंच नव्हे तर अधिक दुःख सहन केलें आहे व बलिदान दिलें आहे. लॉर्ड अर्विन यांनीं जेव्हां गांधीजींना दिल्लीला बोलावून स्वातंत्र्ययुद्ध बंद करविण्याचा प्रयत्न केला, आणि तहाच्या अटींची वाटाघाट केली तेव्हां प्रथमच मीं खानसाहेब अबदुल गफारखान यांचें नांव ऐकिलें. कराचाली राष्ट्रीय सभेची बैठक झाली तेव्हां खानसाहेब आपल्या लाल डगलेवाल्या सहचरांचा बँड घेऊन आले; त्या वेळीं राष्ट्रीय सभेस आलेल्या लोकांस कळलें कीं, सरहद्द प्रांत देखील स्वातंत्र्ययुद्धांत पूर्णपणें पडला आहे. यानंतर खानसाहेब बारडोली व बोरसद पहाण्यास आले. सव्वा सहा फूट उंच, सरळ, साध्या पण दृढनिश्चयी व प्रखर प्रभावशाली अशा या मूर्तीचा गुजराथ्यांना अधिक परिचय झाला. त्यांचे तोंडून सरळ, लहान लहान वाक्यांनीं भरलेल्या अशा उर्दू भाषेंत त्यांच्या प्रांताची हकीकत ऐकून सर्वांना नवल वाटलें. क्षणभरदेखील विचार केल्याशिवाय तलवार उपसणारे, भोळे, सहज कारणानें भडकून जाणारे, पठाण अहिंसक युद्धांत सामील होऊं शकतात, लाठीचा मार व अनेक अपमानाचे घाव निमूटपणें छातीवर सहज करूं शकतात, हें सर्वांनीं ऐकिलें. तरीसुद्धां खानसाहेबांच्या तोंडून त्यांच्या स्वतःच्या प्रांताविषयीं अधिक ऐकण्यास कसें मिळावें ? आणि त्या प्रांतांत जाऊन तेथील वर्णन, कोणी आपणाजवळ येऊन करील अशी स्थिति अजून तर आली नाहीं. निरनिराळ्या देशांच्या वर्णनपर पुस्तकांतून त्या त्या देशांतील प्रजांचें वैशिष्ट्य दाखविणाऱ्या कित्येक गोष्टी वाचावयास मिळतात. रोमन लोकांचीं हिंमत दाखविण्यारी एक गोष्ट अशी आहे कीं, एका युवकानें धगधगणाऱ्या ज्वालेंत आपला हात धरला व तो जळून त्याची राख होईपर्यंत तो हालविला नाहीं. ससा चोरणाऱ्या एका स्पार्टनची गोष्टही आपण वाचतो कीं, सशानें सगळें पोट पोखरून खाल्लें तरी त्या स्पार्टन मनुष्यानें हूं कीं चूं केलें नाहीं. पठाणाच्या बाबतींतही अशीच एक गोष्ट सांगतात कीं, एकजण कोणाएकाच्या घरीं चोरी करण्यास गेला; घराला भोंक पाडलें व हात आंत घातला, इतक्यांत घरांतल्या माणसाला चाहूल लागून

मराठी ग्रंथ संग्रहालय



त्यानें त्याचा हात पकडला व मदतीसाठीं आरडाओरड केली. त्या पठाणानें पकडलें जाण्यापेक्षां आपलें मनगट तोडून पलायन करण्याचा मार्ग, अधिक सुरक्षित मानला आणि घरवाला हातांत रक्तबंबाळ मनगट घेऊन बसून राहिला! परंतु या स्वातंत्र्ययुद्धांच्या ताज्या इतिहासांतील गोष्टी इतक्याच शौर्य आणि हिंमतीनें भरलेल्या पण यापेक्षां पुष्कळच उदात्त व स्फूर्तिप्रद आहेत व प्राचीन बौद्ध संस्कृतीचें स्मरण देणाऱ्या आहेत. येथें दोनच उदाहरणें देतों. खान अबदुल गफ्फारखानांचे एक चुलतबंधु हाजी शाहनवाझखान १९३० मध्यें कैदेंत होते. घरीं परिस्थिति अशी येऊन ठेपली कीं, योग्य जामीन देऊन बाहेर पडणें त्यांना आवश्यक वाटलें. पण घरच्यांची इच्छा नव्हती कीं, हाजी साहेबांनीं अशा रीतीनें सुटावें. त्यांनीं त्यांना सूचना केली कीं, तावडतोब जामिनाची अट मोडून फिरून तुरुंगांत जावें; नाहींतर अब्रूचें दिवाळें वाजेल. पण हाजीसाहेबांनीं या सूचनेच्याहीपुढें एक पाऊल टाकलें. त्यांना वाटलें कीं, तुरुंगांत जाण्यानें ही बदनामी धुतली जाणार नाहीं; म्हणून त्यांनीं आत्महत्या केली, व मागें चिठ्ठी लिहून ठेविली; तींत स्पष्ट लिहिलें होतें कीं, 'बेअब्रूचा डाग धुवून टाकण्यास तुरुंग पुरेसा नव्हता, कलंक साफ नाहींसा करण्यासाठीं स्वतःचें रक्तच द्यावयास पाहिजे होतें!' सय्यद अबदुल वदूद बादशाह खानसाहेबांचा उजवा हात होते. सय्यद म्हणजे धर्मगुरु, तो मोठा जमीनदारही असतो. तरी ते सरहद्द प्रांताचे रहिवासी नव्हत, मालखंड एजन्सीचे होते. त्यांनादेखील १९३० मध्यें जामीन न दिल्यामुळें तीन वर्षांची सजा झाली होती. अर्विन–गांधी करारनामा झाल्यावरही त्यांची मुक्तता होण्याची पाळी आली नाहीं. त्यांचा अतिशय वृद्ध पिता मृत्युशय्येवर होता. मरणापूर्वी मुलाचें तोंड दिसावें अशी इच्छा कोणास होणार नाहीं? म्हाताऱ्यानें जामीन भरून मुलाचें तोंड पाहिलें. पण सय्यदसाहेबांना इतकी कठोर किंमत देऊन मृत्युपंथास लागलेल्या पित्याचें दर्शन घेणें असह्य वाटलें. वडिलांना भेटले खरें पण ज्या शरीरास पाहाण्याच्या मोहानें पित्यानें बेअब्रू पतकरली, त्या शरीराचा बंदुकीच्या एका गोळीनिशीं त्यांनीं अंत करून टाकला! ही गोष्ट घडली तेव्हां म्हणजे १९३२ त खानसाहेब तुरुंगांत होते. या दुःखद प्रसंगाची बातमी त्यांना येथें वर्ध्यास असतां समजली. त्यांचा मुलगा त्यांना तीन वर्षांनीं भेटला. त्याचेजवळ त्यांनीं आपल्या सर्व स्नेह्यांची विचार-

पूस केली तेव्हां त्यानें ही गोष्ट सांगितली. ती ऐकून थोरले खानसाहेब तर सारा दिवसभर उदास होते.

या व अशाच दुसऱ्या गोष्टी खानसाहेबांकडून ऐकण्याची अमूल्य संधि जर त्यांना सेठ जमनालालजींनीं वर्ध्यास बोलाविलें नसतें तर मला कदाचित् मिळाली नसती. दोघे बंधु हजारीबाग तुरुंगांतून सुटले; पण स्वतःच्या घरीं जाण्याची त्यांना परवानगी मिळेना व राष्ट्रीय सभेकडून तुरुंगांत जाण्याचीही मिळेना! मग खानसाहेबांनीं रहावें कोठें हा प्रश्न राहिलाच. पण त्याचा निवाडा जमनालालजींनीं केला. ते या वेळीं शस्त्रक्रिया करविल्यामुळें मुंबईत रुग्णशय्येस खिळून पडले होते. त्यांनीं दोन्ही बंधूस तार पाठवून आग्रह केला कीं, वर्ध्यांतील माझें घर आपलेंच समजावें. दोघां भावांनीं या मागणीस मान दिला आणि त्यामुळें त्यांचा परिचय करून घेण्याचा मला अलभ्य लाभ मिळाला. कनिष्ठ बंधु अबदुल गफ्फारखान साहेबांची १९३१ त थोडी ओळख झाली होती, पण एक कुटुंबीय म्हणून त्यांचेबरोबर राहाण्याचा आणि खासगी परिचय करून घेण्याचा व त्यांचेकडून सरहद्द प्रांतांतील शूर पठाणांचीं ओळख करून घेण्याचा जो लाभ मिळाला त्याबद्दल ईश्वराचे आभार मानावे तितके थोडे. ही ओळख होत असतां त्यांचेकडून पुष्कळ गोष्टी ऐकल्या; त्यांना अनेक प्रश्न विचारले; त्यांचीं उत्तरें त्यांनीं मोकळ्या मनानें दिलीं. सर्वच कथा इतकी रोमहर्षक आहे कीं, तींतील थोडा भाग सर्व जनतेला माहीत होण्यासाठीं प्रसिद्ध करावा अशी गांधीजींची आज्ञा झाली. हीं प्रकरणें वाचून दोघांही भावांचा थोडाबहुत तरी परिचय वाचकांना करून घेतां येईल अशी आशा आहे. इतक्या ऋजु, शुद्ध ईश्वरसेवकांना सरकार आपल्या प्रान्तांत कां जाऊं देत नाहीं? सरहद्द प्रांताला एक भयंकर बागुलबोवा कां बनवून ठेविलें आहे? असा माझ्याप्रमाणें सर्वच वाचकांना प्रश्न पडेल. या प्रश्नाची चर्चा करण्याऐवजी जेथें एका काळीं सत्य व अहिंसेच्या संस्कृतीचा प्रकाश पडला होता आणि जी संस्कृति मध्ययुगाच्या अनेक शतकांत लुप्तप्राय झाली होती, त्या प्राचीन संस्कृतीची ज्योत फिरून प्रज्वलित करण्यासाठीं या दोन वीर पठाणांनीं स्वतःच्या आयुष्याचा केवढा तेजस्वी यज्ञ केला आहे, हेंच आपण पाहूं या.

# प्रकरण तिसरें

## बहेरामखान

खानसाहेबांना त्यांची जन्मतिथी विचारली तेव्हां त्यांनीं म्हटलें, " साल मला ठाऊक आहे. पण तारीख माहीत नाहीं." कदाचित् तिथी सांगूं शकेन. माझा जन्म ज्येष्ठ महिन्यांत झाला पण खिस्ती तारीख ठाऊक नाहीं."

'ज्येष्ठ!' मीं आश्चर्यानें विचारलें. " हा तर आमचा महिना. तुमच्या येथें पण हिंदु महिना चालतो कीं काय ?"

"होय. आपल्यामध्यें कित्येक गोष्टी सामान्य आहेत. पण त्यांची आपल्याला माहिती नाहीं. आपल्या रूढि, रीतरिवाज पुष्कळसे सारखे आहेत. शिवाय शेंकडों वर्षे आमच्या प्रांतांत बौद्धधर्म होता. आमच्या जिल्ह्यांत बौद्धकालीन पुष्कळ अवशेष अजून आहेत व कांहीं आमच्या गांवांचीं व नगरांचीं नांवें बौद्ध किंवा हिंदु आहेत. पुश्तो भाषेंतलि पुष्कळ शब्द संस्कृत भाषेंतून आलेले आहेत."

डॉक्टर खानसाहेब–खानसाहेबाचे वडील बंधु–यांचा जन्म १८८३त झाला व खानसाहेबांचा स्वतःचा जन्म १८९०त झाला. हे बंधु महंमदझाई नांवाच्या कुटुंबांत जन्म पावले. त्यांचे वडील आणि आजोबा दोघेही आपल्या विभागाचें खान होते. "झाई" म्हणजे "जन्मलेले" आणि 'खान' म्हणजे टोळीचा नायक. सरहद्द प्रांतांतील सर्व कुटुंबांचीं नांवें त्यांच्या मूळ पुरुषाच्या नांवावरून पडलेलीं असतात आणि टोळीच्या नांवावरून गांवांचीं नांवें पडलेलीं असतात. या दोघां बंधूंचे वडील खान बहेरामखान पेशावर जिल्ह्यांतील चरसाडा तालुक्यांतील उतमानझाई गांवाचे खान होते. चरसाडा पेशावरच्या पश्चिमेस वीस एक मैल आहे व उतमानझाई गांव उत्तरेकडून वहात येणाऱ्या स्वात नदीवर आहे. चरसाडाहून तें दोन मैलांवर आहे. तेथेंच जवळ जवळ हिंदुस्थानची सीमा पुरी होते असें म्हटलें तरी चालेल. तेथून पुढें पश्चिमेस गेलें कीं पहाडी टोळ्यांचा प्रदेश लागतो. इंग्रज लोक या टोळ्यांना Tribes या नांवानें ओळखतात. वीस एक मैलपर्यंत मोहमंद टोळ्यांच्या वस्तीचा प्रदेश आहे. तो ओलांडला कीं अफगाणिस्तान.

हा सर्वच प्रदेश फार डोंगराळ आहे. पर्वत, नदी, नाले आणि दऱ्या यांतून बसलेले हे लोक जेव्हां आजकालच्या सुधारलेल्या प्रदेशांत येतात तेव्हां त्यांना चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. वडील बंधु तर युरोपांत दहा अकरा वर्षें राहून आले आहेत, तरी देखील त्यांची अशीच स्थिति होते. वारंवार ते स्वात नदीवर वसलेल्या आपल्या सुंदर खेड्यांचें व तेथें असलेल्या पुष्कळ फळझाडांचें वर्णन करीत असतात. एकदां खानसाहेब म्हणाले, " स्वात नदींत एक लहानसें बेट आहे. त्यांत एक लहानसें आरामस्थान बांधलें आहे. महात्माजी आमच्या प्रांतांत येतील तेव्हां आम्ही त्यांच्यासाठीं तेथें आश्रम बांधूं. आश्रमासाठीं अधिक सुरेख जागा मिळणें अवघड आहे. तेथील गुलाबी थंडी, सुंदर हवा व अपरंपार फळें कोणाही माणसाला पहाडी पठाण बनवतील अशीं आहेत. महात्माजींचें वजन येथें कधींही झालें नव्हतें इतकें वाढेल. आमचेकडील दुधानंतर मलई इतकी असते कीं सांगून सोय नाहीं. दूध बकरीचें घ्या किंवा गाईचें घ्या. गाईच्या दुधाचा उपयोग आम्ही लोण्यासाठींच करतों, आणि म्हशीच्या दुधाचा इतर कामांसाठीं." खान साहेबांचा धाकटा मुलगा म्हणतो, " जसे आम्ही तसा आमचा ऊंस. तुमचा ऊंस तुमच्यासारखाच लहान व सुकलेला दिसतो, आमचा ऊंस एका हातानें उचलणें जड जाईल,' या ऊंसांचे मळे व आपल्या बागा त्यांनीं, तीन तीन वर्षें झालीं, पाहिल्या नाहींत. ' तीन वर्षांत त्यांचें काय झालें असेल ईश्वराला माहीत,' असें म्हणत पुष्कळदा हे दोघेही भाऊ निःश्वास सोडतात. पण या निःश्वासांत कांहीं थकवा किंवा निराशा नाहीं. आपल्या प्रिय भूमीचें स्मरण कोणाला होणार नाहीं ?

पण आतां खान बहेरामखानांचा थोडा परिचय करून घेऊं. खानसाहेब आपल्या वडिलांबद्दल बोलूं लागले म्हणजे आपल्याला सरदार वल्लभभाईंच्या वडिलांची आठवण येते. सरदार व खानसाहेब दोघांचेही वडील भक्त होते, दोघांचेंही जीवन इतकें सदाचारी व धर्मनिष्ठ होतें कीं, दोघेही ९५ वर्षांचें आयुष्य उपभोगून पिकलेल्या फळांप्रमाणें गळून पडले. वृद्ध झवेरभाई पटेल ऐंशी वर्षांच्या वयांतही दहा मैल चालून जात. वृद्ध बहेरामखानसुद्धां आपल्या मुलांना स्वतःच्या आयुष्यांतील कडकपणा व चिवटपणा यांच्या योगानें लाजवीत, व त्यांच्याबरोबर चालतांना सामान्य माणसें थकून जात. सरदारांना धर्मभावनेची

पुंजी पित्याकडून व मातेकडून मिळाली. खानसाहेबांचीही तीच गोष्ट आहे. तरी पण खान बहेरामखानांनीं आपल्या दोन्ही मुलांच्या शिक्षणांत जितका भाग घेतला तितका झवेरभाईंनीं आपल्या मुलांच्या बाबतींत घेतला नाहीं. झवेरभाई पटेल उत्तरवयांत वानप्रस्थ होऊन बसले होते, बहुतेक वेळ देवळांत घालवीत. मुलांनीं स्वपरिश्रमांच्या बळावर शिक्षण संपादिलें, स्वतः-च्या कमाईवर ते विलायतेला गेले. परंतु बहेरामखानांजवळ संपत्ति बरीच होती, त्यांनीं मुलांना शिक्षण देण्याकडे पुष्कळच लक्ष दिलें आणि शेवटीं अगदीं वृद्धावस्थेंतसुद्धां मुलानें हातीं घेतलेल्या कामांत मदत केली हें आपणांस दिसून येईल.

आपल्या आईबापांविषयीं बोलत असतां दोघांही खानबंधूंच्या डोळ्यांत हर्षाश्रू येतात; " माझ्या दोन्ही मातापित्यांचें जीवन इतकें पवित्र असें कीं, आम्हांला कोणत्याही प्रकारचें धार्मिक शिक्षण घेण्यासाठीं त्याच्या जीवना-बाहेर जायला नको होतें. त्या दोघांनाही लिहितां वाचतां येत नव्हतें, पण दोघांचेंही आयुष्य व्यवहारी नसून पारमार्थिक अधिक होतें. माझी आई तर पुष्कळदां नमाज झाल्यावर शांतपणें ध्यानमग्न होऊन बसत असे. माझ्या आईबापांपेक्षां अधिक भक्तिसंपन्न दापत्य मी पाहिलेंच नाहीं."

ही धर्मभावना शुष्क नसून आचरणांत प्रत्यक्ष दिसून येणारी होती. " माझ्या पित्याविषयीं एवढें सांगूं शकतों कीं, त्यांनीं साऱ्या आयुष्यांत एकही शत्रु निर्माण केला नाहीं, मित्रच संपादन केले. माझ्या सोयऱ्या-धायऱ्यापैकीं कित्येक असे होते कीं, ज्यांनीं त्यांना त्रास देण्यांत बाकी म्हणून ठेवली नाहीं; परंतु त्याच लोकांना पुढें पश्चात्ताप झाला. एकानें तर मरतेवेळीं त्यांची क्षमा मागितली व आपले मुलगे त्यांच्या हवालीं केले.

हाडवैर तर त्यांना ठाऊकच नव्हतें. ज्या कारणांसाठीं सामान्य पठाण दुसऱ्याचा खून करील. अशीं कारणें उत्पन्न झालीं तरी त्यांची शांति कधीं ढळत नसे आणि आपल्या विरोधकावर चालविण्यासाठीं क्षमेशिवाय दुसरें एकही शस्त्र त्यांचेजवळ नव्हतें. शठाशीं शठ होऊन त्याला हटविण्यांत त्यांना मोठेपणा वाटत नसे. त्याला औदार्यानेंच जिंकण्याचा प्रयत्न ते करीत. पुष्क-ळदां ते स्वतः फसविले जात, पण दुसऱ्यांना फसविण्यांत नामुष्की आहे, स्वतः

दुसऱ्यांकडून फसविले जाण्यांत नाहीं असें त्यांना वाटे. त्यांच्या शब्दाला सरकार–दरबारांत मान असे, त्यांनीं सांगितलें कीं त्यावर चौकशी होत नसे, त्यांच्या शत्रूंनासुद्धां त्यांचें म्हणणें खोटें आहे असें म्हणण्याची हिंमत नसे; पुष्कळजण त्यांचेकडे आपले पैसे, दागिने वगैरे ठेवून जात, त्याबद्दल त्यांचा शब्द आणि आठवण याखेरीज दुसरी कसलीच पावती लागत नसे; सर्वांना माहीत होतें कीं, त्यांचे तोंडून असत्य कधींच येणार नाहीं. तो काळ असा होता कीं, सरकार दरबारीं खुशामत करण्याचा मार्ग त्यांनीं थोडा जरी चोखाळला असता तरी त्यांना मोठाच मानसन्मान मिळाला असता; परंतु खुशामत त्यांना ठाऊकच नव्हती; तरीसुद्धां मोठमोठे अमलदार त्यांना भिऊन होते आणि चीफ कमिशनर देखील त्यांना 'काका' म्हणत आणि त्यांना नाराज करावयाचें म्हणजे त्यांना खूप विचार करावा लागे."

"ते कोठपर्यंत हयात होते? आपल्या राष्ट्रीय लढ्यांत त्यांनीं कांहीं भाग घेतला का?" मीं विचारिलें.

"१९२६ मध्यें जवळ जवळ ९५ वर्षांचें वय होऊन तें वारले. आपल्या लढ्याचें संपूर्ण स्वरूप त्यांनीं समजून घेतलें होतें असें कसें म्हणतां येईल? पण मी त्यांचेजवळ चर्चा करीत असे व त्यांना माहिती सांगत असे, तेव्हां सरळ गोष्टी समजून घेण्यास त्यांना उशीर लागत नसे. इतक्या वार्धक्यांत सुद्धां ते जुन्याचे आग्रही नव्हते, नव्याचा द्वेष करीत नसत, सुधारणेला भिऊन दूर पळत नसत. आमच्या लहानपणीं मुलांना शाळेंत पाठविणें म्हणजे मोठ्या मुष्किलीचें होतें. मौलवी लोक धर्माच्या नांवानें त्याला विरोध करीत. पण वडिलांस मौलवींचा हा दुराग्रह आवडत नसे. आम्हां सर्वांना शिक्षण देण्यास त्यांची थोडीसुद्धां हरकत नव्हती, इतकेंच नव्हे तर शिक्षण घेण्यासाठीं आम्हांला त्यांनीं पूर्णपणें उत्तेजन दिलें.

"रौलट बिलाविरुद्ध सत्याग्रह जाहीर झाला, तेव्हां मीं त्यांत उडी घेतली. एप्रिलच्या ६, या दिवशीं सर्व हिंदुस्थानभर सभा झाल्या, आमच्या प्रांतांत एक लाख माणसें जमलीं. त्यांत माझे वडीलही हजर होते. मला ताबडतोब पकडण्यांत आलें; खटला वगैरे करण्याची आवश्यकता नव्हतीच, मला पकडून कोठें नेलें, माझी काय स्थिति झाली याविषयीं त्या लोकांनीं माझ्या वडिलांस

कांहींच कळविलें नाहीं; पण पोलीस अधिकारी एक जिरगा * घेऊन माझ्या वडिलांजवळ आला आणि त्यांना वळविण्याचा आणि न वळले तर धमकी देण्याचा चांगलाच प्रयत्न केला. आपल्या विचाराप्रमाणें वागणाऱ्या लोकांना गोळा करून त्यांचा "जिरगा" करावा व ज्याच्यावर दडपण आणावयाचें असेल त्याच्याकडे त्यांना घेऊन जावें असा त्याचा रिवाज होता. या जिरग्यांतील सभासदांनीं माझ्या वडिलांना म्हटलें; "तुम्ही अविचार कराल तर ते लोक बादशहाला गोळी घालून ठार करतील."

"बादशाहा कोण" मी विचारलें.

हंसत हंसत खानसाहेब म्हणाले, "त्या वेळीं माझें नांव 'बादशाह' होतें. लोक बिचारे वाटेल तें नांव देतात."

"येशूलासुद्धा यहुद्यांचा बादशाह म्हटलें होतें ना!" मीं म्हणालों.

"तें ठीक आहे म्हणा, पण त्याची कल्पना व आशा ही होती कीं, माझे वडील घाबरतील व जामीन देतील. कारण कांहीं नाहीं तरी मोठी सजा होणारच याविषयीं शंका थोडीच होती?"

"मग शेवटीं काय झालें?"

"शेवटीं असें झालें कीं ते थकले व म्हणून माझ्या वडिलांना देखील पकडण्यांत आलें आणि आमच्या कुटुंबांतील दुसऱ्या माणसांनाही पकडण्यांत आलें."

"एवढ्या वयांत तुरुंगांत जाणें त्यांना कष्टप्रद झालें असेल?"

"छे हो, कर्मधर्मसंयोगानें त्यांनाही मी ज्यांत होतों त्याच तुरुंगांत आणण्यांत आलें. तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. आल्याबरोबर त्यांनीं म्हटलें "ईश्वराची केवढी दया कीं मी पण पकडला गेलों; नाहीं तर कोण जाणे आपण केव्हां भेटलों असतों?"

"त्यांना किती दिवस कैदेंत काढावे लागले?"

"तीन महिने आणि कांहीं दिवस. कारण त्या वेळीं सर जॉर्ज रूस केपल हे चीफ कमिशनर होते आणि नेहमीं पठाणांना संतुष्ट ठेवण्याचें त्यांचें धोरण असे. म्हणून मलादेखील सहा महिन्यांपेक्षां अधिक तुरुंगांत राहावें लागलें नाहीं."

---

* जिरगा म्हणजे "डेप्यूटेशन" किंवा पंच.

मी सांगितलेंच आहे कीं खान बहेरामखान १९२६ त वारले. त्यांना स्वतःला आपली जन्मतिथि कोठून माहीत असणार? पण ते ज्या गोष्टी सांगत त्यांवरून मुलांच्या हिशेबानें शंभर वर्षें नाहीं तरी शंभराला चार पांच वर्षें कमी इतके ते जगले असावेत. कारण १८५७ च्या बंडाची त्यांना चांगली माहिती होती. बंडाचा समय हा त्यांच्या भर तारुण्याचा काळ होता. त्या बंडांत पठाणांनीं ब्रिटिशांना जी मदत केली तीबद्दल ते क्वचितच अभिमानानें बोलत, आणि वडिलांच्या तोंडून ऐकिलेल्या त्या वेळच्या अनेक गोष्टीं-वरून खानबंधू म्हणतात कीं, त्यावेळच्या पठाणांच्या करामतीची म्हाताऱ्याला लाज वाटत असे. म्हाताऱ्याचे वडील बंधू त्या वेळीं चरसाड्याच्या तिजोरीवर जो लष्करी पहारा होता त्याचे नायक होते आणि त्यांच्यासारख्या इमानदार अमलदाराची ब्रिटिशांना भारी किंमत वाटत होती. पण याबद्दल डॉक्टर खानसाहेबांनीं अधिक चर्चा करण्याचें नाकारिलें. ते म्हणाले, "या लज्जास्पद गोष्टींत मला कांहींच वाटत नाहीं."

मी म्हटलें "यांत कसली लाज? पंडित मोतीलालजींच्या पूर्वजांनींही बंडांच्या वेळीं इंग्रजांस चांगलीच मदत केली होती असें मीं त्यांचेकडून ऐकिलें आहे."

"तें असेल. पण मला त्या वेळीं शीखांनीं व पठाणांनीं जें काम केलें त्याची स्मृति अभिमानास्पद नाहीं वाटत!"

"तो काळ वेगळा होता. त्या वेळीं इंग्रजांस चांगलीच मदत करणाऱ्या या दोनही कुटुंबीयांतील पुरुषांनीं आज हिंदुस्थानाला स्वराज्य मिळवून देण्याची प्रतिज्ञा केली आहे. ही गोष्ट माझ्यामतें तरी इतिहासांत नमूद करण्याजोगी आहे."

"तें खरें आहे."

पण आतां हें प्रकरण पुरें करूं आपल्या पित्याच्या उदार हृदयाचें व क्षमाशीलतेचें वर्णन करतांना हे दोघे भाऊ कधींच कंटाळत नाहींत. या महान् पित्याजवळूनच त्यांना अहिंसेची देणगी मिळाली असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

क्र. ५४५०

## प्रकरण चवथें

## संस्कार

(१)

याप्रमाणें स्वाभाविकपणें आपण दोघांही भावांच्या बाळपणापर्यंत येऊन पोहोचलों. ज्या प्रांतांत केवळ जंगली लोकांचीच वस्ती आहे असें आपण समजत आलों, जेथें लूटालूट व रक्तपात याशिवाय दुसरें कांहीं नाहीं असें आपण ऐकत आलों, असल्या प्रांतांत या दोघा भावांना इतकें शिक्षण कसें मिळालें व आपल्या देशव्यापी चळवळींत ते कसे पडले तें जाणून घेण्याची मला इच्छा होती.

" मी तुम्हांला सांगितलेंच आहे ना कीं, आमच्या वेळीं शाळेंत जाणें देखील मुष्किलीचें होतें आणि मौलवींना तर या गोष्टीची ओळखही नव्हती. खानसाहेब म्हणाले, मौलवींची मकतब* ( शाळा ) होती, तींत कुराने शरीफ व नांवापुरतें अक्षरज्ञान देत. तीसुद्धा इंग्रज आल्यानंतर बंद पडली व तिच्या जागीं कांहीं थोड्या शाळा आल्या. या शाळांतून मुलांना पाठवावयाचें म्हणजे लोकमताला विरोध करून. परंतु माझ्या वडिलांनीं लोकमताची पर्वा न करितां आम्हाला शाळेंत घातलें. मी पेशावरांतील एका मिशनरी शाळेंत जात असे. माझे वडील बंधु सरकारी शाळेंत जात आणि एक वर्ष मिशनरी कॉलेजांत होते. वडील बंधु यानंतर मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजांत एक वर्षभर होते. व मग डॉक्टरची पदवी मिळविण्यासाठीं विलायतेस गेले. त्यांना विलायतेस पाठवितेवेळीं आमच्या जातींत अशी खळबळ झाली कीं विचारूंच नका. तेथें जाऊन तो ख्रिस्ती तर नाहीं ना होणार ? तेथें जाऊन इंग्रज मुलीशीं लग्न करून तेथेंच राहिला

---

* ' मकतब ' हा अरबी शब्द— ' किताब ' वरून. याचा मूळचा अर्थ कुराने शरीफ, तें जेथें शिकविलें जातें ती जागा ' मकतब ' — कुराण शिकविण्याची शाळा.

तर ! त्यांची दुसरी भीति खरी ठरली. पण माझ्या पित्याचे विचार या बाबतींत संकुचित नव्हते. त्यांनीं माझ्या बंधूना विलायतेस जाण्यास उत्तेजन दिलें. आणि विलायतेहून ते परत आल्यावर त्यांच्या, पत्नीबरोबरसुद्धां ते प्रेमळपणानेंच वागले.

मलाही शिक्षण द्यावें अशी वडिलांची पुष्कळ इच्छा होती. परंतु मी मॅट्रिक झालों नाहीं. मला देखील विलायतेस पाठविण्याचा विचार झाला होता, पण आमच्या कुटुंबांत दोनतीन माणसें मरण पावलीं, तो अपशकून समजून मला धाडलें नाहीं. दरवर्षी कोणीतरी मरण पावे व मला जातां येत नसे. याप्रमाणें माझीं दोन तीन वर्षे गेलीं आणि नंतर वडील बंधूंनीं इंग्रज मुलीशीं लग्न केलें तेंव्हां तर आटोपलेंच ! मी विलायतेस गेलों नाहीं आणि माझा अभ्यासही पुढें चालला नाहीं. "

परंतु मिशनरी शाळेंत गेलेलीं दोनतीन वर्षे या भावांच्या दृष्टीनें अमूल्य होतीं. सामान्यतः मिशनरी संस्थांतून देण्यांत येत असलेल्या सक्तीच्या बायबल शिक्षणानें मुलें कंटाळतात, कित्येक तो वर्ग सोडून दुसऱ्या वर्गांत जातात. या भावांच्या काळीं मिशनरी शाळा कशी चालत असेल तें कळत नाहीं. परंतु शाळेचे आचार्य रेवरंड विग्रम यांचा दोघाही भावांना विसर पडला नाहीं. या सुशील, त्यागी, प्रेमळ व परोपकारी ख्रिस्ती पुरुषाची त्यांच्या चारित्र्यावर खूप छाप पडली व त्यांच्याबरोबर त्यांचा संबंध जडला तो अजून कायम आहे. मुंबईतील ज्या भाषणासाठीं खान अबदुल गफ्फारखानांना आज दोन वर्षे कारावास मिळाला आहे, त्या भाषणांत रेवरंड विग्रम विषयींच्या स्तुतीचे उद्गार भरलेले होते ! हा भला पाद्री आपल्या पगारांतील थोडा भाग स्वतःसाठीं ठेवून बाकीचा सर्व पगार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देण्यासाठीं उपयोगांत आणित असे. या गोष्टीचा धाकट्या भावावर फारच परिणाम झाला आणि तेव्हांपासूनच हे स्वतःच्या धर्माची जशी सेवा करतात तशीच आपणही आपल्या धर्माची सेवा केली पाहिजे असें त्यांच्या मनाला वाटूं लागलें.

पण संस्कार पुरे होण्यास अजून कांहीं काळ जावयाचा होता. पुष्कळ पठाण लोक लष्करांत जात, त्यांच्या प्रचंड व मजबूत शरीरामुळें त्यांना पसंत करण्यांत कोठलीही आडकांठी येत नसे आणि खान कुटुंब तर अतिशय अब्रूदार समजलें जात होतें; तेव्हां अब्दुल गफ्फारखानांना सैन्यांत

प्रवेश मिळण्यास कोणतीही आडकाठी येण्यासारखी नव्हती. त्यांनीं लष्करी अधिकारी म्हणून आपली नेमणूक व्हावी असा अर्ज केला व तो स्वीकारला गेला. पण ईश्वराची इच्छा निराळी होती. खानसाहेब म्हणतात, " लष्करी अमलदाराचा मपका, त्याचा ऐटबाज पोशाक, धरित्रीला नमविणारी त्याची चाल हें सर्व मला फार आवडे. माझ्या नातलगांपैकीं पुष्कळजण अमलदार झाले होते आणि मोठ्या अधिकारावर चढले होते, व माझ्या मनाला घटकाभर वाटलें कीं, माझ्या शरीराचा घाट इंग्रजासारखाच असून इंग्रजाची लायकीही माझ्यांत आहे. पण अल्लाला दुसरेंच करावयाचें होतें. मी एका लष्करी मित्राकडे गेलों असतां माझ्या दृष्टीस जो प्रकार पडला त्यायोगानें माझा भ्रमाचा भोंपळा फुटला. मीं आपल्या खुद्द डोळ्यांनीं पाहिलें कीं खालच्या दर्जाचा गोरा अमलदार वरच्या दर्जाच्या पठाण अमलदाराचा अपमान करण्यास कचरत नाहीं आणि तो अपमान पठाण अमलदार सहन करतो. आटोपलें, मीं माझ्या लष्करी मनोरथांना रजा दिली. आणि मनाला वेगळी दिशा लावली. सुमारें एक वर्ष अलिगढ येथें अभ्यासासाठीं काढलें. उर्दू प्रथम मी तेथें शिकलों. मौ. झफरअल्लीखानांचें 'जमीनदार' आणि मौ. अबुल कलाम अझाद यांचें 'अलहिलाल' हीं त्या वेळचीं फार प्रसिद्ध पत्रें होतीं आणि त्यांचा खपही फार असे. " अलहिलाल " महायुद्धाच्या काळांत सरकारनें बंद केलें आणि मौलानांना नजरकैद मिळाली. हें वाचन आणि या वेळीं झालेले संस्कार यांपासूनच माझें खरें राजकारणाचें शिक्षण सुरू झालें असें म्हणतां येईल; राष्ट्रीय शिक्षणाची गोडी मला यापूर्वींच लागली होती. तुरंगझाईच्या हाजीनें १९११ त पुष्कळ राष्ट्रीय शाळा काढल्या होत्या, त्या वेळीं त्यांचे-बरोबर या शाळा काढण्यांत मीं पुष्कळ भाग घेतला होता. परंतु देश व देशा-विषयींचें कर्तव्य याविषयींचें ज्ञान अलिगड येथें शिकतांना झालें. महायुद्ध संपलें; त्यांत हिंदी शिपायांनीं केलेलें बलिदान आणि हिंदुस्थाननें ओतलेला पैसा यांची वाखाणणी तर खूप झाली; परंतु या सेवेचें बक्षीस रौलट बिलाच्या रूपानें मिळालें. त्याला कायद्याचें रूप येण्यापूर्वी देशांत सर्व ठिकाणीं विरोध दर्शविण्यांत आला आणि गांधीजींनीं तर या विरोधाला सत्याग्रहाचें रूप दिलें. देशकार्यांत उडी टाकण्याची ही सुंदर संधि होती. देशांतील दुसऱ्या प्रांतांतून ठिकठिकाणीं मोठमोठे हरताळ पडले व विरोध दाखविणाऱ्या प्रचंड सभा भरल्या.

. मागें सांगितल्याप्रमाणें आमच्या **उतमानझाई** गांवांतही ६ एप्रिल १९१९ रोजीं जी सभा झाली तिला लाखावर माणसें जमलीं होतीं. माझे वृद्ध वडीलही या सभेंत हजर होते. सत्याग्रहाला सुरुवात झाली नव्हती, पण एवढी प्रचंड सभा आमच्या प्रांतांत झाली तेवढ्यानेंच प्रांतातील अमलदारांच्या डोक्यांत घाव पडल्यासारखें झालें. मला पकडण्यांत आलें. न्यायनिवाड्याची गोष्टच कशाला? मला विचारण्यांत आलें, "कां, तुम्हीं पठाणांचे बादशाह आहां ना?" मीं सांगितलें, "मी पठाणांचा बादशाह आहें किंवा नाहीं तें मला माहीत नाहीं, पण मी आपल्या समाजाचा एक सेवक आहे आणि हा कायदा आम्ही पसार होऊं देणार नाहीं." सरकारी अमलदारांनीं आपल्या पठाण दोस्तांचें एक मंडळ–जिरगा–आमची समजूत घालण्यासाठीं पाठविलें. समजूत करून थकले तेव्हां त्यांनीं धाकदपटशाचा प्रयोग केला व शहाणपणाचे युक्तिवाद केले. त्यांतला एक युक्तिवाद उदाहरणा दाखल सांगण्यासारखा आहे. त्यांनीं सांगितलें, "आपल्याकडे सरहद्दी गुन्ह्याचा कायदा आहे, तो रौलट कायद्याच्या तोंडांत मारील असा कडक आहे. त्याला आपण कधींच विरोध केला नाहीं, मग रौलट कायद्यानेंच काय पाप केलें आहे? आणि आपला ब्रिटिश हिंदुस्थानाशीं काय संबंध? तिकडील लोकांनीं आपलें असें कोणतें हित केलें आहे कीं त्यांच्यासाठीं धांवाधांव करण्याला तुम्हांला एवढें स्फुरण चढावें?" पण या तर्कवादाचा मजवर कसलाच परिणाम झाला नाहीं. दगड विरघळला तर मी विरघळणार. यामुळें मला व दुसऱ्या कित्येकांना पकडण्यांत आलें."

या पहिल्या खेपेच्या तुरुंगवासाची हकीगत त्यांना विचारली तेव्हां त्यांनीं सांगितलें,

"होय, ती हकीगत ऐकण्यासारखी आहे. मी त्या वेळीं सामान्य कैदी तर होतोच, पण सामान्य कैद्यांत देखील भयंकर बदमाषांत माझी गणना करण्यांत आली होती. तुरुंगांत मला हातकड्या घालून घेऊन गेले होते व सगळ्या मुदतींत पायांत बेडी होती. माझें वजन त्या वेळीं २२० पौंड होतें त्यामुळें माझ्या मापाची बेडी कोठून आणणार? माझ्यासाठीं एक नवा जोड करावा लागला, पण त्यामुळें माझे घोटे चांगलेच सोलून निघाले आणि रक्त निघूं लागलें. अमलदारांना त्याची मुळींच पर्वा नव्हती. त्यांनीं

म्हटलें " हळू हळू संवय होईल. " पण एवढ्यानें त्यांना संतोष वाटला नाहीं. एका नव्या गुन्ह्यांत मला गोंवण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. माझ्या गांवच्या एक पठाणावर टेलिग्राफची विजेची तार तोडल्यांचा आरोप शाबीत झाला होता आणि त्याला शिक्षाही झाली होती. त्या माणसाजवळ ते गेले. त्याला विचारलें, " तूं अब्दुल गफ्फारखानाला ओळखतोस ? " त्यानें सांगितलें. " होय, मी त्यांना ओळखतो. त्यांच्यामुळेंच मी सत्याग्रहांत पडलों. " " बरें तर तार तोडावयाची सल्ला देखील त्यानेंच दिली असेल ना ? " त्यानें साफ नाहीं म्हणून सांगितलें. कांहीं केलें तरी तो ऐकेच ना, तेव्हां सर्वांची नाउमेद झाली. "

पण दरम्यान मोठ्या बंधूचें काय झालें तें पाहूं. मुंबईतील मेडिकल कॉलेजांत एक वर्ष काढल्यावर ते विलायतेस गेले, हें आपण मागें पाहिलेंच आहे. तेथें एम्. आर. सी. एस्. ची डिग्री मिळवून ते महायुद्धांत गेले. महायुद्धानंतर देखील ते फ्रान्समध्यें काम करीत होते. तितक्यांत हिंदुस्थानांत सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. येथून पाठविलेलें एकही पत्र त्यांच्या हातीं लागूं देण्यांत येत नव्हतें. त्यांनीं स्वदेशीं परत येण्याचा प्रयत्न केला पण परत फिरण्याची व्यवस्था करून देतील तेव्हां ना ? परवानगी मिळविण्यांतच कित्येक महिने निघून गेले आणि १९२० मध्यें त्यांना एकदांचें घरीं येण्यास मिळालें. याप्रमाणें जेव्हां त्यांचे वृद्ध वडील, बंधु आणि दुसरे आप्तइष्ट सगळे तुरुंगांत होते तेव्हां डॉक्टर खानसाहेब फ्रान्समध्यें ब्रिटिश सरकारची नोकरी करीत होते आणि देशांत काय चाललें आहे, याची त्यांना वार्ता देखील लागूं देण्यांत येत नव्हती. घरीं परत आल्यावर सर्व समाचार कळतांच त्यांनीं राजीनामा दिला, तोसुद्धां मोठ्या मुष्किलीनें मंजूर झाला.

राजीनामा दिल्यानंतर डॉक्टरसाहेबांनीं पेशावरांत आपला धंदा सुरू केला. धाकट्या बंधूनीं तर राष्ट्रीय सभेचें देशसेवेचें आधींच व्रत घेतलें होतें. हें व्रत घेण्यासाठीं ईश्वरानें त्यांचे हातून कठीण तपश्चर्याही करून घेतली होती. एकदां गांधीजींजवळ त्या वेळच्या गोष्टी सांगत असतां त्यांनीं म्हटलें, " महात्माजी, संकटें सहन करण्यांतच पुष्कळ शिक्षण मिळतें. ऐषआराम भोगावयाला मिळते तर माझें काय झालें असतें तें सांगणें कठीण आहे. परंतु कांहीं महिने सक्तमजूरी भोगली तेव्हां माझे डोळे उघडले. पुढच्या तुरुंगवासांत

मला फार दुःख भोगावें लागलें नाहीं. पहिल्या व दुसऱ्या तुरुंगवासाशीं तुलना करतांना १९३० चा व नंतरचा तुरुंगवास फारच सोपा गेला असें म्हटलें पाहिजे. पण ती भयंकर सक्तमजूरी प्रथम मिळाली हीच खुदाची मोठी मेहरबानी होती. तिनेंच माझ्या भावि आयुष्याचा पाया घातला."

(२)

पण आपण पुढें जाऊं या. १९२० सालीं खानसाहेब नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत प्रतिनिधि म्हणून गेले, खिलाफतीच्या चळवळींतही मोठाच भाग घेतला, आणि हजारों मुसलमान हिंदुस्थानांतून हिजरत करून अफगाणिस्थानांत जाण्यास निघाले त्यांमध्यें तेही एक होते. हिजरतींत इतकी विटंबना झाली कीं पुष्कळांना परत फिरणें भाग पडलें आणि पुष्कळ अफगाणिस्तानांत जाऊन परत आले. मोठे बंधु याविषयीं एकदां बोलत असतां म्हणाले, " ही हिजरत झाली नसती तर बरें झालें असतें. माझ्या वडिलांचें वय त्या वेळीं जवळजवळ ९० वर्षांचें असेल तेसुद्धां त्या वेळीं हिजरत करण्यास तयार झाले; पण मीं विरोध केला. स्वतःच्या प्रकृतीसाठींच केवळ नव्हे तर घरची मिळकत व शेतीवाडी यांचा सत्यनाश होऊं नये यासाठीं देखील त्यांनीं घरीं राहणें अवश्य आहे अशी त्यांची समजूत घेली. मोठ्या शिकस्तीनें त्यांची समजूत पडली; कारण वयाला ९० वर्षें झालीं असलीं तरी त्यांचें शरीर आमच्यापेक्षां अधिक बळकट होतें. त्या वयांतसुद्धां ते कित्येक मैल चालू शकत." या हिजरतीचें वर्णन इतकें पुरे, अधिक तपशीलांत जाण्याचें कारण नाहीं. धाकट्या बंधूची एक गोष्ट मात्र येथें दाखल करण्यासारखी आहे. हिजरत करीत असतां त्यांना रस्त्यांत अनेक पीर, फकीर भेटले. फकिरी घेऊन भजन करीत बसणें यापेक्षां देश व समाज यांसाठीं फकीरी घेऊन दोहोंची सेवा करणें हीच ईश्वराची खरी सेवा होय असें एकदां एका पीराला ते सांगूं लागले. पीरांच्या बऱ्याच नायकांचा यामुळें त्यांच्यावर घुस्सा झाला आणि त्यांतून जेमतेम निभावले:!

१९२१ मध्यें खान अब्दुल गफ्फारखान यांस फिरून तुरुंगांत जावें लागलें. नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत असहकारितेचा ठराव झाला. १९२१ हें वर्ष तर एक कोट रुपये गोळा करण्यांत, राष्ट्रीय शाळा स्थापण्यांत आणि दुसऱ्या

विधायक कार्यक्रमांत गेले. १९२२ च्या सुरवातीस गांधीजी सत्याग्रह जाहीर करतां करतांच पकडले गेले. त्यांनीं राष्ट्राला विधायक कार्यक्रमाचा संदेश दिला. पण सरहद्द प्रांतांत तर कोठल्याही प्रकारचें विधायक कार्य करण्याची देखील मनाईच होती. खानसाहेबांनीं नागपूरहून परत येतांच उतमानझाईत " आझाद शाळा " नांवाची राष्ट्रीय शाळा स्थापिली आणि प्रांतांत ठिकाठिकाणीं तिच्या शाखा स्थापण्याचें तें प्रयत्न करूं लागले. हें सरकारला असह्य झालें. प्रांतांत या कामासाठीं ते फिरत असतां त्यांना हरकत करण्यांत आली. गुजरातेंत काकासाहेब, इन्दुलाल याज्ञिक वगैरेंजवळून जामीन मागण्यांत आला. व त्याचप्रमाणें चांगल्या वर्तणुकीबद्दल त्यांचेकडून जामीन मागण्यांत आला. खानसाहेब थेडेच जामीन देणार? त्या वेळीं सर जॉन मेफी हे सरहद्द प्रांताचे चीफ कमिशनर होते. त्यांनीं खानसाहेबांच्या वडिलांशीं वजन खर्चून पाहिलें. वडिलांचा राजदरबारीं चांगला संबंध होताच. सर जॉन मेफी यांनीं सांगितलें. " ही सरकारविरुद्ध असलेली शाळा बंद करवा म्हणजे झालें. " दुसरे कोणीच या कामांत पडत नाहींत, तर तुमच्याच मुलाला या शाळेचें वेड कशाला लागलें आहें? भोळ्या बापानें मुलाजवळ गोष्ट काढली, भल्या माणसावर मुलाचा प्रभाव अधिक पडेल कीं सरकारी अमलदाराचा? मुलानें बापाची समजूत केली, " अब्बाजान, समजा, सगळयांनींच नमाज पढण्याचें बंद केलें, तर तुम्ही मला असें सांगाल का कीं, तूंसुद्धां नमाज पढण्याचें बंद कर? कीं, दुसरे वाटेल तें करूं देत, तुला आपल्या कर्तव्यांतून मुक्त होण्यास नमाज पढलीच पाहिजे असें सांगाल?

" नाहीं तर! " बापानें म्हटलें, " जें आपलें पवित्र कर्तव्य आहे तें कसें सोडतां येईल? दुसरे वाटेल तें करीनात, आपण तें सोडतां कामा नये."

" तर मग अब्बाजान, हें जें राष्ट्रीय शिक्षणाचें काम मीं हातीं घेतलें आहे तें एक धार्मिक कर्तव्य आहे. जर नमाज सोडतां येईल तर हें काम सोडतां येईल."

" तुझें म्हणणें खरें आहे, " असें म्हणून बापानें सर जॉन यांना तसें उत्तर पाठविलें. सर जॉनसाहेबांची मेहनत निष्फळ झाली, त्यांनीं खानसाहेबांवर खटला करण्याचा हुकूम दिला आणि खानसाहेबांना पठाण बालकांना राष्ट्रीय शिक्षण दिल्याबद्दल तीन वर्षांची सजा झाली.

१९१९ सालीं ज्या शिक्षणाची सुरुवात झाली होती तें शिक्षण या तुरुंगवासांत पूर्ण झालें. या तुरुंगवासाची कथा रोमांचकारी आहे. अंधारी कोठडी, पायांत बेडी, चक्की पिसणें आणि याशिवाय वाटेल तें काम! तरीही मॅजिस्ट्रेटनें त्यांना अंधारी कोठडीची सजा दिली नव्हती किंवा पायांत बेडी घालण्याची शिक्षाही सांगितली नव्हती! बदमाष कैद्यांना इतरांपासून वेगळें ठेवण्यांत येतें आणि त्यांना पायांत बेडी ठोकण्यांत येते, या शिरस्त्याप्रमाणें त्यांना बदमाष कैद्यासारखें ठेवण्यांत आलें. कदाचित् या सर्वांचा परिणाम होऊन घाबरून माफी मागतील तर बरें! पण त्यांनीं शरीरानें किंवा मनानेंही माफी मागितली नाहीं. ५५ पौंड वजन घटलें, दातांचा रोग उद्भवला आणि सांधे दुखूं लागले, पण त्यांच्या उत्साहाला सीमा नव्हती. सर जॉन मेफी यांनीं अजून आपले प्रयत्न सोडले नव्हते. तुरुंगांत त्रास व बाहेरून दाब याप्रमाणें साम व दंड या दोहोंचा प्रयोग चालू होता. कायदेमंडळाचे सभासद खानबहादुर अबदुर रहीमखान यांना सर जॉन साहेबांनीं एकदां तुरुंगांत खानसाहेबांच्या भेटीस पाठविलें आणि त्यांच्याबरोबर असा निरोप, पाठविला कीं, उतमानझाईची शाळा अस्तित्वांत असली तरी हरकत नाहीं, पण प्रांतांतून प्रवास न करण्याचें वचन खानसाहेब देतील तरी देखील पुष्कळ आहे. एवढें वचन दिलें तरी त्यांना ताबडतोब सोडून देण्यांत येईल. खानसाहेबांना अशा रीतीनें सुटण्याची मुळींच गरज नव्हती! सुटले असते तर जे अमूल्य अनुभव त्यांना या तुरुंगवासांत मिळाले ते ते कोठून मिळाले असते?

या तुरुंगवासांत जीं संकटें त्यांनीं सहन केलीं तशीं संकटें दुसऱ्यांनीं देखील सहन केलीं असतील, पण तेवढीं संकटें सहन करीत असतां सत्यपालन इतक्या कडक रीतीनें क्वचितच दुसऱ्या कोणीं केलें असेल. ते शूर कैदी तर होतेच, पण शिवाय आदर्श कैदीही होते. तुरुंगांच्या एकही नियमाचा ते स्वतः भंग करीत नसत; इतकेंच नव्हे तर इतरांनीं भंग केला तर तेंही त्यांना सहन होत नसे. अमलदारांजवळ त्यांनीं कृपेची याचना कधीं केली नाहीं किंवा त्यांनीं मेहेरबानी दाखविली तरी तिचा स्वीकार केला नाहीं. स्वतःसाठीं एकही नियम सौम्य करण्यांत यावी अशीही इच्छा त्यांनीं कधींच केली नाहीं. पुष्कळदां जेलचे अधिकारी स्वतः अनेक सवलती देण्यास तयार होते,

सं. ... क्र.

पण हे त्यांना तसें न करण्याबद्दल आग्रह करीत. पुष्कळ कैदी व पिवळ्या पगडीचे वार्डर यांना चक्कीचें काम आपणाकडे घेण्याची इच्छा होई पण तें-सुद्धां यांना पसंत नसे. त्यांना विनवून सांगतः–' हें खोटें करणें झालें. तुम्हीं माझ्यासाठीं काम करावें व मीं २५ शेर पीठ दळलें असें लिहिण्यास सांगावें असें कसें होईल ! यापेक्षां मी जेलरसाहेबांकडूनच सवलत घेणें बरें नव्हे काय ?'

तुरुंगांत त्या वेळीं–नेहमींच्या रिवाजाप्रमाणें आणि आज देखील जशी चालत आहे त्याप्रमाणें–लांचलुचपत मोठ्या प्रमाणावर चालू असे. गरीब पोलिस वॉर्डरांचें थोड्या पगारांत पोट भरत नसे. ते कैद्यांना कांहीं सवलती देत, शिक्षेंतून माफीची शिफारस करीत आणि त्यांच्याकडून पैसा उकळीत. या सर्व गोष्टी हळू हळू खानसाहेबांच्या कानीं येत. ते कैदी व पोलीस वॉर्डर या दोघांनाही उपदेश करीत. एकदां एका कॉन्स्टेबलनें काकुळतीच्या स्वरांत त्यांना म्हटलें. "तुम्ही सांगतां तें खरें; पण आमच्यासारख्या लेंकुरवाळ्या माणसांच्या पोटाची खाई कशी भरावी ?" खानसाहेबांनीं उत्तर दिलें. "तें मला समजत नाहीं. तूं करतोस तें पाप आहे हें उघड आहे. तुला हें समजलें म्हणजे पुष्कळ झालें." बिचाऱ्या कॉन्स्टेबलला पश्चात्ताप झाला व त्यानें राजीनामा दिला. त्यायोगें अधिकाऱ्यांची स्थिति मात्र कठीण होऊं लागली. खानसाहेबांनीं कांहीं सरकारी नोकरी म्हणून त्यानें नोकरी सोडावी असा प्रयत्न केला नव्हता. नोकरी सोडण्याची सल्लाही दिली नव्हती, मात्र पाप-मार्गानें पोट भरणें सोडून देण्यास सांगितलें होतें. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांस हें माहीत असलें तरी सरकारी नोकरांवर अशा प्रकारें खानसाहेबांचा नैतिक प्रभाव पडूं लागला तर त्यांना कोठवर सहन होईल ?

शेवटीं त्यांना पंजाबांतील एका तुरुंगांत पाठविण्यांत आलें. त्यांचा त्या-पासून फायदाच झाला. सरहद्दींतील तुरुंगांत फक्त सामान्य कैदीच त्यांचे जोडीदार होते, पंजाबांतील तुरुंगांत त्यांना राजकीय कैद्यांबरोबर ठेवण्यांत आलें. येथेंसुद्धां खान अबदुल गफ्फारखान यांचा जीवनक्रम पूर्ववत् चालू राहिला. तेथें सामान्य कैद्यांना उपदेश करीत. येथें राजकीय कैद्यांनाही उप-देश करूं लागले. पण ते बापडे अशिक्षित अडाणी लोक यांना पूज्य मानून यांचें ऐकत, हे विद्वान् लोक यांचें कसचें ऐकणार ? ते यांच्याशीं तुच्छपणानें

वागूं लागले. पण यांना त्याची पर्वा नव्हती. त्या वेळची हकीकत सांगतांना ते मला म्हणाले, " आपल्या लोकांस माझें म्हणणें आवडतच नसे. मी त्यांना सांगत असे कीं एकदां तुम्ही सत्याच्या शिखरावरून गडगडूं लागला कीं, मग कोठें जाऊन पडाल तें सांगतां येणार नाहीं, आणि जे लोक अधिकाऱ्यांची मर्जी संपादून नियमबाह्य वस्तु मिळवीत त्यांना पुढें पुढें स्वाभिमानाचाही त्याग करण्यांत मुळींच संकोच वाटत नसे. हें मी प्रत्यक्ष पाहतच होतों.

परंतु या तुरुंगांतील अनुभवांपैकीं एक गोष्ट लिहिण्याची राहिली आहे. हा सर्वच काळ इतक्या अनुभवांनीं भरलेला आहे कीं, खानसाहेब जर कोणी लेखक असते तर आपल्या अनुभवांचें एक पुस्तक त्यांनीं लिहिलें असतें. पंजाबांतील तुरुंगांत हिंदु व शीख मित्रांशीं त्यांचा निकट संबंध आला. या संबंधाचा त्यांनीं चांगला फायदा घेतला, तो त्यांच्याच शब्दांत सांगतों. "गीता प्रथम मीं येथें वाचली. ( शीखांचा ) 'ग्रंथसाहेब' आणि बायबल हीं सुद्धां येथेंच मीं प्रथम वाचलीं. परधर्मांचे ग्रंथ वाचले नाहींत तर परधर्म व परधर्मी लोक यांचें ज्ञान कसें होऊं शकेल? पण मला सांगितलें पाहिजे कीं, मी गीता वाचली पण मला ती समजली नाहीं. मीं ती दोन तीनदां वाचली पण कदाचित् त्या वेळीं गीता माझ्या बुद्धीच्या आणि वृत्तीच्या दृष्टीनें माझ्या आवाक्याबाहेरची असेल. १९३० मध्यें जेव्हां अंदमानांतून परत आलेल्या पंडित जगतरामांची भेट झाली तेव्हां गीता समजूं लागली. ते गीतेचे मोठे रसिक होते व त्यांनींच मला तिचें रहस्य समजावून दिलें."

या कडक व्रताचरणामुळें त्यांचें " सरहद्द गांधी " असें नांव पडलें असें म्हणतां येईल. गांधीजींविषयीं शक्य तितकी माहिती त्यांनीं मिळविली होतीच. त्यांच्या तत्त्वांचे ते कडक रीतीनें पालन करीत होते. आणि गांधीजींचें नांव घेणाऱ्या सर्व लोकांना त्या तत्त्वांचें आचरण करण्याचा उपदेश करीत असत. या तुरुंगवासांत त्यांनीं आठवड्यांतून एक दिवस उपवास करण्याची संवय लावून घेतली इतकेंच नव्हे तर एक दिवस मौनपण धारण करूं लागले. मग त्यांचें 'सरहद्द गांधी' असें नांव पडल्यास काय नवल? त्यांच्या मित्रांनीं आणि चाहत्यांनीं त्यांना दिलेलें हें नांव त्यांच्या टीकाकारांनीं व्यंगोक्तीनें उचललें. उलटपक्षीं 'सनातनी' लोक गांधीजींना जशीं अनेक नांवें देतात

त्याचप्रमाणें त्यांचेच धर्मबंधु मुसलमान बंधु त्यांना तिरस्कारानें “हिंदु” म्हणूं लागले आणि इतर वाईट नांवें देऊं लागले.

खिलाफत चळवळींत त्यांनीं चांगलाच भाग घेतल्याचें मीं मागें सांगितलेंच आहे. पण नंतर कित्येक खिलाफत कार्यकर्त्यांचें कामकाज त्यांना पसंत न पडल्यामुळें त्यांना खिलाफत समितींतून निघणें भाग पडलें. १९२४ ते २९ हा हिंदुमुसलमानांतील वैमनस्याच्या विकोपाचा काळ असें म्हणतां येईल. पण या दोघांही बंधूंना त्या काळांतील द्वेष व कटुता यांचा स्पर्श झाला नाहीं. या दुष्ट कलहांत त्यांना खेंचण्याचा प्रयत्न झाला, पण ते ढळले नाहींत. याविषयीं त्यांनीं बऱ्याच गोष्टी मला सांगितल्या आहेत. एकदां स्वतः या बाबतींतील आपले विचार त्यांनीं मोठ्या तीव्रतेनें मला सांगितले. “मी धर्माची किंमत लोकसंख्येवरून करीतच नाहीं, धर्माची किंमत वर्तनावरून ठरते. इस्लाम म्हणजे अमल, इस्लाम म्हणजे यकीन, इस्लाम म्हणजे मुहब्बत. अमल, यकीन व मुहब्बत याशिवाय मनुष्य नांवानें मुसलमान असला तरी तो खराखुरा मुसलमान नव्हे. एकाच अल्लाची प्रार्थना व पवित्र कृत्यें इतकें केलें कीं मनुष्याला मोक्ष मिळतो असें ‘कुराने शरीफ’मध्यें स्पष्ट लिहिलें आहे.”

आणि तरी देखील ज्यांना कर्मठ मुसलमान म्हटलें जातें त्यांच्यापेक्षां हे जरासुद्धां कमी धार्मिक नाहींत. समजूं लागल्यापासून खान अबदुल गफ्फारखान यांनीं एकही नमाज चुकविली नाहीं. मनुष्य मात्राला बंधु समजण्याची इस्लामची आज्ञा त्यांच्याप्रमाणें धर्मनिष्ठेनें पाळणारा एखादाच मुसलमान असेल. वडील बंधु अकरा वर्षें परदेशांत राहून आल्यामुळें व अनेक परधर्मी मित्रांच्या निकट सहवासामुळें त्यांच्या राहाणींत धाकट्या भावाइतका नेमनिष्ठपणा दिसून येत नाहीं; पण पित्याची धर्मवृत्ति व श्रद्धाळु हृदय हीं दोघांही भावांमध्यें सारखींच उतरलीं आहेत. पुष्कळदां विनोदानें वडील बंधु म्हणतात, “माझ्या वतीनें माझा भाऊच नमाज पढतो.” परंतु धर्म किंवा नीतिविषयक बेपर्वाई त्यांच्या जीवनांत कोठेंही दिसून येणार नाहीं.

गांधीजींच्या शेवटच्या उपवासानंतर लगेच ते वर्ध्यास आले. एकदां उपवासाची गोष्ट बोलत असतां मीं त्यांना विचारलें. “कित्येक मुसलमान गांधीजींच्या उपवासाबद्दल टीका करीत असतांना म्हणतात कीं, हा खरा उपवास नव्हे, हा उपवास इस्लामच्या विरुद्ध आहे. इस्लामला जो पसंत आहे

तो प्रकार म्हणजे मुसलमान रोजे पाळतात तसला, हें म्हणणें तुम्हांला कितपत योग्य वाटतें ?" दोघांनींही उत्तर दिलें, "हें लोक खरा उपवास कशाला म्हणतात तें जाणण्याची आमची इच्छा आहे." माझ्याजवळ पडलेल्या वर्तमान-पत्रावरून मीं त्यांना सांगितलें कीं, या लोकांच्या मताप्रमाणें दिवसा निर्जल उपवास करणें व सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत खाणेंपिणें करणें हा खरा उपवास आहे.

खान अबदुल गफ्फारखान चिडून म्हणाले, "या गोष्टींत अर्थ नाहीं. गेल्या ऑगस्टमध्यें गांधीजींनीं सात उपवास केले तेव्हां मीं सुद्धां सात पुरे उपवास केले होते, रात्रीं फक्त पाणी व मीठ घेत असें. आजकाल मुसलमान लोक जे उपवास करतात तेच खरे उपवास आहेत असे म्हणणें म्हणजे इस्लामची थट्टा करण्यासारखें आहे. पैगंबरसाहेब अहोरात्र पूर्ण उपवास करीत याविषयीं मला शंका नाहीं. त्यांनीं रात्रीं खाण्याची परवानगी दिली ती मनुष्याच्या दुबळेपणाचा विचार करून. पैगंबरसाहेबांना अन्नाची आवश्यकता वाटत नसे. कारण त्यांनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें अल्ला त्यांना ( आध्यात्मिक ) अन्न पाठवीत असे. हें अन्न सामान्य लोकांना मिळत नाहीं. कारण त्यांना अल्लाविषयीं तितका यकीन वाटत नाहीं–तितकी श्रद्धा नसते. मी मौन पाळतों व गीता वाचतों यामुळें मी हिंदु झालों आहे असें म्हणणाऱ्यांच्या टीकेसारखीच तुम्हीं वाचून दाखविलेली ही टीका आहे."

## प्रकरण सहावें

# त्यांचे धर्मविचार

दोघां भावांच्या धर्मविचारांना आतां एक स्वतंत्र प्रकरण मला दिलें पाहिजे. मागल्या प्रकरणांत देखील प्रसंगोपात्त मीं उल्लेख केला आहे. तुरुंगांतील आपल्या वर्तनांत व त्यानंतर सार्वजनिक जीवनांत खान अबदुल गफ्फारखान यांनीं आदर्श मुसलमान या दृष्टीनें वागण्याचा कसा प्रयत्न केला हें आपण पाहिलें. या प्रयत्नांचे मागें धर्माच्या स्वरूपाविषयींचें त्यांचें खरें ज्ञान भरलें आहे ही गोष्ट थोडी विस्तारानें या प्रकरणांत पाहूं.

हे दोघे बंधू हिंदु–मुसलमान ऐक्याचे तीव्र पुरस्कर्ते कसे बनले हे पण त्यावरून आपणांस कळून येईल.

एकदां गांधीजींनीं सहज धाकट्या भावाला विचारलें. "वडील बंधूंची पत्नी ख्रिस्तीच आहे कीं तिनें मुसलमानी धर्म स्वीकारला आहे?" त्यांनीं उत्तर केलें. "ती ख्रिस्ती आहे कीं मुसलमान आहे तें मला ठाऊक नाहीं. तिला कधीं मुसलमान करून घेण्यांत आलें नाहीं इतकें मी सांगूं शकेन. आणि जो धर्म तिला पाळावयाचा असेल तो पाळण्याचें तिला पूर्ण स्वातंत्र्य आहे याबद्दलही मला शंका नाहीं. मीं तर तिला या बाबतींत कधींच कांहीं विचारलें नाहीं. विचारण्याची जरूरीही मला भासली नाहीं. पति-पत्नींना आपआपला धर्म पाळण्याचें स्वातंत्र्य कां असूं नये? लग्न केल्यानें धर्म बदलण्याची आवश्यकता कां उत्पन्न व्हावी? माझ्या वडील बंधूंचा मुलगा सध्यां लंडनची मॅट्रिक परीक्षा पास होऊन ऑक्सफर्डला गेला आहे. तो एका पत्रांत लिहितो कीं, "दुसरे विद्यार्थी मला ख्रिस्ती समजतात. आणि त्यांना काय सांगावें तेंच मला कळत नाहीं!"

याचें गांधीजींना आश्चर्य वाटलें. त्यांनीं विचारलें, "तुमच्या भावजयीविषयीं तुम्ही जें सांगतां त्याचें आश्चर्य वाटतें. पण हे तुमचे वैयक्तिक विचार म्हटले पाहिजेत. दुसरे पुष्कळ मुसलमान या विचाराचे नाहींत हें तुम्हांला ठाऊक आहे ना?"

" आहे ठाऊक, पण तसें पाहूं गेलें असतां इस्लामचें खरें रहस्य जाणणारा मुसल्मान लाखांत एखादाच मिळेल. यामुळेंच वेळोवेळीं आपल्यामध्यें भांडणें होत असतात आणि स्वार्थी व लुच्चे लोक भोळ्या लोकांना भुरळ पाडून, त्यांच्यांत लढाई लावून आपला स्वार्थ साधतात. आज तर आपली मजल येथ-पर्यंत गेली आहे कीं, लहानसान गोष्टीवरून आपण एकमेकांना शिवीगाळी देतों आणि आपसांत कलह करून मरतों. एक लहानसें उदाहरण देतों. १९३० त मी 'गुजरात' तुरुंगांत होतों तेव्हां मीं असा विचार केला कीं, हिंदुमुसल-मानांनीं एकमेकांस अधिक चांगल्या रीतीनें ओळखावें यासाठीं हिंदूंनीं कुरानेशरीफचा अभ्यास करावा व मुसलमानांनीं भगवद्गीतेचा अभ्यास करावा, आणि दोन्ही वर्ग निष्णात माणसांकडून घेतले जावे. कांहीं दिवस हे वर्ग ठीक चालले, पण हळू हळू त्या वर्गांत जाणाऱ्यांची संख्या इतकी कमी होत गेली कीं शेवटीं ते बंद करावे लागले. शेवटीं गीतेच्या वर्गांत फक्त मी एक-टाच राहिलों व कुरानेशरीफच्या वर्गांतसुद्धां एकच विद्यार्थी राहिला, त्याचें नांव आतां मला आठवत नाहीं. परंतु अशा रीतीनें जे आम्ही शेवटपर्यंत चिकटून राहिलों ते टीका, तिरस्कार व थट्टा यांना पात्र झालों. त्यांच्या दृष्टीनें मी 'हिंदु' बनलों होतों व तो दुसरा गृहस्थ 'मुसलमान' बनला होता!"

" पण माझा गीताभ्यास तर चालूच राहिला आणि मीं दोनतीनदां गीता वाचली. मीं तुम्हांला सांगितलेंच आहे कीं पंडित जगतरामजवळून मी तिचें रहस्य समजून घेतलें. प्रत्येक धर्मांत त्या त्या धर्माच्या अनुयायास चैतन्य, आश्वासन व शांति मिळेल इतकी सामुग्री आहे असें माझें ठाम मत आहे. या सत्याचा अस्वीकार हेंच आपल्या बहुतेक भांडणांचें मूळ आहे. कुरानेशरीफांत अशीं स्पष्ट वचनें आहेत कीं, प्रत्येक समाजामध्यें जागृत कर-णारे किंवा मार्ग दाखविणारे (अवतार) अल्ला पाठवीत असतो, आणि ते लोक त्या त्या समाजाचे पैगंबर बनतात. या जागृत करणाऱ्या लोकांचीं वचनें पवित्र ग्रंथांत–पाक किताबांत–एकत्रित केलेलीं असतात, अर्थात् ज्या ज्या लोकांजवळ असा धर्मग्रंथ असेल त्या त्या लोकांस '–अहले किताब' म्हणतात. कुराणांत यहुदी व खिस्ती या लोकांस याप्रमाणें अहले किताब (म्हणजे ज्यांच्यांजवळ पवित्र धर्मग्रंथ आहेत असे) म्हटलें आहे. पण यहुदी व खिस्ती लोकांपेक्षां हिंदु कांहीं कमी अहले किताब आहेत असें नाहीं."

" पण मुसलमान मौलवी तसें मानीत नाहींत ना ! "

" पुष्कळजण मानीत नाहींत. पण ते लोक शब्दालाच चिकटून बसतात, कुराने‌शरीफांतील वचनांचें अंतरंग पहात नाहींत. या वचनांत ज्या लोकांचीं नांवें दिलीं आहेत तीं उदाहरण म्हणून दिलीं आहेत, नांवांची पुरी यादी दिली नाहीं. या वचनांत शुद्ध तत्त्व दाखविलें आहे तें हेंच कीं, ज्या ज्या लोकांजवळ आपले स्वतःचे धर्मग्रंथ आहेत ते सगळे ' अहले किताब ' समजावे. आणि या संज्ञेत आपल्या धर्मग्रंथांच्या आधारें स्वतःचे आचार व विचार चालविणाऱ्या प्रत्येक समाजाचा समावेश होतो अशी माझी पूर्ण खात्री आहे. मी याच्याही पुढें जाऊन म्हणेन कीं, प्रत्येक धर्माचें मूळ आधारभूत सिद्धान्त एकच आहे, फक्त आचारांचें स्थूल स्वरूप वेगवेगळें आहे, कारण जो धर्म ज्या भूमींत प्रगट होतो त्याला त्या भूमीचा सुगंध व माधुर्य प्राप्त होतें.

"एक साधें उदाहरण घेऊं. इस्लाम व हिंदुधर्म दोघेही स्वच्छतेबद्दल पूर्ण आग्रह राखतात, स्वच्छतेच्या सिद्धान्ताबद्दल या दोन्ही धर्मांत भेद होणें शक्यच नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे; पण आचारांत भेद आहे. इस्लाम सांगतो सुकलेलें दांतण वापरा, हिंदुधर्मामध्यें नुकतेंच कांपलेलें दांतण वापरण्याची प्रथा आहे. हिंदुधर्मांत रोज तर दोनतीनदाही स्नान करण्याची आज्ञा आहे, तर इस्लाम म्हणतो, कांहीं नाहीं तरी आठवड्यांतून एकदां तरी करा. यावरून काय दिसतें ? इतकेंच कीं हिंदुधर्म गंगासिंधूच्या ' सुजला ' भूमींत प्रगट झाला, आणि इस्लाम अशा मरुभूमींत उदय पावला कीं, जेथें कित्येक दिवस पाण्याचा थेंब मिळणेंही मुष्कील. पण याचा अर्थ असा थोडाच होतो कीं, मुसलमान रोज स्नान करतील व ताजे दांतवण वापरतील तर मुसलमान राहणार नाहींत किंवा इस्लामच्या विरुद्ध त्यांचें वर्तन होईल ? प्रत्येक धर्म ज्या ज्या लोकांत व ज्या ज्या परिस्थितींत उत्पन्न झाला त्या त्या लोकांच्या व परिस्थितीच्या आवश्यकता त्यानें भागविल्या. यामुळेंच आचारभेदांना भरपूर अवकाश आहे. म्हणून मी तरी कोणाचें धर्मांतर करण्याचा प्रयत्न मुळींच करणार नाहीं. सर्व जगाचा एक धर्म होईल असा समय कधींच येणार नाहीं. प्रत्येक समाजानें आपापल्या धर्माचें द्वारानेंच आपली उन्नति करून घेतली पाहिजे. एका समाजानें दुसऱ्या समाजावर आपला धर्म लादण्याचा प्रयत्न करणें हें निरर्थक आहे."

या वचनांतून केवळ परधर्मसहिष्णुताच नव्हे तर परधर्माविषयीं जो आदर भरलेला आहे तो हिंदुमुसलमानांच्या ऐक्याच्या शुद्ध उपासकाला शोभेल असाच आहे. सर्व ठिकाणीं याचाच प्रचार करण्याचा प्रयत्न या दोघाही भावांनीं केला आहे. याचा कोणीं असा अनर्थ करूं नये कीं, हिंदुमुसलमानांचे आकार वेगळे तेव्हां हिंदुमुसलमानांत प्रत्येक बाबतींत उत्तरदक्षिण ध्रुवाएवढें अंतर असलेंच पाहिजे. आज पाण्यासारख्या पवित्र वस्तूंतसुद्धां 'हिंदु पाणी' आणि 'मुसलमान पाणी' असे भेद पडले आहेत. प्रत्येक स्टेशनावर या आरोळ्या कान आणि हृदय यांना चिरून टाकितात. हे बंधू जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांनीं देखील या गोष्टीस विरोध केला आहे. "हिंदु किंवा मुसलमान एकमेकांच्या हातचें स्वच्छ भांड्यांत भरलेलें निर्मल पाणी प्यालें तर त्यांत कोणा हिंदु मुसलमानाला कोणती हरकत आहे हें आम्हांला समजतच नाहीं."

तरीसुद्धां या बाबतींत जबरी असूं नये. दोघांही भावांना विरोधकांच्या भावनेबद्दल इतका आदर वाटतो कीं, कोणत्याही प्रकारची जबरदस्ती त्यांना सहन होत नाहीं. १९२२ मध्यें खान अबदुल गफ्फारखान हे डेरागाझी येथील तुरुंगांत होते. त्या वेळच्या कित्येक आठवणी मीं मागें सांगितल्याच आहेत. प्रस्तुत प्रश्नाशीं संबद्ध असलेली एक आठवण येथें देणें अस्थानीं होणार नाहीं. मांसाहार न करणाऱ्या हिंदु मित्रांच्या भावनांना मान देऊन खानसाहेबांनीं मांस सोडून दिलें होतें. सहा-सात महिन्यानंतर त्यांची प्रकृति फार ढांसळत चाललेली पाहून डॉक्टरांनीं 'तुम्ही आपल्या अन्नांत मांस घेतलेंच पाहिजे, नाहीं तर तुम्ही आपले सगळे दांत गमावून बसाल' असा सल्ला दिला. डॉक्टरांचा सल्ला खानसाहेबांना पटला. पण मांस शिजवावें कोठें? सुपरिंटेंडटनें सांगितलें: "सामान्य सैंपाकघरांत." खानसाहेबांनीं आदरपूर्वक नकार दिला आणि म्हटलें. "जर वेगळें स्वयंपाकघर करून शिजवून देत असाल, तर बरें. निरामिष स्वयंपाकघरांत मांस शिजविणें माझ्यानें होणार नाहीं." सुपरिंटेंडंट यांना त्यांचा आग्रह समजला व ते त्याला कबूल झाले. पण दुःखाची गोष्ट ही कीं त्यांनीं अशा परिस्थितींतसुद्धां दुसऱ्यांच्या भावनांना इतका मान देऊन नंतर मांस खाण्यास सुरवात केली तरी तें कित्येक हिंदु व शीख गृहस्थांना सहन झालें नाहीं. मात्र यांच्यापैकीं कित्येकजण तर चोरून मांसाहार करण्यासही मागेंपुढें पहात नसत! खानसाहेबांनीं दुःखानें

मला म्हटलें: "हें पाहून मला त्रास होई. जर आपण बारीक सारीक गोष्टींत एकमेकांच्या भावनांना जपण्यास शिकलों नाहीं तर हिंदु-मुसलमानांचें ऐक्य निर्माण करण्यास किती काळ लागेल!"

खानसाहेबांनीं स्वतःच्या जीवनांत हें सूक्ष्म प्रेमसूत्र विणून घेतलें आहे. १९३१ त खानसाहेबांच्या घरीं देवदासभाई पाहुणचार घेत होते तेव्हां त्यांच्या घरांत मांस बिलकूल शिजविलें जात नसे. सर्व कुटुंब दहापंधरा दिवस मांसाशिवाय राहिलें. जमनालालजींच्या घरीं तें तीनचार महिने पाहुणे या नात्यानें राहिले, त्यांत एकदोनदां त्यांची प्रकृति ढांसळली. मुंबईच्या एक दोन डॉक्टरांनीं त्यांना तपासून मांसाहाराची सल्ला दिली. गांधीजींनीं त्यांस सांगितलें कीं, एखाद्या मुसलमान सद्गृहस्थाकडून मांस शिजवून त्यांच्यासाठीं आणविण्याची व्यवस्था सहज होऊं शकेल. परंतु त्यांनीं मुळींच मान्य केलें नाहीं. कितीही सोयीचें असलें तरी, जमनालालजींसारख्या वैष्णवाच्या घरांत मांसाहार करणें अयोग्य असें त्यांना वाटलें.

आजच्या बिकट परिस्थितींत हिंदु-मुसलमानांच्या एकीबद्दल त्यांना एखादे वेळीं क्षणिक निराशा वाटते; पण हें ऐक्य होणार आहे याबद्दल त्यांना शंका नाहीं. यासाठीं पुष्कळ दुःख सहन करावें लागेल आणि दोन्ही जातींच्या पुढाऱ्यांना शेवटपर्यंत बलिदानाची तयारी करावी लागेल, असें ते वारंवार म्हणतात. जेथें जातील तेथें दोघेही भाऊ आपले विचार आपल्या धर्मबंधूंना ऐकविण्यास चुकत नाहींत आणि पुष्कळदां त्यांना याबद्दल अप्रिय व्हावें लागतें.

१९३४ सालच्या अखेरच्या महिन्यांत ते हझारीबाग तुरुंगांतून सुटल्यावर जमनालालजींचे पाहुणे म्हणून वर्धा येथें राहिले होते. त्या कालांत त्यांनीं कित्येक ठिकाणीं प्रवास केला. तेथें त्यांनीं हिंदुमुसलमान ऐक्याशिवाय दुसरी गोष्ट काढलीच नाहीं आणि अनेकांच्या मेंदूत ठाणें देऊन बसलेलें वैमनस्य काढून टाकण्याचा त्यांनीं सतत प्रयत्न केला. आपल्या प्रवासाचें वर्णन करतांना एकदां धाकटे बंधु म्हणाले: "—जागीं आम्ही गेलों तेथें एक मौलवी आम्हांस भेटण्यास आले होते. हिंदु मुस्लिम ऐक्याबद्दल कशाला उगाच बोलतां?" असें म्हणून त्यांनीं मला दोष दिला. मीं त्यांचें म्हणणें समजून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांनीं मला सांगितलें: "उगाच पाणी कशाला

घुसळतां? या बूतपरस्तांशीं (मूर्तिपूजकांशीं) आमचें जमणार नाहीं. त्यांच्याशीं ऐक्य करण्याची गोष्ट बोलणें हेंसुद्धां माझ्या मतें इस्लामच्या विरुद्ध आहे."

मीं त्यांची चांगली हजेरी घेतली. त्यांना म्हटलें: "ते मूर्तिपूजक आहेत तर आपण कोण आहोंत? आपण कबरींची पूजा करतों, त्याचा काय अर्थ? ते लोकसुद्धां एकाच ईश्वराची पूजा करतात, मग त्यांना मूर्तिपूजक म्हणून त्यांची निंदा कां करावी? हिंदुमुस्लिम ऐक्य झालें नाहीं तर तें तुमच्या या असल्या कृत्यामुळेंच होणार नाहीं. आपण शुद्ध प्रयत्न करूं तर तो कधींच विफल होणार नाहीं, मात्र आपलें अंतःकरण शुद्ध असलें पाहिजे. तीं पहा शेतें, त्यांत जें बीं पडलें आहे तें आज मातींत गाडलें गेलें आहे, त्याचें कांहींच फल दिसत नाहीं. पण थोड्या काळानंतर त्याच्यांतून अंकुर येतील आणि योग्य वेळीं सर्व शेत पिकानें भरून जाईल. प्रत्येक शुभकार्यासाठीं शुभ प्रयत्न केला तर असाच परिणाम घडून येईल."

दुसऱ्या ठिकाणीं एका उर्दू वर्तमानपत्राचा मुसलमान संपादक त्यांना भेटण्यास गेला. त्यानेंहि जवळ जवळ असाच बुद्धिवाद केला. त्याचें म्हणणें सामान्यतः अशा प्रकारचें होतें. "हिंदूंवर विश्वास ठेवण्याबद्दल तुम्ही सांगतां, पण शिवाजीची गोष्ट तुम्ही विसरून गेलासें वाटतें."

वडील बंधूंनीं संपादक महाशयांना उत्तर दिलें: "म्हणजे तुम्हीच शिवाजीला ओळखतां असें दिसतें! ठीक, पण जर कोणी हिंदु मनुष्य येऊन म्हणाला कीं 'औरंगजेब कसा होता? मुसलमानांवर विश्वास ठेवण्यांत काय फायदा?' तर तुम्ही काय उत्तर द्याल? अहो महाराज, शिवाजीही गेला आणि औरंगजेबही गेला. आज त्यांची गोष्ट कशाला हवी?"

"आज मी जिवंत आहे, तुम्ही जिवंत आहां, महात्माजी जिवंत आहेत. महात्मा गांधींवर विश्वास ठेवितां येईल कीं नाहीं, सांगा पाहूं? जर ते विश्वासपात्र असतील तर कसलीच चिंता नाहीं. जर मी व माझा भाऊ विश्वासपात्र असूं तर हिंदूंना सांगूं शकूं कीं चिंता करूं नका. एखाद्या जातींतील तुम्हांला न आवडणारीं अशीं नांवें घेऊन मग त्यांवरून सर्व जातींच्या विश्वासपात्रतेबद्दल अनुमान करूं नका. जातींतील सर्वोत्तम प्रतिनिधीवरूनच जातीची किंमत ठरवा."

हरिजनसेवेच्या आपल्या चळवळीमुळें कित्येक ख्रिस्ती व मुसलमान चिड-

मराठी ग्रंथ संग्रहालय

तात. दोघांही भावांना ही चळवळ कल्याणकारी आहे याबद्दल शंका नाहीं. “ महात्माजी, तुमच्या हरिजन चळवळीबद्दलही आम्हीं पुष्कळ टीका ऐकली आहे. आपण १९३२ त मुख्य प्रधानांच्या जातिनिर्णयाविरुद्ध उपवास केलात आणि येरवड्याचा करार झाला त्याबद्दलसुद्धां आम्हीं पुष्कळ टीका ऐकली आहे. कित्येक तर असेंही म्हणूं लागले कीं, गांधीजीसुद्धां आतां जातिनिष्ठ झाले. ही टीका अगदीं अयोग्य आहे असें आम्ही नेहमीं मानीत आलों आहों आणि आम्हीं तिला विरोध केला आहे. आम्हांला ही सर्व चळवळ शुद्ध भूत-दयेची वाटते. आपल्याच धर्मबांधवांना अस्पृश्य मानणें ही कोठली रीत ? आम्हांला तर तुमचा हा उपवास फार आवडला आणि आम्हीं तुम्हांला लांब-लचक तारसुध्दां केली होती आणि तिचें उत्तरही तुम्हीं पाठविलें होतें. आतां तें उत्तर आम्हांला मिळावयाला पुष्कळ दिवस लागले ही गोष्ट निराळी ! ” असें म्हणून दोघेही खूप हंसले. दोघांही भावांची तार गांधीजींना मिळूं शकली; पण गांधीजींचें उत्तर त्या भावांना पोंचविण्यापूर्वी त्यावर अनेक संस्कार होण्याची आवश्यकता होती, त्यामुळें दिवस लागले यांत काय नवल !

पण हें थोडें विषयांतर झालें. त्यांना उपवास आवडला इतकेंच नव्हे तर दोघांनींही त्या वेळेपासून मांस सोडलें आणि उरलेल्या दीड–दोन वर्षांच्या तुरुंगवासांत ते मांसाला कधीं शिवले नाहींत. तुरुंगाबाहेरसुद्धां त्यांनीं हीच संवय चालू ठेविली आहे. फक्त बाहेर जेव्हां ते मांसाहारी कुटुंबांत पाहुणे म्हणून जातात तेव्हां किंवा एकादे ठिकाणीं अचानक गेल्यामुळें मांसाहारा-शिवाय दुसरें अन्न मिळणें शक्य नसेल अशा ठिकाणीं ते मांसाहार करतात. अबदुल गफ्फारखानांनीं तर गांधीजींच्या शेवटच्या उपवासाचे वेळीं उपवास केला इतकेंच नव्हे तर तेव्हांपासून चहा सोडून दिला. त्याग व संयम यांच्या पायावरच आपलें जीवन उभारण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे आणि अशा-प्रकारें जेव्हां जेव्हां संधि मिळाली तेव्हां तेव्हां त्यांनीं आपल्या त्यागांत कांहीं ना कांहीं प्रगति केली आहे. ते एकदां मला म्हणाले, “ मला चहाचा फारच शोक होता. मिळाला नाहीं तर डोकें दुखे आणि घेऊं लागलों म्हणजे पेल्या-वर पेले घेत असे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, मी जेव्हां उपवास करितों तेव्हां त्याची मुळींच तलफ येत नाहीं. या शेवटच्या उपवासांत मीं हें पाहिलें आणि आतां चहा सोडावयाचा असा लगेच निश्चय केला.”

या सर्व प्रकारच्या निग्रहांमुळें त्यांचें शरीर झिजलें आहे ते मर्यादेबाहेर हें सर्व करीत आहेत असें त्यांचे वडील बंधू वरचेवर म्हणतात. वडील बंधूंना वाटत असलेली चिंता स्वाभाविकच आहे; कारण एकदां ज्यांचें वजन २२० पौंड होतें, त्यांचें वजन आज १६० पौंड झालें आहे. ६॥ फूट उंचीच्या पठाणाचें एवढें वजन म्हणजे कांहींच नाहीं असें म्हटलें पाहिजे.

पण फिरून हें दुसरें विषयांतर झालें. त्यांचा इस्लामचा अर्थच संकुचित नांहीं आणि इस्लामच्या सेवेंत देशाची सेवा अंतर्भूत होतेच ही गोष्ट त्यांनीं आपल्या अनेक भाषणांत स्पष्ट करून सांगितली आहे. सन १९३१ पासून मांझा त्यांच्यांशीं परिचय झाला. त्यावेळीं मीं त्यांचीं जीं भाषणें ऐकिलीं होतीं त्यांचा आणि चार वर्षांनंतरच्या भाषणांचा ध्वनि एकच आहे. १९३१ त बारडोलींत प्रवास करीत असतां त्यांनीं मुसलमानांना उद्देशून जे शब्द उचारले ते मुसलमानांनीं हृदयांत कोरून ठेवण्याजोगे आहेत.

" राष्ट्रीय सभेचें नांव ऐकूनच माझे मुसलमानबंधु दचकतात. त्यांनीं कां दचकावें? राष्ट्रीय सभेनें मुसलमानांचें काय वाईट केलें आहे? राष्ट्रीय सभेचें ध्येय पहा. घटना पहा. नियम पहा. ही राष्ट्रीय सभा हिंदूंची आहे असें दाखविणारी एक तरी गोष्ट त्याच्यांत आहे काय? गुलाम प्रजेला मुक्त करण्याशिवाय राष्ट्रीय सभेचा दुसरा काय हेतु आहे? अन्नरहिताला अन्न आणि वस्त्ररहिताला वस्त्र देणें आणि पीडितांना व दलितांना दुःखांतून दूर करणें, याशिवाय राष्ट्रीय सभेचा दुसरा काय हेतु आहे? आतां महंमद पैगंबर साहेबांचें चरित्र पहा, इस्लामचा इतिहास पहा. पैगंबर साहेबांचें जीवन मझलूमांचें (ज्यांच्यावर जुलूम होत आहे अशांचें) रक्षण करण्यासाठीं, त्यांना सोडविण्यासाठीं होतें. मझलूमांना मुक्त करण्यासाठीं, वस्त्रहीनांना वस्त्र देण्यासाठीं, भुकेलेल्यांचें पोट भरण्यासाठीं त्यांचा अवतार झाला याविषयीं कोणाला शंका आहे! मग महासभेचें कामसुद्धां पैगंबर साहेबांच्या कामासारखेंच आहे. त्याचा तिरस्कार कशासाठीं? उलट मुसलमानांनीं तर स्वराज्याच्या लढाईत आघाडीला राहिलें पाहिजे.

" आणि मुसल्मान लढाईत भाग घेऊन काय हिंदूवर उपकार करतात! किंवा हिंदु मुसल्मानांवर उपकार करतात? मुळींच नाहीं. स्वराज्याची तहान जितकी मुसल्मानांना तितकीच हिंदूंना असली पाहिजे, जितकी हिंदूंना तित-

कीच मुसलमानांना असली पाहिजे. अधिकारी वर्ग आमच्यांत कळ लावून आमचा नाश करीत आहेत. आम्हांला म्हणतात कीं, हिंदु सुशिक्षित आहेत, धनवान् आहेत, राष्ट्रीय भावनेचे आहेत; ते हिंदु तुमच्यावर राज्य करतील, त्यांच्यापासून सावध रहा. तुम्हांला सांगतात कीं, या अफगाणी बागुलबोवा-पासून सांभाळून रहा. या लोकांना माझें असें सांगणें आहे कीं गुलामगिरी-तच आयुष्य कंठावयाचें असेल तर दूरच्या शत्रूची गुलामगिरी करण्यापेक्षां या जवळच्या शत्रूची गुलामगिरी काय वाईट ?"

# प्रकरण सातवें

## खुदाइ खिदमतगार

पुरी तीन वर्षांची सजा भोगल्यानंतर खानसाहेबांनीं आपलें राष्ट्रीय शिक्षणाचें काम पुन्हां सुरू केलें. समाजसुधारणेचीं जीं कामें तुरुंगांत जाण्यापूर्वी ते करीत होते तींच त्यांनीं पुढें चालविलीं; पण देशांतील परिस्थिति बदलल्यामुळें सरकारला त्यांच्या कामाची भीति वाटेनाशी झाली. दरवर्षी ते राष्ट्रीय सभेला तर जातच असत, पण आपल्या प्रांतांत हिंडून लोकांना जागृत करीत असत. पण आपणांला त्यांची १९३० पर्यंत माहिती नव्हती. कारण त्यांचा साधेपणा आणि शांतपणें सेवा करण्याची त्यांची वृत्ति यांमुळें त्यांचें नांव वर्तमानपत्रांतून फारसें झळकलें नाहीं. १९२१ त स्थापलेली 'आझाद शाळा' त्यांच्या तुरुंगवासांतसुद्धां नीट चालली होती ती १९३२ पर्यंत उत्तम प्रकारें चालली. १९३२ त देशांतील राष्ट्रीय शिक्षणाच्या किंवा इतर कोणत्याही क्षेत्रांत काम करणाऱ्या लहान मोठ्या कार्यकर्त्यांपैकीं एकही सरकारच्या वक्रदृष्टींतून सुटला नाहीं. अर्थात् त्यांच्या शाळेंतील सर्व शिक्षक तुरुंगात गेले आणि गुजरात विद्यापीठाप्रमाणें ही संस्थादेखील बंद झाली. पण या दहा वर्षांच्या मुदतींत ज्या पठाणांना तींत शिक्षक आणि विद्यार्थी म्हणून शिक्षण मिळालें त्यांनींच खान अबदुल गफ्फारखान यांस त्यांच्या विधायक कार्यक्रमांत मदत केली. या कार्यकर्त्यांचें एक लहानसें मंडळ आपोआप झालें होतें आणि १९२९ त त्याला स्थायी व व्यवस्थित स्वरूप देण्याचें खानसाहेबांच्या मनांत आलें तेव्हां या मंडळाला "खुदाइ खिदमतगार" हें नांव मिळालें. खुदाच्या सेवकाला मंडळाला देण्याला दुसरें नांव सुचलें नाहीं. मनुष्याच्या सेवेच्या द्वारां खुदाची खिदमत (सेवा) करणाऱ्यास यापेक्षां अधिक गोड नांव कोठून मिळणार? जगांत जन्म घेऊन जी गोष्ट मनुष्यमात्रानें केली पाहिजे, ती गोष्ट करणारा म्हणून स्वतःचें वर्णन करण्यांत अभिमान किंवा बढाई नाहीं. खिदमत-सेवा-या नांवांतच बढाई नाहीं मग खिदमतगार-सेवक-नोकर या शब्दांत बढाई कोठून येणार? शेंकडों वर्षांपूर्वी प्रभुप्रेमानें दिवाणी झालेल्या मिराबाईनें गिरि-

धारीलालप्रभूजवळ त्याचें चाकर होऊन राहण्याची आर्त विनंति केली होती. इस्लाममधील मोठमोठे पीर आणि अवलिया स्वतःला ' फकीर ' व 'खादीम' किंवा ' बंदा ' म्हणवून घेण्यांत गौरव मानीत. याचप्रमाणें आजच्या काळांतील या फकीरानें आपल्या मंडळाला " खुदाइ खिदमतगार " हें नांव दिलें. यापेक्षां अधिक सार्थ, सूचक, जबाबदारीची सतत जाणीव देणारें आणि नम्रतापूर्ण असें दुसरें कोणतें नांव असूं शकेल ?

या मंडळाचें काम आरंभीं फक्त समाजसुधारणेचें होतें. पठाणांना चोऱ्यामाऱ्या करण्यापासून परावृत्त करून त्यांच्यांत माणुसकी उत्पन्न करणें, दारूसारख्या व्यसनांपासून त्यांना अलिप्त राखणें, लग्न -कारण—आणि इतर कार्यें यांतला खर्च कमी करविणें, इत्यादि. १९२९ त या मंडळास व्यवस्थित रूप देण्यांत आलें तेव्हां त्याची चळवळ अधिक व्यापक बनली आणि राष्ट्रीय सभेच्या सर्व चळवळी या मंडळाच्या चळवळी होऊन बसल्या. खुदाइ खिदमतगार हे तर ईश्वरसेवकच राहिले, पण त्यांची निंदा करणाऱ्यांनीं त्यांना 'रेडशर्ट'—'लाल डगलेवाले'—हें नांव दिलें.

रशियाचे बोल्शेव्हिक व साम्यवादी यांचें 'लाल डगलेवाले' असें नांव जगजाहीर होतेंच, त्या नांवाशीं यांचा संबंध जोडून देऊन यांच्याविषयीं नाहक अप्रीति फैलावण्यांत आली. रशियामध्यें लाल डगला मुद्दाम पसंत करण्यांत आला होता. रक्ताच्या चिळकांड्या उडविण्यास हे लोक मागें पुढें पहात नाहींत, ही गोष्टदेखील त्यांतून प्रतीत होते. पण या खुदाइ खिदमतगारांचे लाल डगले हे त्यांच्या गरिबीचें चिन्ह होते. या लोकांचा पोषाख प्रथम स्वच्छ पांढऱ्या खादीचा होता. पण गरीब पठाण खादी रोज धुण्याचा खर्च कोठून आणणार ? म्हणून त्यांनीं कोणत्या तरी मळखाऊ रंगानें ती रंगविण्याचा निश्चय केला आणि पाहिजे तेथें मिळणारा गडद लाल रंग त्यासाठीं पसंत करण्यांत आला. खानबंधू मला सांगत होते कीं, मूळ एका पठाणानें आपल्या घरींच आपले कपडे या रंगांत रंगवून आणले, तो रंग सर्वांना आवडला आणि त्याच रंगाचा पोषाख स्वीकारण्यांत आला. पण सरहद्दीवरच्या इंग्रजांना रशियाचा बागुलबोवा जळीं स्थळीं दिसत असल्यामुळें त्यांना " खुदाइ खिदमतगार " हें गोड नांव उमजलें नाहीं किंवा त्यांनीं समजून घेण्याची खटपटहि केली नाहीं; आणि त्यांना " लाल डगलेवाले " असें तुसडें नांव दिलें.

* १९३० मध्यें राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम–परदेशी कापडावर बहिष्कार आणि तशा दुकानांवर व दारूच्या गुत्त्यांवर पहारा करणें हा मुख्यतः होता. शिस्त राखण्यासाठीं व जागोजाग शाखा उभारण्यासाठीं खिदमतगारांना रोज लष्करी रीतीनें कवाइत शिकविण्यांत येत असे. दूरदूरच्या मजला त्यांच्याकडून करविण्यांत येत आणि लष्करी तालीम देण्यांत येई. रोमरोमांत ज्यांच्या लढाई मुरली आहे अशा बलवान समाजाला लष्करी तालीम ही गोष्ट स्वाभाविक होती, पण खान अबदुल गफ्फारखान यांनीं लष्करी तालमीस जरूर अशा एका वस्तूचा पहिल्यापासूनच त्याग केला. कोणत्याही प्रकारच्या हत्यारालां–लाठीला देखील प्रतिबंध होता. मंडळांत सामील करून घेण्यापूर्वी त्यांना खालील प्रतिज्ञा कराव्या लागत.

१ ईश्वर, आपला समाज, आणि स्वदेश यांच्याशीं एकनिष्ठ राहणें व यांची सेवा करणें.

२ अहिंसा पाळणें.

३ निर्वेतन सेवा.

४ निर्भयता आणि आत्मबलिदान करण्याची तयारी.

५ निर्व्यसनी शुद्ध जीवन.

या खुदाइ खिदमतगारांचा १९३० पासून १९३३ पर्यंतचा सत्य व संपूर्ण इतिहास देणें, आज तरी जवळ जवळ अशक्य आहे. त्यांच्यावर करण्यांत आलेल्या जुलमांच्या अनेक गोष्टी अनेक मार्गांनीं आपल्या कानीं आल्या आहेत, आणि त्यासुद्धां सरकार कोठलीही हकीकत बाहेर येऊं न देण्याविषयीं अलोट प्रयत्न करीत असतांही बाहेर आल्या आहेत. दोन तीनदां प्रामाणिक व निःपक्षपाती परीक्षा करून निर्णय देणाऱ्या मंडळांनीं खरी हकीकत बाहेर आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनीं उघडकीस आणलेला वजनदार व विश्वासपात्र पुरावा सरकारनें हिंदुस्थानांत प्रसिद्ध होऊं दिला नाहीं. सरकारनें खुदाइ खिदमतगार व त्यांचे पुढारी यांविषयीं एक मोठा तोहमतनामा (Charge-sheet) प्रसिद्ध केला आहे, पण त्याला उत्तर देण्याची संधि त्यांना देण्यांत आली नाहीं किंवा निःपक्षपातानें तपास करणाऱ्या लोकांनाहि ती मिळाली नाहीं.

सन १९३० च्या एप्रिलांत पेशावरमध्यें भयंकर हत्याकांड झालें त्याची

चौकशी करण्यासाठीं कै० विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति राष्ट्रीय सभेनें नेमली होती. तिच्या सभासदांस पंजाबची सरहद्दसुद्धां ओलांडूं दिली नाहीं. त्यांनीं पंजाबच्या हद्दीवरील पुष्कळ साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या आणि सरकारी साक्षीदारांसही पुरावा देण्यासाठीं पुढें येण्यास निमंत्रण पाठविलें. सरकारी अधिकारी तर आले नाहींतच, पण पटेल कमिटीचा अहवाल देखील सरकारनें जप्त केला. १९३१ च्या अखेरीस खानबंधु आणि दुसरे पुढारी पकडले गेले आणि सरहद्द प्रांतांत ऑर्डिनन्स जाहीर करण्यांत आलें त्या वेळीं खुदाइ खिदमतगार व खान पुढारी यांची नालस्ती करणारा एक मोठा तोहमतनामा प्रसिद्ध करण्यांत आला. त्याचें खंडन करण्यास त्यांना किंवा दुसऱ्या कोणाला संधि देण्यांत आली नाहीं इतकेंच नव्हे तर फादर एल्विन हे खरी हकीकत प्रगट करण्यासाठीं सरहद्द प्रांतांत गेले असतां त्यांना थोड्याच दिवसांत तेथून हांकून देण्यांत आलें; आणि त्यांनीं प्रसिद्ध केलेलें छोटें पत्रकदेखील सरकारनें जप्त केलें. यानंतर विलायतेहून फ्रेंड्स् ऑफ इंडियाचें शिष्टमंडळ आलें. त्यांत मिस् विल्किन्सन (पार्लमेंटच्या सभासद), मि. मेटर्स व श्रीकृष्ण मेनन हे सभासद होते. त्यांनीं सर्व देशांतील मुख्य मुख्य स्थळांना भेटी दिल्या आणि अमूल्य माहिती मिळविली. सरहद्द प्रांतांत जाण्याची त्यांना बंदी करण्याचें सरकारला धैर्य झालें नाहीं. पण त्यांनीं अतिशय महत्त्वाच्या व निःपक्षपाती पुराव्यावरून तयार केलेला अहवाल हिंदुस्थानांत प्रसिद्ध होऊं शकला नाहीं. विलायतेंत प्रसिद्ध झाला पण विलायतेंतील लोकांना त्याचा अभ्यास करण्यास फुरसत कोठून मिळणार ?

आज या प्रकरणाच्या तपशीलांत उतरणें योग्य नाहीं. आपल्या कथानकासाठीं या तपशीलाची गरज नाहीं. शिवाय कायदेभंगाची चळवळ जेव्हां बेमुदत तहकूब झाली आहे तेव्हां जुन्या इतिहासाचीं जाळीं उलगडण्यांत फारसा अर्थ नाहीं, पण वरिष्ठ कायदेमंडळांत खुदाइ खिदमतगारासंबंधींच्या प्रश्नांवर चर्चा झाली तेव्हां जी थोडी हकीकत बाहेर आली ती देण्याजोगी आहे. राष्ट्रीय सभेच्या अनेक शाखा पुन्हां कायदेशीर झाल्या, पण बंगाल, मुंबई आणि संयुक्तप्रांत यांतील कित्येक, तसेंच सरहद्द प्रांतांतील खुदाइ खिदमतगारांच्या सर्व संस्था बेकायदाच राहिल्या. खुदाइ खिदमतगारांना कायदेशीर ठरविण्याचा ठराव श्री. बी. दास यांनीं मांडला. त्यावर उपयुक्त चर्चा झाली

आणि जाणण्याजोग्या कित्येक गोष्टी बाहेर आल्या त्या या प्रकरणांत नमूद करण्यासारख्या आहेत.

मरहूम मि. शेरवानी यांनीं अशा कित्येक गोष्टी सांगितल्या कीं, त्यांचा इन्कार सरकारी सभासदांसही करतां आला नाहीं.

"शेरवानीः–१९ एप्रिल १९३० रोजीं खुदाइ खिदमतगारांचें मंडळ स्थापलें गेलें आणि ताबडतोब खान अबदुल गफ्फारखान यांना पकडून नौशेरा येथें नेण्यांत आलें आणि फ्रॉंटियर क्राइम्स रेग्युलेशनच्या (जो कायदा चोर, डाकू, खुनी आणि दरोडेखोर यांच्यासाठीं करण्यांत आला आहे) ४० व्या कलमाखालीं त्यांना ३ वर्षांची सजा झाली. खटला चालविण्याची गोष्टच कशाला? जॉमीन द्या किंवा तुरुंगांत जा! यानंतर मे महिन्यांत आजच्या परराष्ट्रीय मंत्र्यांच्या (जे त्या वेळीं तेथें होते) हजेरींत शिपायांची एक तुकडी उतमानझाई येथें पाठविण्यांत आली. त्यांनीं गांवाभोंवतीं फेरी केली व त्याला वेढा घातला. लोकांना नित्यकर्में करूं दिलीं नाहींत व गुरांना चारापाण्याशिवाय तळमळावें लागलें. गांवांत खुदाइ खिदमतगारांची कचेरी होती ती ताब्यांत घेण्यांत आली आणि तिच्या वरच्या मजल्यावर जे खुदाइ खिदमतगार बसले होते त्यांना धक्के मारून खालीं ढकलण्यांत आलें. पुष्कळांचीं हाडें, फांसळ्या व पाय यांचा चुरा चुरा झाला. यानंतर परराष्ट्रीय मंत्र्यांच्या समक्ष ती कचेरी जाळून टाकण्यांत आली. परराष्ट्रीय मंत्री येथें हजर आहेत आणि त्यांना मी सांगतों कीं, ही गोष्ट खोटी असेल तर त्यांनीं माझें तोंड बंद करावें. असें असूनहि खुदाइ खिदमतगारांनीं अहिंसा गुंडाळून ठेविली होती असें सांगण्यांत येतें. या खुदाइ खिदमतगारांना बेकायदा ठरवावयाचें कीं, त्यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना?

"मि. मेटकाफ्ः—या वेळीं सरकारी फौजेनें खरोखर खेदजनक अत्याचार केले हें मला कबूल करणें भाग आहे. या सगळ्या प्रकारांबद्दल मला दिलगिरी वाटते. मी ताबडतोब तेथें गेलों आणि अधिक खूनखराबी होऊं दिली नाहीं आणि जखमी लोकांना ताबडतोब औषधोपचार करविण्याची व्यवस्था केली. हें सर्व खेदजनक झालें. पण मला हें सांगितलें पाहिजे कीं, कचेरींतून माणसांना बाहेर काढण्याचा हुकूम दिल्यामुळें शिपायांचा अपमान करण्यांत आला आणि त्यामुळें शिपाई चिडले आणि त्यांनीं खूनखराबी केली. मला

या घटनेबद्दल फारच वाईट वाटतें पण मीं ही खूनखराबी करविली हें म्हणणें मात्र अगदीं खोटें आहे."

"मरहूम शेरवानी—मी यांना स्वतःला त्याबद्दल जबाबदार धरिलें नाहीं. फौजेंतील शिपायांनीं खूनखराबी केली इतकें हे नामदार कबूल करीत आहेत यांतच मला संतोष आहे. आणखी एक घडलेली गोष्ट मी सांगतों; ती निवारण्याचा यांनीं थोडासुद्धां प्रयत्न केला नाहीं. खान अबदुल गफ्फारखान यांच्या १२।१३ वर्षांच्या मुलावरदेखील एका शिपायानें हल्ला केला; पण एका पठाण पोलिसानें मध्यें पडून त्याला वांचविलें आणि पोलीस बिचारा स्वतः जखमी झाला." (ही हकीकत मला भाई अबदुल वलीखान यांनीं स्वतः सांगितली आणि अंगावर कांटा उभा राहील असें वर्णन मीं त्यांचेजवळून ऐकिलें आहे.)

"मि. मेटकाफ्—हें खरें आहे असें म्हणण्याला मी तयार नाहीं."

"मरहूम शेरवानी–तुम्ही नसानां कां तयार, ही गोष्ट खरी आहे. आणखी थोडी हकिकत सांगतों. जून महिन्यांत तुम्ही आपल्या तुकड्या गांवांत पाठविल्या. त्या तुकड्यांनीं गांवाला वेढा घातला, लोकांना बाहेर काढलें आणि तळपत असलेल्या सूर्याच्या उन्हांत त्यांना नग्नावस्थेंत उभें केलें. एवढ्यावर संतोष न मानतां त्यांनीं त्या बिचाऱ्याच्या मानेवर जड दगड ठेविले आणि ते घेऊन एका टेकडीवर जाण्यास सांगितलें, आणि तुमच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना सांगितलें कीं, "या दगडांनीं तुमच्या पुढाऱ्यांची थडगीं बांधलीं जातील." ही तुमच्या शिपायांची अहिंसा आणि खुदाइ खिदमतगारांची हिंसा!"

या हकीकतीशीं सरकारी मि. मेटकाफ यांनीं स्वतः खुदाइ खिदमतगारांवर जे आरोप केले त्यांची तुलना करून पहा. त्यांच्याजवळ पुष्कळ उदाहरणें होतीं पण त्यांनीं वाईटांत वाईट तीन पसंत केली. हें त्यांचें भाषणः—

"मि.मेटकाफ्:–मी त्यावेळीं डॉ.खानसाहेबांचा मित्र होतो आणि अजूनही आहे अशी आशा आहे. मी त्यांना निरोप पाठविला कीं, तुम्ही व तुमचे बंधू मला भेटून जा. पण ते आले नाहींत. त्यांनीं मला कळविलें कीं, आम्ही भेटण्यास येऊं तर आमची स्थिति खराब होईल. मग दुसरें काय करण्याजोगें होतें? मीं त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेविलें, खान अबदुल गफ्फारखान

सर्व जिल्हाभर भाषणें करीत फिरत होते. त्यांतील एकाही भाषणांत आक्षेप घेण्यासारखें कांहींच नव्हते हें मी कबूल करीन. मी आतां १९२९ च्या अखेरची व १९३० च्या आरंभाची गोष्ट सांगत आहे, १९३१ ची गोष्ट सांगत नाहीं. मग त्यांनीं प्रत्येक गांवांत कमिट्या उभारल्या आणि खुदाइ खिदमतगार (त्यांच्या शब्दांत) आणि लाल डगलेवाले (आमच्या शब्दांत) यांचीं मंडळें स्थापिलीं, आणि त्यांना संपूर्ण लष्करी तालीम दिली. १९३० सालाच्या प्रारंभींच्या महिन्यांत मजकडे नेहमीं रिपोर्ट येत कीं, पुष्कळ माणसें आपण स्वतःच नेमलेल्या गणवेषधारी अधिकाऱ्यांबरोबर कूच करतात आणि शिपायांसारखी सर्व कवाईत करतात. मला आशा होती कीं, यांत कांहीं आक्षेपार्ह नाहीं, तेव्हां यांतून खूनखराबी निर्माण होणार नाहीं, म्हणून मीं कांहींच हालचाल केली नाहीं. पण यानंतर जें घडलें त्यावरून दिसून येतें कीं माझी आशा व्यर्थ होती."

(यानंतर काय घडलें तें आपण शेरवानी यांच्या भाषणांत पाहिलें!)

"लाल डगलेवाल्यांच्या अहिंसेचें काय वर्णन करावें! ते लोक जेव्हां त्यांच्यासमोर जबरदस्त तुकडी उभी करावी तेव्हां जुलमानें अहिंसा पाळीत. पुष्कळ प्रसंगीं केवळ दयेखातर म्हणूनच सरकार मोठी तुकडी पाठवीत असे, हेतु हा कीं, लाल डगलेवाल्यांना डोकें वर करण्याचें धैर्य होऊं नये.....त्यांच्या हिंसेचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं तीन मला माहीत आहेत तीं येथें देतों. माझ्या माहितींतला एक वृद्ध लंबरदार होता तो खानसाहेब होता. तो लाल डगलेवाल्यांच्या मर्जीविरुद्ध आपल्या मुलाला चरसाड्याच्या सरकारी शाळेंत पाठवीत असे. लाल डगलेवाल्यांनीं त्याला पकडलें व चरसाड्याच्या सरियाम नांवाच्या रस्त्यावर त्याला ढोपरांनीं चालावयास लावलें. हेतु हा कीं, सरकारी शाळेंत आपल्या मुलाला पाठविण्याची त्याची संवय जावी—अशा मनुष्याला जितकें खालीं पहाण्यास लावावें तितकें थोडें."

(हें उदाहरण दिलें नाहीं तोंच डॉ० खानसाहेब उभे राहिले व त्यांनीं तात्काळ विचारलें. ही खरी गोष्ट आहे का? मला या खानसाहेबांचें नांव तर सांगा!)

"मि. मेटकाफ—खानबहादुर मुहम्मद उमरखान, पेशावरचे.

"डॉ० खानसाहेब—तुम्हांला ही हकिकत कोणीं सांगितली? तुम्हीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेलें हें उदाहरण आहे काय?

"मि. मेटकाफ़:—नाहीं.

"डॉ० खानसाहेब— हे गृहस्थ (खा. ब. उमरखान) सरहद्द प्रांतांत एक मोठे खोटे बोलणारे म्हणून प्रसिद्ध आहेत हें तुम्हांला ठाऊक आहे? तुम्हांला म्हणतों कीं, तुमच्या हृदयावर हात ठेवून खरें खरें सांगा.

"मि. मेटकाफ— ते खोटे बोलणारे आहेत हें मला ठाऊक नाहीं. मला ही गोष्ट मुहम्मद उमर यांनीं सांगितली नाहीं. प्रत्यक्ष पाहिलेल्या दुसऱ्या एका माणसानें मला ही गोष्ट सांगितली होती आणि त्या माणसावर विश्वास न ठेवण्यास कांहीं कारण नाहीं."

(या उदाहरणाला किती किंमत द्यावी तें वाचकांनीं ठरवावें. दुसरें उदाहरण घेऊं.)

"मर्दान कॅन्टोनमेन्टमध्यें एक चांगला पोलीस अधिकारी होता. एकदां लाल डगलेवाल्यांच्या टोळीला कॅन्टोनमेन्टमधून जाण्याची इच्छा झाली. तेथून तिला कसें जाऊं देतां येईल? जाऊं दिलें असतें तर तेथें गोंधळ माजला असता. मि. मरफी थोडे पोलीस घेऊन गेले आणि त्यांनीं त्यांना मैदानच्या बाहेर तीन मैलांवर एका खेड्याजवळ अडवून धरलें. लष्करी तुकडीही हजर राखण्यांत आली होती, पण लष्कराचा उपयोग केला तर रक्तपात होईल म्हणून तसें न होऊं देण्यासाठीं मि. मरफींनीं स्वतःच सर्व पार पाडण्याचा निश्चय केला. लाल डगलेवाल्यांना सांगण्यांत आलें कीं, तुम्ही येथून अमुक तासांत निघून जा. पुष्कळ वेळ देण्यांत आला होता; पण दोन तासांनंतरही त्यांनीं तेथून हटण्याचें नाकबूल केलें. तेव्हां मि. मरफी यांना या लोकांवर "चार्ज" करणें भाग पडलें. सर्व तुकडीच्या अग्रभागीं मि. मरफी होते, कांहींच मारझोड करण्यांत आली नव्हती. तरी मि. मरफी टोळीपर्यंत पोंचले नाहींत तोंच त्यांना पकडून दगडांनीं ठेंचून त्यांचा प्राण घेण्यांत आला, त्यांचा रिव्हॉल्वर त्यांच्या कमरेपासून काढून त्यांच्यावर चालविण्यांत आला. **लष्कर तेथें होतेंच पण याचा सूड घेण्याचा कांहींच प्रयत्न झाला नाहीं, आणि बिलकूल गोळीबार झाला नाहीं.** सर्व टोळ्या तेथून निघून

गेल्यावर त्यांचा मुडदा मिळाला. ही गोष्ट खरी आहे, कारण मृताचा मुडदा मीं पाहिला आहे."

(मि. मरफीचा मृतदेह मि. मेटकाफनीं पाहिला ही गोष्ट खरी पण त्यांना कोणीं मारलें व कोठल्या परिस्थितींत मारलें याला मि. मेटकाफ् साक्षी नव्हते.)

तिसरी गोष्टः

" मि. मेटकाफः—एकदां मी वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना घेऊन शाबकद्र येथें सरकारी तुकडीवर हल्ला झाला होता तेथें गेलों होतों. आम्ही सरहद्दींतील कॉन्स्टेबलांची एक लॉरी रस्त्यावर पाहिली. तिच्यावर रात्रीं हल्ला करण्यांत आला होता. त्यांपैकीं तीनचार जणांना ठार करण्यांत आलें होतें आणि लॉरीला आग लावण्यांत आली होती. जवळच्या गांवांतील लाल डगलेवाल्यांच्या मदतीनें हें कृत्य झालें होतें:—

" डॉ०खानसाहेबः—याविषयीं कांहीं पुरावा आपल्याकडे आहे का? चरसाडा मोहम्मद सरहद्दीवर आहे, तो स्वतंत्र मुलूख आहे आणि हें कृत्य स्वतंत्र मुलुखांतील माणसांनीं केलें नसून लाल डगलेवाल्यांनीं केलें असें म्हणण्यास आपल्याजवळ काय पुरावा आहे?"

मि. मेटकाफ्:—**लाल डगलेवाल्यांनीं हें कृत्य केलें होतें असें सांगण्याचा माझा आशय नव्हता.** ते तर अष्टावधानी लोक आहेत. ते लोक स्वतः कशांतच सांपडले नाहींत. त्यांनीं सरकारच्या शत्रूंना जेवणखाण व इतर मदत दिली होती. लाल डगलेवाले आघाडीला होते असें मी म्हणत नाहीं. ही गोष्ट त्यांच्या सामान्य पद्धतीविरुद्ध आहे.

डॉ० खानसाहेबः—मी आपणांस सांगूं इच्छितों कीं, या विधानांत आपण आपल्या कल्पनेचे घोडे नाचवीत आहां.

मि. मेटकाफ्:—नाहीं महाराज. लालडगलेवाले धान्य पाठीवर लादून घेऊन जात असतां पकडले गेले होते आणि हें सप्रमाण सिद्ध झालें आहे.

पं. गोविंद वल्लभपंतः—ही घटना कधीं झाली?

मि. मेटकाफ्:—१९३० त."

(१९३० त म्हणजे सरकारबरोबर गांधीजींची तडजोड झाली त्यापूर्वीं. यांत लाल डगलेवाल्यांनीं किती भाग घेतला होता त्याबद्दल कांहीं पुरावा

नाहीं. मि. मरफीचा खून झाल्याबद्दल खटला उभारण्यांत आला–खटल्यांत ज्या लोकांना सजा झाली त्यांत कोणीही 'लाल डगलेवाले' नव्हते.)

या उताऱ्यांतील जाड टाइप मींच घातला आहे. लष्करी तुकडी एका अधिकाऱ्याचा खून उघड्या डोळ्यांनीं पहात होती असें सांगणाऱ्या मि. मेटकाफचें मागलें एक विधान (मि. शेरवानी यांना उत्तर देतांना केलेलें) पहाः

'लष्कराचा अपमान करण्यांत आला म्हणून त्या लोकांनीं खूनखराबी केली!' १९३० ते १९३४ च्या डिसेंबरपर्यंतची उदाहरणें मि. मेटकाफ यांच्याजवळ नव्हतीं. १९३४ च्या डिसेंबरांतील एक उदाहरण त्यांनीं एका अहवालांतून दिलें,–त्या अहवालाबद्दल कांहीं अधिक माहिती त्यांनीं दिली नाहीं–एवढीच दिली कीं तो अहवाल सरकारी होता. मि. मरफीच्या मरणाबद्दल डॉ० खानसाहेबांनीं मि. मेटकाफच्या भाषणानंतर केलेल्या भाषणांत पुढील उद्गार काढले: "मि. मरफी माझे स्वतःचे खासगी मित्र होते आणि त्यांच्या मृत्यूमुळें मला जेवढें दुःख झालें त्यापेक्षां अधिक कोणासच झालें नसेल. ही घटना लढाईच्या अगोदर झाली. त्या वेळीं तेथील टोळ्यांत फारसे खुदाइ खिदमतगार नव्हतेच; त्यांत फक्त सरहद्दीवरील टोळ्यांतीलच माणसें होतीं, तरी देखील आम्ही सर्वजण त्यांच्यासाठीं दिलगीर आहोंत; मी तर असें म्हणतों कीं, प्रत्येक खुदाइ खिदमतगाराला मि. मरफींच्या मरणाबद्दल वाईट वाटलें आणि आजसुद्धां आम्ही दिलगीर आहोंत."

याच्या उलट १९३१ च्या घटना पाहिल्या तर खुदाइ खिदमतगारांचा अपमान करण्यासाठीं काय काय गोष्टी केल्या गेल्या, रुग्णालयांत पडलेल्या जखमी लोकांना देखील कशा रीतीनें पळवून लावण्यांत आलें, १९३१ च्या फेब्रुवारी महिन्यांत जेव्हां लॉर्ड अर्विन यांच्याबरोबर गांधीजींचीं खलबतें चालू होतीं तेव्हां उतमानझाईत अगदीं निःशस्त्र टोळ्यांवर लष्करी अधिकाऱ्यांनीं मनाई हुकूम केला असतांहि शिपायांकडून गोळीबार कसा झाला आणि त्यांत दोन माणसें कशीं दगावलीं व तीसजण कसे जखमी झाले हें आपणांला दिसून येईल.

होम मेम्बर सर हेन्री क्रेकच्या भाषणांत भडक वर्णनाशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. १९३१ च्या शेवटीं घडलेली एक घटना त्यांनीं सांगितली तिच्याबद्दल एखाद्या पठाणाला शरम वाटण्यासारखी असली तरी पुष्कळ पठाणांना अभि-

मान वाटण्यासारखा आहे. पण शिकार करण्यास गेलेली एक इंग्रज बाई घोड्यावरून पडली आणि तिचा पाय मोडला. सर हेन्री क्रेक स्वतः म्हणतातः—"पक्क्या सडकेपासून दोन मैल दूर ही गोष्ट घडली. आपल्या नेहमींच्या आतिथ्यशीलता व भलेपणा या गुणांस अनुसरून पठाण लोक मदतीस आले व त्या बाईस खाटेवर घालून तिला नेऊं लागले. कासिम नांवाच्या एका लाल डगलेवाल्यांच्या पुढाऱ्यानें त्या लोकांस हटकलें; पण या लोकांनीं लाल डगलेवाल्यांनीं केलेली मस्करी व उपहास यांची पर्वा न करतां त्या बाईस योग्य स्थळीं पोहोंचवून दिलें."

१९३० च्या एप्रिलांतील वरील उदाहरणें सांगतांनासुद्धां मि. मेटकाफ् यांनीं पेशावरांत झालेल्या हत्याकांडांत एकाहि "लाल डगलेवाल्याचा" हात नव्हता असें स्पष्टपणें म्हटलें आहे. सुलेमान कमिटीनें देखील एकाहि 'लाल डगलेवाल्या' वर आक्षेप घेतला नाहीं. १९३० च्या मे महिन्यांत चीफ् कमिशनर यांनीं काढलेल्या जाहीरनाम्यांत खुदाइ खिदमतगारांबद्दल पुढील शब्द काढलेले आढळतातः

"कॉंग्रेसच्या लाल डगलेवाल्या स्वयंसेवकांना तुमच्या गांवांत येण्यास तुम्ही बंदी केली पाहिजे. ते आपणांला खुदाइ खिदमतगार म्हणवितात, पण ते खुदाचे नोकर नसून गांधींचे नोकर आहेत. ते बोल्शेविक लोकांचा पोषाख घालतात आणि बोल्शेविकांच्या राज्यांत जसें वातावरण उत्पन्न झालें आहे तसेंच वातावरण हे लोक येथें उत्पन्न करणार आहेत." याप्रमाणें चीफ् कमिशनर यांना तर केवळ त्यांच्या कपड्यांतच बोल्शेविझम् पहाण्यास मिळाला होता.

हें सर्व पाहिल्यावर खरी हकीकत फादर एल्विन यांच्या १९३२ च्या पत्रकांत मिळते असें म्हणतां येईल. ते थोड्या अधिकाऱ्यांनाही भेटले होते. या अधिकाऱ्यांनीं खुदाइ खिदमतगारांविरुद्ध केलेल्या फिर्यादींत भयंकर आरोप काय ते एवढेच होते. "(१) कित्येक पोलिस अधिकाऱ्यांचा अपमान करण्यांत आला होता, आणि त्यांना शिव्या देण्यांत आल्या होत्या. (२) त्यांच्या गार्डींत कित्येक वेळां दगड आणि शेण फेंकण्यांत आलें होतें. (३) कोहाट येथें गोळीबार झाला त्याचें कारण लष्करी तुकडीवर दगड व विटा फेंकण्यांत आल्या होत्या."

पठाणांसारख्या कडव्या समाजानें एवढेंच केलें आणि यापेक्षां कांहीं अधिक केलें नाहीं यावरूनच तुरुंगांत डांबलेल्या त्यांच्या पुढाऱ्यांनीं अहिंसेचें केवढें वातावरण उत्पन्न केलें होतें हें स्पष्ट होत आहे. खरी गोष्ट ही आहे कीं पठाण किंवा खुदाइ खिदमतगार यांच्याविरुद्ध सरकारला फारसें म्हणतां येण्यासारखें नाहीं; पण सरकारला इभ्रतीची खोटी कल्पना सोडवत नाहीं. आपल्या विस्तृत भाषणाचे शेवटीं सर हेन्री क्रेक यांनीं काढलेल्या उद्गारांत हा हेकडपणा स्पष्टपणें दिसून येतो.

" जर ही चळवळ फिरून ताजीतवानी करण्याची संधि देण्यांत येईल तर या प्रांतांतील लोक व सरहद्दीपलीकडील टोळ्या असेंच मानतील कीं, ब्रिटिश राज्य दुर्बळ झालें आहे. या टोळ्या सरकार दुबळें झालें आहे असें समजण्यास नित्य तयारच असतात, आणि अशी दुर्बलता थोडी जरी त्यांच्या नजरेस आली तरी ते लोक तावडतोब घारीसारखे आपणांवर तुटून पडण्यास चुकणार नाहींत. ही जोखीम शिरावर घेण्यास आम्ही तयार नाहीं, म्हणून आम्ही खुदाइ खिदमतगारांचें पुनरुज्जीवन करूं इच्छीत नाहीं."

मराठी ग्रंथ संग्रहालय
८२०
२१८१३

---

# प्रकरण आठवें

## आरोपांची छाननी

आतां खानबंधूवर करण्यांत येत असलेल्या आरोपांची थोडी छाननी करूं. येथें हें अवश्य सांगितलें पाहिजे कीं, डॉ. खानसाहेबांवर खास असा एकही आरोप केलेला ठाऊक नाहीं. त्यांच्यावरचा आरोप इतकाच कीं ते आपल्या बंडखोर धाकट्या भावाचे वडील बंधु आहेत. हा त्यांचा मोठा गुन्हा खरा! पण याशिवाय त्यांच्याविरुद्ध दुसरें कांहींच नाहीं. कदाचित् याच कारणासाठीं सरहद्द प्रांतांत प्रवेश न करण्याबद्दल त्यांच्यावर काढलेला मनाई हुकूम १९३४ च्या अखेरीस फिरून बजावला गेला नाहीं. पण कनिष्ठ बंधु खान अबदुल गफ्फारखान यांच्यावर असलेल्या आरोपांचा जरा विचार करूं.

१ "मि. गांधी गोलमेज परिषदेस गेले, त्यानंतर अबदुल गफ्फारखान हे राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळा (वर्किंग कमिटी) च्या विनंतीवरून राष्ट्रीय सभेच्या चळवळीचें पुढारीपण स्वीकारून जिल्ह्याजिल्ह्यांतून खूप फिरले."

२ त्यांच्यावर काढण्यांत आलेला मनाई हुकूम त्यांनीं मानला नाहीं, ते खेड्यांतून फिरले, मशीदींतून धार्मिक प्रवचनें करण्याच्या मिषानें त्यांनीं राजकीय भाषणें ठोकलीं.

३ कर न भरण्याची चळवळ चालविली आणि सरकारी पाटांचें पाणी न घेण्याबद्दल लोकांना सांगितलें.

४ "लाल डगलेवाल्यां" ची संस्था ही "क्रांतिकारक संस्था आहे, तिचा हेतु ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून बळजबरीनें हांकून देण्याचा आहे" आणि खान अबदुल गफ्फारखान हे या लोकांच्या मदतीनें सरहद्दीबाहेरच्या टोळ्यांना चिथावणी देत असतात.

५ पेशावरांत चालत असलेल्या राष्ट्रीय सभेच्या चळवळीचा परिणाम मोहंमद प्रदेशांतहि झाला होता.

६ मुख्य प्रधानांनीं १९३१ च्या डिसेंबरांत केलेलें भाषण आणि सरहद्द प्रांतास देण्यांत आलेल्या सुधारणा यांचा स्वीकार करण्याचें सरहद्द प्रांतिक समि-

तीनें नाकारलें होतें आणि पूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. आणि दोघांही भावांनीं चीफ् कमिशनर यांच्या दरबारचें निमंत्रण स्वीकारलें नाहीं.

७ अहिंसेवर जोर देण्यांत येई तरी देखील लोकांना कांहीं तरी मोठी घटना घडून येणार आहे असें सांगण्यांत येई, त्यासाठीं ऐक्य करण्याला उत्तेजन देण्यांत येई, आणि स्वातंत्र्याचा लढा फिरून सुरू झाला तर त्याच्यासाठीं तयार राहण्यास सांगितलें जाई.

८ खान अबदुल गफ्फारखान हे हा तह (Truce) कायमचा नव्हे तर कामचलाऊ आहे असेंच नेहमीं म्हणत.

९ मीरत येथें भरलेल्या एका परिषदेंत त्यांनीं जाहीर केलें होतें कीं, "मी राष्ट्रीय सभेंत प्रवेश केला तो एवढ्याचसाठीं कीं, राष्ट्रीय सभेचा व माझा हेतु एकच आहे—तो हा कीं हिंदुस्थानांतून ब्रिटिशांची हकालपट्टी करावी."

१० खुदाइ खिदमतगारांनीं बेकायदेशीरपणानें आपल्याच अधिकारांत कित्येक गुन्हे उडवून लाविले होते. कित्येक पुरावे पुढें येऊं दिलें नाहींत, व कांहींचे निर्णयहि दिले होते.

यांतील पहिला, सहावा, आठवा आणि नववा आरोप खानसाहेब स्वतःच कबूल करतील; आणि हे गुन्हे करणारे हिंदुस्थानांत ते एकटेच पुढारी आहेत आणि दुसरे कोणी नाहींत असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. हे सगळे पुढारी आज मोकळे आहेत. कर न देण्याची सल्ला त्यांनीं अवश्य दिली होती पण ती करबंदीच्या चळवळीचें अंग म्हणून नव्हे तर केवळ विशिष्ट परिस्थितींत. ज्यांची स्थिति इतकी कंगाल कीं ज्यांना कर भरण्याचें सामर्थ्यच नाहीं, त्यांना ते कर न भरण्याची सल्ला देणार नाहींत तर काय करतील? स्वतः त्यांनीं व त्यांच्या भावांनीं कर भरला होता. दुसरा, चौथा व पांचवा आरोप अगदींच निराधार आहेत. ते जर खरे असते तर सरकारला खान-साहेबांवर सामान्य कायद्याच्या आधारें खटला चालविता आला असता. खानसाहेबांनीं अनेकदां जाहीरपणें बोलून दाखविलें आहे कीं, अत्याचाराची कोणत्याही प्रकारची सल्ला त्यांनीं कधींच दिली नाहीं किंवा त्याच्याबद्दल कधीं पसंती दर्शविली नाहीं. दहावा आरोप तर आरोप नव्हे पण अप्रत्यक्ष स्तुति आहे. हा आरोप खरा असेल तर खुदाइ खिदमतगार हें मंडळ फार व्यवस्थित होतें आणि सरकारी कोर्टांवर बहिष्कार घालून त्यानें कज्जे अग-

दींच कमी करून टाकले, इतकेंच त्यावरून दर्शित होतें. हें काम करण्याची इच्छा दुसऱ्या प्रांतांनाहि होती तरी पण त्यांना शक्य झालें नाहीं.

नवव्या आरोपाचा जरा विस्तारपूर्वक विचार केला पाहिजे, कारण १९३१ मध्यें तह- भंगाबद्दल चर्चा करण्यासाठीं गांधीजी हिंदुस्थान-सरकारच्या गृह-मंत्र्यांना ( होम मेम्बर ) एक दोनदां सिमला येथें भेटले, तेव्हां खान अबदुल गफ्फारखान यांना सोडून न देण्याचें कारण म्हणून मीरतचें हें भाषण मुख्यतः पुढें करण्यांत आलें होतें. दुसऱ्याहि कित्येक भाषणांत उतारे देण्यांत आले होते. ते उतारे हेः—

" जर मी ( अकालीं ) मरण पावलों नाहीं, तर इंग्रजांना माझ्या देशावर राज्य करण्यास मी खचीत अशक्य करीन, आणि मला वाटतें कीं, खुदाच्या मदतीनें माझें हें व्रत सिद्धीस जाईल."

" लोकांची तक्रार अशी आहे कीं, मीं जात विकून काँग्रेसला मिळण्यांत मोठी चूक केली. काँग्रेस ब्रिटिशांविरुद्ध काम करते. ब्रिटिश काँग्रेसचे शत्रु आहेत आणि पठाणांचे शत्रु आहेत. म्हणून मीं काँग्रेसशीं सहकार केला आहे, आणि ब्रिटिशांना घालवून देण्यांत काँग्रेसचा व माझा हेतु एकच आहे. फिरंग्यांच्या चलाखीनें आपण फसतां कामा नये."

" आमचे ( म्हणजे खुदाइ खिदमतगारांचे ) आणि राष्ट्रीय सभेचे दोन हेतु आहेत. एक आपल्या देशास स्वतंत्र करणें व दुसरा भुकेलेल्यांना पोटा-पुरतें अन्न व उघडे पडलेल्यांना झांकण्यापुरतें वस्त्र देणें."

" स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वस्थ बसूं नका-तुम्हांला तोफांच्या तोंडीं अथवा बाँब फेंकून उडवून देण्यांत आलें तरी हरकत नाहीं. जर तुम्ही शूर असाल तर रणसंग्रामांत उडी घ्या आणि आपल्या सर्व दुःखांचें मूळ जे इंग्रज त्यांचेबरोबर लढा. राष्ट्रीय सभा ही इंग्रजांविरुद्ध असलेली संस्था आहे. इंग्रज राष्ट्रीय सभा व पठाण दोघांचेही शत्रु आहेत म्हणूनच मी राष्ट्रीय सभेला मिळालों आहे."

हे उतारे, बारडोलींत केलेल्या त्यांच्या भाषणांतील उतारे मीं मागें दिले आहेत, त्यांच्याशीं तोलून पहा. दोहोंतहि एकच शूर आणि सच्च्या वीराचें वीर हृदय बोलत असलेलें ऐकूं येत नाहीं काय ? हे उतारे या मोकळ्या मनाच्या पठाणाच्या साध्याभोळ्या उर्दूचें भुंडें भाषांतर आहे, म्हणून वाच-

तांना ते जरा बेडौल वाटतात इतकेंच, पण तो भाषांतर करणाऱ्याचा दोष आहे, खानसाहेबांचा नव्हे. 'लढाई' ची भाषा त्यांत आहेच ही गोष्ट खरी, पण त्या दिवसांत 'लढाई' ची गोष्ट कोण बोलत नव्हतें? आजसुद्धां स्वातंत्र्ययुद्धाची गोष्ट थोडीच शांत झाली आहे? पण सगळयांना माहीत आहे, इंग्रज सरकारलाही माहीत आहे कीं, ही लढाई–हें युद्ध अहिंसक युद्ध आहे. खानसाहेबांच्या भाषणांतील एकहि उताऱ्यांत शस्त्रबळानें किंवा रक्तपातानें ब्रिटिशांना हांकून देण्याची गोष्ट दर्शविलेली नाहीं–पण सरकारचा आरोप हाच आहे. खानसाहेब तर लोकांना तोफेच्या आणि बॉम्बच्या गोळयाखालीं मरून जाण्यास सिद्ध होण्यास सांगतात.

खरी गोष्ट अशी आहे कीं, १९३१ च्या मार्च महिन्यांत शांतिसाठीं तळमळणाऱ्या लॉर्ड अर्विन व गांधीजी यांनीं मोठ्या परिश्रमानें जो समेट केला तो सर्व अधिकारी वर्गाच्या डोळयांत खड्याप्रमाणें बोचत होता, विशेषें करून सरहद्द प्रांतांतील अधिकारी तरी त्यायोगें अतिशयच चिडले होते आणि या समेटाचा अंत कधीं होईल याची ते वाट पाहत बसले होते. सरकारकडून कितीही जुलूम करण्यांत आला तरी खान व त्यांचे अनुयायी खुदाइ खिदमतगार यांनीं अहिंसा सोडून रक्तपाताचा अंगिकार केला नाहीं. त्या गोष्टीबद्दलच त्यांना फार वाईट वाटत असे व अजूनही वाटतें. जर त्यांनीं अंगिकार केला असता तर त्यांना चिरडून टाकण्यास मागें पुढें पाहण्यांत आलें नसतें. सरकारला बोंचत असलेली गोष्ट ही होती कीं, सगळे पठाण 'गांधींचे खिदमतगार होऊन बसले होते, आणि सरहद्द प्रांतांत 'सरहद्द गांधी' हें नाम संपादन करून बसलेल्या खानाचा शब्द झेलण्यास तयार झाले होते.

## प्रकरण नववें

# इंग्रजांनीं एवढें तरी समजून घ्यावें

पण गेल्या प्रकरणांत सांगितलेले आरोप आतां तीन वर्षांचे जुने झाले. या निराधार आरोपांसाठीं चौकशीशिवाय मिळालेली तीन वर्षांची सजा जणुं कमीच झाली असें वाटून खानबंधूंचा एक नवा मित्र जागा झाला आहे. आणि त्यानें थोडे नवे आरोप रुजू करून दोघांहि भावांना शर्तीवर कां होईना पण सोडून दिल्याबद्दल सरकारला ठपका दिला आहे. हा नवा मित्र म्हणजे सर मायकेल ओडवायर. सर मायकेल यांच्या कारकीर्दीतील आरंभींचीं वर्षें सरहद्द प्रांतांत गेलीं होती अर्थात् सरहद्द व खानबंधु यांना सरकारपेक्षां आपण अधिक चांगल्या रीतीनें ओळखतों असें त्यांचें म्हणणें आहे. "मॉर्निंग पोस्ट" मध्यें लिहिलेल्या एका लेखांत हे साहेब खान अबदुल गफ्फारखान यांचें पुढीलप्रमाणें वर्णन कारतात. "तो साहसी अफगाण क्रांतिकारक अबदुल गफुरखान (नांवदेखील पुरतें ठाऊक नाहीं) सरहद्द–गांधी या नांवानें प्रख्यात आहे. तथापि तो जाहीरपणें गांधीच्या अहिंसेच्या वेडाची टवाळी करतो व ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतून उच्चाटण करण्याबद्दलची आपली प्रतिज्ञा बेधडक जाहीर करतो आणि (रशियांतील) सोव्हिएट नमुन्याचें एक कम्युनिस्ट लोकशाही राज्य सरहद्द प्रांतांत स्थापण्याची त्याची इच्छा आहे." इतकें सांगून त्यांनीं दहशतवाद व कम्युनिझम् यांच्याशीं खानसाहेबांच्या नांवाची सांगड घालून दिली आहे; आणि पंजाब व सरहद्द या प्रांतांत न जाण्याच्या अटीवर त्यांना मुक्त केल्याबद्दल सर मायकेल यांनीं सरकारला ठपका दिला आहे. या दोन-तीन वाक्यांत खरें पाहिलें असतां जुन्या आरोपांचीच पुनरुक्ति आहे, मात्र त्यांच्या प्रत्येक शब्दांत हालाहल भरलें आहे; असें हालाहल ओतण्याच्या कलेंत सर मायकेल प्रवीण आहेत. या वाक्यांत दर्शविलेल्या आरोपाचा आधार त्यांनीं कोणत्या लटपटपंचीवर बसविला आहे तेसुद्धां पाहाण्याजोगें आहे. सर मायकेल म्हणतात. "अबदुल गफुर याचा सरहद्दीपलीकडील

टोळयांबरोबर निकट संबंध असतो. तुरंगझाईचा हाजी हा आपला पूर्वापारचा कट्टा शत्रु असून त्यानें गेल्या कित्येक वर्षांत मोहंमद, आफ्रिडी व दुसऱ्या कित्येक टोळयांना पेशावरावर हल्ला करण्यासाठीं चिथविलें आहे, त्या हाजीचा हा जांवई आहे."

यानंतर सर हेन्री क्रेक यांनीं वरील बेजबाबदार भाषेंत थोडी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. वरिष्ठ कायदेमंडळांतील ५ फेब्रुवारीच्या आपल्या भाषणांत त्यांनीं याप्रमाणें सांगितलें होतें: "माझें म्हणणें असें आहे कीं, खान अबदुल गफ्फारखाननें सरहद्दीपलीकडील टोळयांना आमच्या सरकार-विरुद्ध चिथावणी दिली होती. तुरंगझाईच्या हाजीच्या आधिपत्याखालीं मोहंमद लोकांच्या एका टोळीस त्यानें उठविलें होतें, हा कुविख्यात धर्मवेडा हाजी या खान अबदुल गफ्फारखानाचा अगदीं जवळचा नातलग आहे. खानानें या हाजीला ७०० लोकांचें लष्कर घेऊन येण्यास सांगितलें, तो आला आणि त्याच्याशीं सामना देण्यास आपल्याला लष्कराची एक तुकडी पाठविणें भाग पडलें. सरकारबरोबर लढाई चालवीत असलेल्या आफ्रिडी लोकांनादेखील चिथवून त्यानें आमच्या प्रदेशावर हल्ला करविला आणि दुसऱ्या टोळयांतूनसुद्धां त्यानें चांगलाच असंतोष पसरविला आहे."

या आरोपांची छाननी या प्रकरणांत स्वतंत्रपणें केली आहे. कारण इंग्रजांना सामान्य रीतीनें किती खोटा इतिहास शिकविण्यांत येतो तें मला दाखवा-वयाचें आहे आणि खानसाहेब व त्यांचें घराणें यांची खरी हकीकत मला येथें एकत्र द्यावयाची आहे. हा आरोप किती खोटा आहे तें सिद्ध करण्यास थोडी हकीकत सांगणें जरूर आहे. प्रथम एवढें सांगून ठेवतों कीं, तुरंग-झाईचा हाजी हा खानसाहेबांचा सासरा तर लागत नाहींच पण जवळचा नातलगही नव्हे. जगांत वावरणारा प्रत्येक इंग्रज दुसऱ्या इंग्रजाचा नातलग आहे असें म्हणायचें असेल तर खानसाहेब आणि हाजी हे एकमेकांचे नात-लग आहेत असें म्हणतां येईल! कारण दोघेही पठाण आहेत. सर माय-केल यांनीं हाजीला खानसाहेबांचा सासरा बनविलें ही मोठी गंभीर चूक झाली असें वाटून सर हेन्री क्रेक यांनीं त्यांत सुधारणा करून त्याला आप्त म्हटलें आणि दुसऱ्या काल्पनिक गोष्टी भरीस घालून या खोटेपणाला मोठा रंग चढविला. रज्जडचे खान सुल्तान महमदखान हे खान अबदुल गफ्फार-

खान यांचे श्वशुर होते. ते जे. पी. होते आणि ते सरकारचे चांगले मदतनीस होते, त्यांनीं घेतलेल्या मदतीची इतर कोणापेक्षांहि सरकारलाच अधिक माहिती असणार. असें असतां तुरुंगझाईच्या हाजीला एकाएकीं खानसाहेबांच्या सासऱ्याच्या अथवा जवळच्या आताच्या जागेवर स्थापण्यास सर मायकेल ओडवायर, हेन्री क्रेक यांना कोणतें कारण झालें असावें? थोडी हकीकत सांगतों म्हणजे नीट समजेल. हाजीचें गांव तुरुंगझाई हें खानबंधूंच्या उतमानझाई गांवाच्या शेजारींच आहे. हाजीनें १९११ त राष्ट्रीय शिक्षणाचा झेंडा फडकाविला होता आणि समाजसुधारणेसाठीं सर्व प्रांतांत राष्ट्रीय शाळा स्थापण्याचा पुष्कळ प्रयत्न केला होता. त्या वेळीं अबदुल गफ्फारखान फार तर वीस वर्षांचे असतील. समाजसेवेच्या या कार्यांत ते साहजिकच आकर्षिले गेले आणि हाजीचे एक सहकारी म्हणून त्यांनीं काम केलें. या कालांत सर मायकेल सरहद्द प्रांतांत असावे, अर्थात् हाजीला तर ते ओळखीत असतीलच. शिवाय महायुद्धाचे वेळीं व त्यानंतरही हाजीचें नांव चांगलेंच अप्रिय झालें होतें, तेव्हां हाजीच्या जुन्या सहकाऱ्याचें नांव सरकारच्या शत्रूबरोबर जोडणें सर मायकेल यांना सोपें झालें. पुढें सहकाऱ्याला सासरा बनविण्यास कितीशी अडचण पडणार? साध्या सत्य गोष्टीला—असत्यानें कां होईना—सजवून लोकांच्यासमोर मांडणें हें आजच्या वर्तमानपत्रकारांना आवश्यक वाटतें, आणि सर मायकेल यांना वर्तमानपत्रांतून हिंदुस्थानाबद्दल खऱ्याखोट्या चर्चांनीं भरलेलीं पत्रें आणि लेख लिहिण्याशिवाय दुसरा धंदाच नाहीं.

पण मौज ही कीं १९११ त हाजीचे जे सहकारी होते त्यांचा आज हाजीशीं कांहींच संबंध नाहीं. कारण हाजीची कारकीर्द फारच बंडखोर झाली आहे. १९१५ त हाजीच्या सर्व शाळा सरकारनें बंद करून टाकल्या आणि त्याची पाठ पुरविली. तेव्हां हाजी गांव सोडून पळाला तो फिरून परत आलाच नाहीं. १९१९ त अफगाणांना तो मिळाला होता असें त्या वेळच्या वर्तमानपत्रांवरून समजतें.

हिंदुस्थानांतून कांहीं मुसलमान खिलाफतीच्या नांवानें हिजरत करून निघाले तेव्हां अफगाणिस्तानच्या वाटेवर खान अबदुल गफ्फारखान यांना हाजीची भेट झाली होती, पण त्यानंतर म्हणजे १९२०–२१ नंतर हाजीचें नांवनिशाणही खानसाहेबांना ठाऊक नाहीं.

हें झालें हाजीर्शी असलेल्या संबंधाबाबत. आतां सरहद्दीपलीकडील टोळ्यांना चिथावण्याचा आरोप घेऊं. या सरहद्दीपलीकडील प्रदेशाबद्दल दोन शब्द लिहिण्याची जरूर आहे. सरहद्द प्रांतांतील ब्रिटिश भाग म्हणजे हजारा, पेशावर, कोहाट, बन्नु आणि डेराइस्माइलखान, हें आपण पहिल्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. या पांच जिल्ह्यांच्या आसपास आलेला पहाडी प्रदेश हा या टोळ्यांचा प्रदेश. हा प्रदेश ब्रिटिश प्रदेशापेक्षां जवळ जवळ दुप्पट आहे. या जंगली टोळ्यादेखील पठाणांच्याच आहेत, आणि सगळ्या पठाणांची भाषा 'पुश्तो' हीच आहे. हा स्वतंत्र म्हटला जाणारा प्रदेश केवळ नांवाचाच स्वतंत्र आहे. ब्रिटिश जिल्ह्यांच्या गव्हर्नराची या टोळ्यांवर व्हाइसरॉयचा एजन्ट म्हणून सत्ता असते. तो वेळोवेळीं त्यांना शिक्षा करण्यासाठीं त्यांच्यावर हल्ले चढवितो हें आपण पाहिलेंच आहे. या लोकांना ताब्यांत आणण्यासाठीं त्यांच्यावर विमानांतून बॉम्ब फेकले जातात, तरी हे लोक नमत नाहींत. जे वश होतात त्यांच्या मदतीनें दुसऱ्यांना वश करण्याची क्लृप्ति योजली जाते. हिंदुस्थानांतील लष्कराचा मोठा भाग या टोळ्यांपासून हिंदुस्थानचें रक्षण करण्याच्या मिषानें सरहद्दीवरच गुंतविण्यांत आला आहे. ह्या आफ्रिदी, मोहमंद वगैरे टोळ्या जंगली आहेत ही गोष्ट खरी; लूटमार, खून वगैरे करून आपली उपजीविका करतात हेंदेखील खरेंच. तरी पण एका बाजूनें त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करण्यांत आलें असलें तरी दुसऱ्या बाजूनें त्यांना वश करण्यासाठीं मारझोडीशिवाय दुसरा एकही उपाय योजण्यांत आलेला नाहीं. जंगली असल्या तरी या टोळ्या बेअक्कल नाहींत. आपल्या शेजारच्या प्रदेशांत काय चाललें आहे तें त्यांना समजतें. सरहद्द प्रांतांत सत्याग्रह चालत असतां आपल्याचसारखे धिप्पाड शरीराचे पहाडासारखे पठाण शिपायांच्या हातचा लाठीमार हंसतमुखानें सहत करतात, नग्न करण्यांत आलें तरी तें सहन करतात, हा या टोळ्यांना या युगांतील एक चमत्कारच वाटला. या लोकांना शिक्षण देऊन शांततेनें जीवन कसें घालवावें हें शिकविण्याचा खान अबदुल गफ्फारखान यांचा प्रयत्न चाललाच होता. मालखंड, बाजोर व स्वात येथील लोक खानसाहेबांनीं १९२१ त स्थापलेल्या "आझाद शाळेंत" आपलीं मुलें पाठवूं लागले होते, आणि त्या वेळेपासून त्यांपैकीं कित्येक टोळ्यांना ब्रिटिश सरहद्दींतील आपल्या बांधवांप्रमाणें

वागण्याची इच्छा उत्पन्न झाली होती. त्यांपैकीं कित्येक खुदाइ खिदमतगार मंडळाचें सभासद झाले होते. पण वर सांगितलेले तीन भाग सोडून बाकीच्या जंगली लोकांत खानसाहेब कधीं पोहोंचले नाहींत. हे लोक आजसुद्धां सरहद्द प्रांतांत येऊन लुटालूट करतात, गुरें चोरून नेतात. वाटेल त्याचा प्राण घेतात. आणि असें करतांना पठाण, हिंदु किंवा इंग्रज असा थोडासुद्धां भेद ठेवीत नाहींत. असले गुन्हे करण्यापासून त्यांना परावृत्त करून त्यांच्यांत माणुसकी उत्पन्न करावी अशी खान अबदुल गफ्फारखान यांची तीव्र इच्छा आहे, ती त्यांनीं चोरून ठेविलेली नाहीं. पण ही इच्छा आज केवळ स्वप्नसमान आहे. या टोळ्यांतील कांहीं लोक खुशाल सरहद्द ओलांडून या बाजूस येतात. पण खानसाहेबांना मात्र सरहद्दीपलीकडे जातां येत नाहीं. १९३० नंतर त्यांनीं कधीं जाण्याचा प्रयत्न देखील केला नाहीं. सन १९३१ त देवदासभाई त्यांचेकडे पाहुणे म्हणून गेले होते तेव्हां अटकजवळ असलेल्या चकधरा पुलाचें असाधारण दृश्य पहाण्यासाठीं देवदास यांना घेऊन जाण्याची दोघा बंधूंची इच्छा होती. मालखंड एजन्सीच्या हद्दींतून थोडासा रस्ता जातो, तो ओलांडून या पुलावर जातां येतें. पुलावर केवळ हें दृश्य पहाण्यासाठींच जावयाचें आहे असें खानसाहेब व देवदास यांनीं परवानगी मागतांना अधिकाऱ्यांजवळ स्पष्ट केलें होतें. पण या बाबतींत आगाऊ नीटपणें कळविल्याशिवाय परवानगी देतां येत नाहीं असें त्यांना सांगण्यांत आलें. आज तर या टोळ्या लुटालूट करण्यासाठींच ब्रिटिश सरहद्दींत येतात, आणि खान अबदुल गफ्फारखानाजवळ अहिंसेचे पाठ घेतलेल्या पठाणांना पुष्कळदां या टोळ्यांतील लोकांविरुद्ध आत्मरक्षणासाठीं बंदूक उचलावी कीं नाहीं, याचा विचार पडतो. १९३४ त खानसाहेब गांधीजींजवळ कांहीं काळ होते तेव्हां त्यांनीं गांधीजींस विचारलें कीं, अशा रीतीनें आपल्यावर कोणा लुटारूनें हल्ला केला तर खुदाइ खिदमतगारानें स्वतःचा बचाव करावा किंवा नाहीं ? खानसाहेबांनीं अहिंसेच्या मंत्राचा जेवढा विचार केला आहे तेवढा समजण्याची देखील मायकेल ओडवायरसारख्यांना पात्रता आहे किंवा नाहीं याबद्दल शंका आहे.

"गांधींच्या अहिंसेच्या ढोंगाची तो उघडपणें टवाळी करितो" ही गोष्ट किती खोटी आहे हें हिंदी वाचकांना दाखवून देण्याची गरज नाहीं.

पण खानसाहेबांनीं १९३१ त व १९३४ त केलेल्या भाषणांतून कोणतेंही भाषण घेतलें तरी अहिंसेविषयीं त्यांना वाटणारें प्रेम आपणांला स्पष्ट दिसून येईल. याच विषयावर त्यांनीं १९३१ त काढलेले कांहीं उद्गार चिरस्मरणीय आहेत. आपल्या पठाणबंधूंची खोड त्यांना माहीत आहे, इतर प्रांतांपेक्षां सरहद्द प्रांतांत खूनखराबी जास्त होते हेंही ते कबूल करतात, पण हे गुन्हे कमी व्हावे म्हणूनच आणि सरहद्द प्रांतांतून दीर्घद्वेष व रक्तपात नाहींसा करण्यासाठींच खानसाहेबांनीं अहिंसेच्या प्रयोगाचा स्वीकार केला. त्याशिवाय या दुर्दैवी प्रांताला शांति प्राप्त होणार नाहीं हें त्यांना दिसून आलें, आणि सत्याग्रहाचा हिंदुस्थानांत सार्वत्रिक प्रचार होण्यापूर्वींच खानसाहेब अहिंसावादी झाले. १९३१ त त्यांनीं काढलेल्या उद्गाराच्या मागें असलेली त्यांची स्वच्छ मनःस्थिति कोणाही माणसाला दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं.

" अहिंसा माझ्या बाबतींत सिद्धांतरूप होऊन बसली आहे असें म्हटलें तरी चालेल. गांधीजींच्या अहिंसेबद्दल मला पूर्वींसुद्धां विश्वास वाटत होता. पण माझ्या प्रांतांत हा प्रयोग इतक्या विलक्षण रीतीनें सफळ झाला आहे कीं मला हिंसेचें उच्चाटण करण्यासाठीं हाच रामबाण उपाय वाटतो. ईश्वराची कृपा असेल तर मी जिवंत असेतों तरी माझा प्रांत हिंसेचा स्वीकार करणार नाहीं अशी मला उमेद आहे. मारझोड व खुनखराबी यांचा परिणाम किती वाईट होतो आणि त्यामुळें पठाणांचें नांव किती बद्दू झालें आहे हें आम्हां सर्वांना चांगलेंच कळून चुकलें आहे. आमच्या स्वभावांत ही गोष्ट अतिशय मुरून गेली आहे म्हणून ती दूर करण्यास आम्हांस अहिंसेच्या दीर्घ शिक्षणाची जरूर आहे. पठाणावर देखील हिंसेपेक्षां प्रेम आणि समजूत यांचा परिणाम अधिक होतो. त्याचा स्वभाव इतका भोळा आहे कीं प्रेमानें त्याच्या हृदयांत प्रवेश करून तुम्ही त्याला नरकांत पडण्यास सांगाल तरी तो पडेल, पण बलात्कारानें तुम्ही त्याला स्वर्गांतसुद्धां नेऊं शकणार नाहीं. पठाणावर प्रेमाचा जादूसारखा परिणाम होतो. त्यानें अहिंसेचें मर्म समजून घ्यावें आणि ज्याप्रमाणें दुसऱ्यानें आपल्याशीं हिंसेचें वर्तन करूं नये असें त्याला वाटतें तसेंच त्यानें दुसऱ्याशीं स्वतः हिंसेचें वर्तन करूं नये एवढी साधी गोष्ट मी पठाणाला शिकवूं इच्छितों. मी पठाणांना ही गोष्ट कदाचित् शिकवूं शकणार नाहीं आणि माझ्या इच्छेविरुद्धही माझ्या प्रांतांत कदाचित्

रक्तपात उसळेल. असें झाल्यास मी हरलों असें कबूल करीन आणि म्हणेन कीं माझ्या नशीबांत फत्ते नव्हती. पण त्यामुळें अहिंसेवरील माझ्या श्रद्धेंत तिळमात्रही फरक पडणार नाहीं याबद्दल खात्री बाळगा. इतर प्रांतांचें तिच्या-शिवाय चालत असेल तर चालूं द्या. माझ्या प्रांताला मात्र अहिंसेशिवाय दुसरी गति नाहीं ही गोष्ट मला प्रकाशासारखी स्पष्ट दिसते."

इतकें विवेचन केल्यावर आतां या पठाण बंधूंविषयीं व त्यांचें कुटुंब आणि सगेसोयरे यांविषयीं कांहीं माहिती देतों. तिच्यावरून दोघांच्या नांवाची इंग्रजांना वाटणारी भीति नाहींशी होईल. धाकटे खान, विधुर आहेत पण वडील खानांची पत्नी इंग्रज आहे हें मी सांगितलेंच आहे. १९३० पूर्वी खानसाहेबांचें घर म्हणजे अधिकारी व इंग्रज यांचें एकत्र बसण्या-भेटण्याचें ठिकाण होतें. वाटेल तेव्हां तेथें येऊन ते पाहुणचार घेत असत. ( आज मात्र हा बंगलासुद्धां सरकारनें मातीमोलानें घेतला आहे ). आजचे गव्हर्नर कर्नेल सर राल्फ ग्रिफिथ यांच्या पत्नी खानसाहेबांच्या पत्नीशीं फारच प्रेमभावानें वागत असत आणि हे गव्हर्नरसाहेब सुद्धां पुष्कळदां खानसाहेबांचे पाहुणे म्हणून आले होते.

डॉ० खानसाहेबांचा सर्वांत धाकटा मुलगा लंडनमध्यें मॅट्रिकची परीक्षा पसार होऊन हल्लींच ऑक्सफर्डमध्यें अभ्यास करण्यास गेला आहे. त्यांची स्वतःची व अबदुल गफ्फारखान यांची कन्या या येथें येण्यापूर्वी लंडनजवळच्या एका शाळेंत शिकत होत्या. त्यांचा सर्वांत मोठा मुलगा सादुल्लाखान विलायतेंत शिकत होता. तेथल्या एका प्रसिद्ध इंजिनीयरिंग कॉलेजांतून त्यानें पदवी मिळविली आहे. १९३० चा सत्याग्रह सुरू झाला त्यापूर्वी थोडेच दिवस तो विलायतेहून परत आला. दुसरा मुलगा ओबेदुल्लाखान हा ७८ दिवसांचा उपवास केल्यामुळें प्रसिद्ध झाला आहे. त्यानें मद्रास येथील कॉलेजांत कातडीं कमाविण्याची कला हस्तगत करून घेतली व पुढील अभ्यासासाठीं तो विलायतेस जाणार होता, तितक्यांत कर न भरल्याबद्दल त्याला पकडण्यांत आलें. १९३० त इतरांप्रमाणें तोही तुरुंगांत गेला तो थेट १९३३ त सुटला. खान अबदुल गफ्फारखान यांचा सर्वांत मोठा मुलगा अबदुल गनीखान हा देखील विलायतेंत दोन वर्षें शिक्षण घेऊन अमेरिकेंत साखर तयार करण्याचें शिक्षण घेऊन आला आहे. अलिकडे तो कविवर्यांच्या

शांतिनिकेतनांत होता. डेहराडून येथें एक निवृत्त इंग्रज अधिकारी कर्नेल ब्राउन हे शाळा चालवीत असतात, त्यांच्या शाळेंत खानसाहेबांचा दुसरा मुलगा शिकत होता; नुकताच तो सीनियर केंब्रिजच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला. सर्वांत धाकटादेखील अजूनही कर्नेल ब्राउनच्या शाळेंतच शिकत आहे.

रेवरंड विग्रम यांचें नांव मीं मागें एका प्रकरणांत दिलेंच आहे. या भल्या पाद्रयाच्या हाताखालीं दोघां खानबंधूंचें शिक्षण झालें, आणि या गोष्टीला आज चाळीस वर्षें झालीं तरीदेखील ते त्याचे नेहमीं गुण गातात.

खानबंधू मोठे झाल्यावर हे शिक्षक त्यांचे मित्र बनले आणि वडील बंधूंना विलायतेंत सेंट टॉमस हॉस्पिटलांत प्रवेश मिळाला तो रेवरंड विग्रम यांच्या संबंधामुळेंच. रेवरंड विग्रम यांचे एक बंधु विलायतेंत प्रसिद्ध डॉक्टर आहेत आणि मोठ्या हुद्दयाच्या जागेवर आहेत. त्यांनींच डॉ० खानसाहेबांना सेंट टॉमस हॉस्पिटलांत प्रवेश मिळवून दिला. आय्. एम्. एस्. खात्यांत किती तरी इंग्रज अम्मलदार डॉ० खानसाहेबांचे मित्र आहेत आणि आजसुद्धां किती तरी जुन्या इंग्रज मित्रांचीं प्रेमाचीं पत्रें त्यांना येत असतात.

डॉ० खानसाहेब पेशावर क्लबाचे सभासद आहेत. या क्लबांत दुसरे हिंदी क्वचितच असतील, यांतील बहुतेक सभासद लष्करी अधिकारी आहेत. शिवाय ते स्काउट कमिशनरही आहेत. आज हे दोन्ही अधिकार डॉक्टर खान-साहेब यांना उपभोगावयास मिळतात कीं नाहीं तें सांगणें कठीण आहे. कारण आपल्या लढाईच्या कालांत कदाचित् त्यांना या दोन्ही जागांसाठीं नालायक म्हणून ठरविलें असल्याचा पूर्ण संभव आहे. मि. रॉबर्ट ब्राउन नांवाच्या एका शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांचा या दोन्ही भावांशीं एवढा स्नेह होता कीं, आपल्या नोकरीवरून निवृत्त झाल्यावरही त्यांचा नेहमीं त्यांच्याशीं पत्रव्यवहार असे आणि दोघेही बंधु तुरुंगांत गेले आहेत असें कळल्यावर त्यांनीं त्यांना तुरुंगांत पत्र पाठविलें. त्यांत आपली मैत्री व एक-मेकांच्या गोड आतिथ्यांच्या आठवणी यांनीं भरलेले जुने दिवस यांची आठ-वण काढून अबदुल गफ्फारखानांबद्दल पुढील शब्द काढले होतेः—"अबदुल गफ्फारखानापेक्षां अधिक उदारचरित आणि प्रेमळ, सज्जन माझ्या पाहण्यांत आलेला नाहीं."

या बारीकसारीक गोष्टी देण्याचें कारण इतकेंच कीं, गोऱ्या लोकांशीं इतका घरोबा ठेवणारे आणि आपल्या मुलांना विलायतेंत शिक्षण देण्याचा आग्रह बाळगणारे गृहस्थ "अफगाण क्रांतिकारक" व 'सोवियट प्रजातंत्र स्थापणारे" असण्याचें मुळींच संभव नाहीं. येथें हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं मुसल्मानांतच एक धर्मांध वर्ग असा निघाला आहे कीं जो खान-बंधूंच्या हिंदु-मुसलमान ऐक्याविषयींच्या प्रयत्नांची टवाळी करतो, इतकेंच नव्हे तर ते खरे मुसलमान नाहींत असें दाखविण्यासाठीं वारंवार नव्या सबबी शोधीत असतो. यांपैकीं एक सबब अशी आहे कीं, दोघांही बंधूंनीं आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठीं विलायतेस पाठविलें आहे.

सोविएट राज्य स्थापण्याच्या इच्छेबद्दल त्यांच्यावर जो आरोप करण्यांत येतो त्याविषयीं एवढें सांगणें जरूर आहे कीं, खानसाहेबांच्या भाषणांतून अनेक उतारे सरकारनें प्रसिद्ध केले आहेत पण एकाही उताऱ्यांत सोविएट पद्धतीचें किंवा रशियाचें नांवदेखील दिसत नाहीं. बोल्शोविझम म्हणजे काय प्रकरण आहे तें देखील बिचाऱ्यांना ठाऊक नसेल; असें असतां हें नवें भूत हिंदुस्थानांत किंवा सरहद्द प्रांतांत दाखल करण्याची त्यांची इच्छा आहे या विधानांत काय अर्थ आहे? हिंदुस्थानांत एका काळीं ग्रामपंचायती होत्या, तेव्हां हिंदुस्थान देश इतर देशांचा गुलाम नव्हता. त्या काळची ती स्थिति जर कधीं फिरून या देशांत आणतां आली तर ती गोष्ट खानबंधूंना हवी आहे. पुष्कळदां ते म्हणतात, "आमच्या प्रांतांत पुष्कळ साळी पडले आहेत पण सर्वांचे रोजगारधंदे बंद पडले आहेत. आतां जर आमच्या प्रांतांत रहाट चालू होतील तर साळ्यांना जिवंत राखतां येईल. पण मी स्वतः कांतावयास शिकलों नाहीं तोंपर्यंत चरख्याची भाषा बोलण्याचा काय उपयोग? असें म्हणून एके दिवशीं ते स्वतः चरख्यावर बसले व कातावयास शिकूं लागले. तीनचार दिवसांत त्यांना पिळदार मजबूत सूत कांततां येऊं लागलें. सध्यां समाजवादाचा वारा वहात असल्यामुळें त्यांनीं पण या विषया-वरील बरेंचसें वाङ्मय तुरुंगांत वाचलें.

एके दिवशीं मोठे बंधु म्हणाले, "गांधीजींपेक्षां अधिक सच्चा समाज-वादी आम्हांला तरी कोणी मांहीत नाहीं. जर कोणी दाखवून द्याल तर आम्ही त्याच्या मार्गानें जाऊं." अबदुल गफ्फारखान एक दिवस मला

म्हणाले, "'खान' म्हणजे जमीनदार समजाना! ही जमिनदारी ब्रिटिश राज्यानें निर्माण केली. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी कांहींच नव्हतें. सरकारला आपल्या राज्यासाठीं आधारस्तंभ हवे होते, ते जमीनदार निर्माण करून त्यानें उभारले. माझ्या वाडवडिलांना जरी सरकारनेंच शेंकडों एकर जमिनीचे खान बनविलें असलें तरी खरें सांगण्यांत मला लाज वाटत नाहीं. आमच्या प्रांतांत ब्रिटिश राज्याचा पाया १८४९ त घातला गेला आणि त्या-नंतर २५ वर्षांत या जमीनदाऱ्या निर्माण झाल्या व खान बनविण्यांत आले. १८४९ पूर्वी आमच्या प्रांतांत सर्व खानांचे जिरगे भरत व प्रत्येक गांवांतील शेतांची मोजणी करून सर्वांना सारखा भाग मिळेल अशा रीतीनें चिठ्या टाकण्यांत येत. दर वीस वर्षांनीं अशा प्रकारें चिठ्या टाकीत. खान सर्वांपेक्षां मोठा ही गोष्ट खरी पण खानाजवळ इतरांपेक्षां अधिक जमीन नसे. सर्वांच्या हिस्स्याला सारखीच जमीन येई. मात्र वेगवेगळ्या जमिनींची मालकी वीस वीस वर्षांनीं बदलत असे आणि ज्याच्या चिठ्ठींत जी जमीन येई ती जमीन घेऊन सर्वजण सुखानें राहात. अशा रीतीनें वसाहतीच्या वसाहती एका गांवांतून दुसऱ्या गांवीं जात असत. यापेक्षां अधिक श्रेयस्कर असा दुसरा कोणता 'समाजवाद' असूं शकेल?"

---

दि. २१।८।७

## प्रकरण दहावें

# सर्वच कुटुंब कैदेंत

सत्याग्रहयुद्धाचा इतिहास अजून लिहिला गेला नाहीं. पण एवढी गोष्ट प्रसिद्धच आहे कीं, या युद्धांत कुटुंबेंच्या कुटुंबें स्वाहा झालीं होतीं. कोठें बाप, मुलगे, भाऊ, तर कोठें पतिपत्नी, तर कोठें भाऊ, बहीण, मेहुणा याप्रमाणें सर्व कुटुंबांतच नव्हे तर सोयऱ्याधायऱ्यांतूनही जे कोणी तुरुंगांत जाण्यास लायक होते. ते सर्व तुरुंगांत जाऊन बसले होते. ही गोष्ट सामान्यतः हिंदु कुटुंबांविषयीं सांगतां येईल. ब्रिटिश हिंदुस्थानांत मुसलमान कुटुंबें या प्रकारचीं तरी माझ्या माहितींत नाहींत. पण सरहद्द प्रांताचा इतिहास वेगळा होता; तेथें अनेक पठाण कुटुंबें, हिंदु कुटुंबांप्रमाणेंच स्वाहा झालीं होतीं. त्यांतूनही सर्वांचें लक्ष वेधून घेईल असें या बंधूंचें कुटुंब होतें.

१९३०–३१ पेक्षां १९३१–३२ च्या सालाबाबत हें म्हणणें अधिक खरें आहे. १९३० त स्वेच्छेनें तुरुंगांत जाणारे पुष्कळ होते. पुष्कळांना तुरुंगांत पाठविण्यास सरकार तयार नव्हतें. १९३१–३२ त सरकारनेंच राष्ट्रकार्यांत ज्यांनीं थोडा तरी भाग घेतला असेल अशांना टिपून तुरुंगांत अडकविलें. याचीं कारणें शोधण्याचें हें स्थळ नव्हे. १९३१ त गांधीजी व लॉर्ड अर्विन यांच्या दरम्यान झालेली तडजोड कोणीं मोडली याची चर्चा करूं गेल्यास अनेक प्रकरणें भरतील. तडजोडीच्या कालांत जर कोणत्या प्रांतावर सरकारच्या कृपादृष्टीचा अधिकांत अधिक वर्षाव झाला असेल तर तो सरहद्द प्रांतावर होय, ही समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. सविनय कायदेभंग तर बंद होता, तरीदेखील शेंकडों माणसांना कोठल्या ना कोठल्या सबबीवर तुरुंगांत टाकण्यांत आलें होतें. ज्याप्रमाणें आपल्या प्रांतांत करबंदीची चळवळ नव्हती त्याप्रमाणें ती सरहद्द प्रांतांतही नव्हती; पण महसूल भरण्यास असमर्थ असलेल्यांना ते जाणून बुजूनच भरीत नाहींत म्हणून कैदेंत टाकण्यांत आलें होतें. विशेषेंकरून हा गुन्हा करणारा कोणी खुदाइ खिदमतगार निघाला तर त्याचें पुरतें भरलेंच. शेंकडों उदाहरणांपैकीं फक्त दोनच उदाहरणें नमुन्यासाठीं देतों.

मझुल्लाखान नांवाच्या एका प्रसिद्ध खानाला व खुदाइ खिदमतगाराला कर न भरल्याबद्दल पकडण्यांत आलें. कच्च्या तुरुंगांतून त्यानें सरकारला अर्ज केला, व त्यांत स्पष्ट लिहिलें कीं, वसूल देण्याची माझी इच्छा नाहीं असें नाहीं, पण थोडी मुदत मिळेल तर मी सर्व वसूल भरण्याचा प्रयत्न करीन. पण २००० रुपयांच्या रकमेसाठीं त्याची एक मोटारगाडी, एक टांगा, एक घोडा व तीन म्हशी पकडण्यांत आल्या. तो सुटल्यावर त्याच्या शेतांतलें उभें पीक जप्त करण्यांत आलें. आणि इतकेही पुरेसें न वाटून शेवटीं दीड लाख रुपयांची त्यांची जमीन जप्त करण्यांत आली. डॉ. खानसाहेबांचा दुसरा मुलगा ओबेदुल्लाखान याचें नांव आपणांस माहीत आहेच.त्याच्या नांवावर असलेल्या जमिनीच्या महसूलपैकीं कांहीं बाकी होती. त्यांतील मोठा हिस्सा तर त्यानें भरला होता; पण ३०० रुपये बाकी होते. तेवढ्यासाठीं त्याला पकडण्यांत आलें आणि चरसाडाच्या एका कच्च्या तुरुंगांत डांबण्यांत आलें. कच्चा तुरुंग कसा असतो याचा आपलेकडे पुष्कळांना अनुभव आहे. चरसाड्याचा कच्चा तुरुंग घाण व दुर्गंधी यांनीं इतका भरला होता कीं ओबेदुल्लाखानानें तेथें थेंबसुद्धां अन्न घेण्याचें नाकारलें; त्याला दीड महिन्याचीच सजा झाली. या दीड महिन्यांत त्याला ३८ दिवस उपवास करावे लागले तेव्हां स्थिति बदलली; नंतर दोन दिवसांतच त्याला सोडून देण्यांत आलें. आपल्या पित्याजवळ गेल्यावर त्याला या दीर्घ उपवासानंतर लागणारी शुश्रूषा मिळाली. या गोष्टीला एक महिना झाला नाहीं तोंच तो आपल्या गांवीं गेला असतां तेथेंच ऑर्डिनन्सखालीं त्याला पुन्हा पकडण्यांत आलें !

सरहद्द प्रांतांत ऑर्डिनन्स चालू करण्याबद्दल सरकारनें जो जाहीरनामा काढला होता त्यांत खानबंधूंवर केलेल्या आरोपांचा सारांश मी सहाव्या प्रकरणांत दिलाच आहे. २३ डिसेंबरला चीफ कमिशनर यांनीं दरबार भरविला होता. त्यासाठीं या बंधूंना निमंत्रण होतें; अर्थात् तोंपर्यंत हे दोघे बंधू गुन्हेगार नव्हते असें म्हणतां येईल. पण दरबारला हजर राहण्याचें त्यांनीं नाकारलें, यामुळें ते गुन्हेगार ठरले. आपल्या पठाण बंधूंचा ठिकठिकाणीं अपमान करण्यांत येत असतां आणि वाटेल त्या सबबीवर त्यांना तुरुंगांत डांबलें जात असतां, या बंधूंना दरबारांत मानपान घेणें लज्जास्पद वाटलें.

बस्स; एवढीच गोष्ट ऑर्डिनन्स जाहीर करण्यास पुरेशी झाली. दोघेही बंधु दरबारला गेले असते तर ऑर्डिनन्स अमलांत आले नसते असें थोडेंच आहे!

अबदुल गफ्फारखान हे २९ डिसेंबर रोजीं गांधीजी विलायतेहून परत येणार होते, त्यांना भेटण्यासाठीं मुंबईस जाण्याची तयारी करीत होते. वडील बंधूना पंडित जवाहरलाल नेहरूंनीं नाताळचे दिवसांत अलाहाबादला येऊन राहण्याचें आमंत्रण दिलें होतें. पंडित जवाहरलाल विलायतेंत शिकत होतें तेव्हांपासून त्यांची डॉ. खान साहेबांशीं चांगली मैत्री होती. पण सरकारनें दोघांही भावांसाठीं वेगळ्याच प्रकारचा नाताळ योजून ठेविला होता. दोघांही बंधूना २४ रोजीं रात्रीं पकडण्यांत आलें. आणि त्यांना 'अटक ब्रिज' वर नेण्यांत आलें. डॉ. खान-साहेबांचे चिरंजीव सादुल्लाखान विलायतेहून आपला अभ्यास पुरा करून नुकतेच हिंदुस्थानांत आले होते, आणि सरहद्द प्रांताच्या प्रांतिक समितीचे मंत्री बनले होते, त्यांना देखील पकडण्यांत आलें. आणि वडिल व चुलते यांच्या स्पेशल ट्रेनमध्येंच त्यांना बसविण्यांत आलें. डॉ. खानसाहेबांच्या पत्नी दोन दिवसांपूर्वी उतमानझाईला गेल्या होत्या. त्यांना व सर्व कुटुंबाला मध्यरात्रीं उठविण्यांत आलें, घर रिकामें करून देण्याबद्दल सांगण्यांत आलें आणि पोलिसांना कसून झडती घेऊं द्या, असा हुकूम करण्यांत आला. दुसरा मुलगा ओबेदुल्लाखान, ज्याचा उपवास सुटून महिनासुद्धां झाला नव्हता,: त्यालाही पकडण्यांत आलें; खानबंधूना एकदमच पकडण्यांत आलें होतें तरी त्यांना वेगवेगळ्या ठिकाणीं पाठवून देण्याची व्यवस्था सरकारनें केली. डॉ. खानसाहेबांना जणूं काय पं. जवाहरलाल यांच्या भेटीस न्यावें अशा रीतीनें अलाहाबादच्या नैनी तुरुंगांत पाठविण्यांत आलें. अबदुल गफ्फारखानांना हझारीबागच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें, आणि सादुल्ला-खानांना बनारसच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. सर्वांना याप्रमाणें वेगवेगळें ठेविल्याबद्दल वर्तमानपत्रांतून बरीच टीका झाली. त्यामुळें वडील बंधूंनाही हझारीबागच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. ओबेदुल्लाखानच्या कपाळीं वेगळेंच लिहिलेलें होतें. त्याच्या तपशीलांत जाण्यापूर्वी इतकें सांगतों कीं, घरांत फक्त डॉ. खानसाहेबांच्या पत्नी आणि दोघांही बंधूंचीं लहान मुलें याशिवाय कोणीच उरलें नव्हतें. इतर हजारों पठाण भगिनींप्रमाणें खानबंधूंच्या

दोन्ही बहिणींनींही चळवळींत भाग घेतला होता, पण त्यांना पकडण्यांत आलें नव्हतें. पण त्या दोघां बहिणींच्या मुलांना पकडण्यांत आलें, त्यांच्या दुसऱ्या नातलगानांही पकडण्यांत आलें व अखेर सर्वच खुदाइ खिद्मतगारांना सरकारनें उचलून नेलें.

अबदुल गफ्फारखान यांना गांधीजींना भेटण्यास जाऊं दिलें असतें आणि पंडित जवाहरलाल यांना देखील मुंबईस जातांना वाटेंत पकडण्यांत आलें नसतें तर पुढच्या तीन वर्षांचा इतिहास कदाचित् वेगळ्याच रीतीनें लिहिला गेला असता. जर अबदुल गफ्फारखानांना आणि जवाहरलालजींना पकडल्यावर देखील गांधीजींची भेट घेण्याचें व्हाइसरॉयनें नाकारिलें नसतें तरीसुद्धां तो इतिहास निराळ्याच तऱ्हेनें लिहिला गेला असता. गांधीजींना तडजोडीचें पुनरुज्जीवन करावयाचें होतें. तुरुंगांत गेल्यानंतरही थोड्या दिवसांनीं शांतीसाठीं तळमळणाऱ्या गांधीजींनीं कैदी या नात्यानें लॉर्ड विलिंग्डन यांची भेट मिळावी म्हणून पत्र लिहिलें होतें पण त्याची पोंचसुद्धां देण्यांत आली नाहीं. याला दुसरें कोणतेंच कारण नव्हतें. कोठल्या तरी रीतीनें सगळी चळवळ चिरडून टाकण्याची सरकारची इच्छा होती. बंडखोरांशीं वाटाघाट करणें सरकारला कमीपणाचें वाटत होतें.

आतां थोडेंसें शूर ओबेदुल्लाखानांकडे वळूं. ३८ दिवसांच्या उपवासानंतर त्यांचें नांव अप्रिय झालेंच होतें, म्हणून त्यांना त्यांच्या वडिलांजवळ अथवा भावाजवळदेखील ठेविण्यांत आलें नाहीं. प्रथम लुधियानाच्या नंतर मुलतानच्या आणि मग तुरुंगाबाहेर खूपच चळवळ झाल्यामुळें शेवटीं सियालकोटच्या तुरुंगांत त्यांना नेण्यांत आलें. तेथें त्यांची प्रकृति थोडी सुधारली आणि हवा देखील मानवूं लागली. पण ही गोष्ट सरकारला मानवली नाहीं. त्यांचा पूर्ण विरोध असतांना देखील त्यांना फिरून मुलतानच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. त्याबरोबर त्यांनीं आपलें जुनें शस्त्र फिरून अमलांत आणिलें. आपल्या प्रकृतीस मानवत नसलेल्या जागीं आपणांला हट्टानें ठेविल्याबद्दल त्यांनीं १९३४ च्या फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेपासून उपवास सुरू केले. या युद्धाच्या इतिहासांतील हा असाधारण दीर्घ अवधीचा उपवास झाला. अखिल देशाचें लक्ष्य त्यांच्याकडे लागलें होतें, सभा भरल्या, पंडित मालवीयजीसारख्यांनीं सरकारला तारा केल्या. कधीं कधीं बेशुद्ध स्थितींत ओबेदुल्लाच्या

शरीरांत जबरीनें अन्न घालण्यांत येई; कधीं कधीं त्यांचें क्षीण शरीर देखील या गोष्टीचा यशस्वी रीतीनें प्रतिकार करी. ७८ दिवस हा उपवास चालला. अखेरीस सरकार हरलें आणि या पहाडासारख्या घठाणाची प्रखर प्रतिज्ञा शेवटास गेली. एवढ्या उपवासानेंहि त्यांच्या शरीरासच काय पण मनासही धक्का पोंचला नाहीं. ७८ दिवसानंतर सरकारनें त्यांना फिरून सियालकोट येथील तुरुंगांत पाठविलें, तेथें ते १८ ऑगस्ट पर्यंत होते.

ओबेदुल्लाखानांचें उदाहरण इतिहासांत नमूद करण्यासारखें आहे; पण त्याचें अनुकरण सोपें नाहीं, योग्य देखील नाहीं. शुद्ध सत्याग्रहाच्या कसोटीस तें उतरणार नाहीं. जर उपवासापूर्वी त्यांनीं गांधीजींची सल्ला मागितली असती तर गांधीजींनीं त्यांना उपवास करूं दिला नसता. पण त्यांनीं स्वतःला समजलेल्या सत्याचें पालन केलें आणि त्याचा परिणाम सहन करण्याची त्यांची पूर्ण तयारी होती. त्यांच्या असाधारण धैर्याची कोणीही मुक्तकंठानें स्तुतीच करील.

डॉ. खानसाहेब पुष्कळदां आपल्या या मुलाची गोष्ट सांगतात व म्हणतात: “ त्याच्या हिंमतीला व साहसाला जोड मिळणें कठीण आहे.” पण वडिल आणि चुलते यांची हिंमतही मुलाच्या हिंमतीला शोभेल अशीच होती. दोघांही भावांना हझारीबाग तुरुंगांत वर्तमानपत्रांच्या द्वारें ओबेदुल्लाखानांच्या उपवासाचा समाचार मिळत असे. कदाचित् त्यांनीं मागणी केली असती तर सरकारनें त्यांना ‘पॅरोल’ ( वचना ) वर मुलाला भेटण्यास जाऊं दिलें असतें—कदाचित् कैदी म्हणूनही भेट होऊं दिली असती. पण त्यांनीं कसलीच मागणी केली नाहीं, इतकेंच काय पण सरकारकडून मुलाचा समाचारही आणविला नाहीं, पत्रें लिहिलीं नाहींत, दुसऱ्यांकडूनही पत्रें मागविलीं नाहींत. ते तर त्या शूर मुलाला ईश्वरावर सोंपवून स्वस्थ बसले होते. शेवटीं जेव्हां आतां अंतकाळ समीप आला आहे, आतां ओबेदुल्लाचें शरीर मृत्यूशीं टक्कर देऊं शकणार नाहीं असें त्यांना वाटलें तेव्हां त्याचें कोठें आणि कशा रीतीनें दफन करावें या विषयीं त्यांनीं सूचना लिहून काढल्या आणि त्या सरकारकडे पाठविण्याचें ठरविलें. या सूचना पाठवून दोन चार दिवस झाले

नाहींत तोंच 'ओबेदुल्लाखान यांचा उपवास सुटला आणि त्यांना सियालकोट तुरुंगांत पाठविण्यांत आलें' अशी बातमी आली.

ही रोमांचकारी कथा ऐकून कोणाच्या डोळ्यांत पाणी येणार नाहीं ? पण वीर पिता वीर पुत्राची गोष्ट सांगत असतां हंसत होता, त्याच्या वर्णनांत लेशमात्र रोष नव्हता, तिरस्कार नव्हता, उलट वीरोचित पद्धतीनें त्यानें शत्रूच्या औदार्याबद्दल त्याला धन्यवाद दिले. " या सरकारविषयीं एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. उपवास सुटल्यानंतर त्यांनीं ओबेदुल्लाला बरें करण्याच्या कामी कांहीं उणीव राहूं दिली नाहीं. एवढ्या उपवासानंतर जर त्याची बरोबर निगा राखण्यांत आली नसती आणि जर त्याला योग्य अन्न देण्यांत आलें नसतें तर आम्हीं त्याला मुकलों असतों. सरकारनें त्याची कसोटी पाहिली खरी पण त्याला वांचविलें हेंही खरें. "

डॉ. खानसाहेबांच्या सर्वांत धाकट्या मुलाबद्दल एक ओळ लिहून हें प्रकरण पुरें करूं. हिदायतुल्लाखान हा मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत विद्यार्थी होता. सुटी घरीं घालवावी म्हणून तो उतमानझाईस गेला होता. त्यानें लढाईत नांवालासुद्धां भाग घेतला नव्हता आणि रजा संपल्यावर त्याला परत कॉलेजांत जावयाचें होतें. पण त्याचेवर ऑर्डिनन्स लागू झालें आणि त्याला सहा महिन्यांची सजा भोगावी लागली.

---

## प्रकरण अकरावें

# ईश्वराचे सेवक

या वीर पुरुषांची आज राज्याच्या शत्रूंमध्यें गणना होत आहे. राज्यशासन चालविणारांना वीरता चालू देणें हितावह वाटत नाहीं. ही वीरता चालू द्यावयाची तर मग या वीरांवरच राज्यशासन कां सोंपवून देऊं नये? लोकांना अशा वीरांचें अनुकरण करतां आलें नाहीं तरी त्यांची पूजा ते अवश्य करतात. वीरपूजा हें लोकांच्या विकासाचें साधन आहे.

पण हे बंधु लोकांच्या हृदयांत विराजत आहेत याचें कारण केवळ वीरता नव्हे, पण त्यांचें शुद्ध, साधें, त्यागी जीवन हें आहे. भारत अनादि कालापासून वीरतेपेक्षां पवित्र त्यागाचें अधिक पूजन करीत आला आहे, अथवा पवित्र त्यागांत भारतानें सर्वोत्कृष्ट वीरता पाहिली आहे.

१९३१ त खान अबदुल गफ्फारखान जेव्हां सरदार वल्लभभाईंना भेटण्यासाठीं बारडोलीस आले तेव्हां स्टेशनावर त्यांचें स्वागत करण्याकरितां गेलेले आम्ही त्यांना सेकंड क्लासांत शोधून दमलों. खानसाहेब फक्त एक लहानशी 'बॅग' बगलेंत मारून तिकीट दाखवीत दरवाजाजवळ उभे होते. घरीं गेल्यावर आम्हीं पाहिलें तों या "बॅगे" त त्यांचे रोज वापरण्याचे दोन कपडे आणि एक रेल्वेचें 'टाइम-टेबल' होतें. त्यांच्यांत इतका साधेपणा असेल अशी आमची कल्पना नव्हती. कराचीला बॅन्ड वाजविणाऱ्या खुदाइ खिदमतगारांबरोबर ते गांधीजींच्या मुक्कामावर येत, त्यामुळें त्यांना थोडीबहुत थाटामाटाची हौस असावी अशी आमची कांहींशी कल्पना झाली होती. पण खानसाहेब निवळ फकीर आहेत, असें आम्हांला दिसून आलें. पठाण या शब्दाचा अर्थदेखील मालमत्ता संग्रहीं असलेला जमीनदार, गांवचा पुढारी आणि पाटील असा होतो. ज्याच्याजवळ अशी मत्ता किंवा सत्ता नसते त्याला पुश्तो भाषेंत याहून उलट अशी 'फकीर' ही संज्ञा देण्यांत येते. हजारों एकरांची मिळकत असलेले अबदुल गफ्फारखान हे आपल्या मालमिळकतीची पर्वा न करितां स्वातंत्र्ययुद्धांत सर्वस्वाचें बलिदान देऊन स्वेच्छे-

ग्रंथ संग्रहालय ... ७५

नेंच फकीर बनले आहेत. अब्दुल गफ्फारखान हे अत्यंत दरिद्री पठाणांच्या मध्यें बसले असतां त्यांना चटकन् ओळखून काढणें जड जातें. पण या साधे-पणाबरोबर त्यांच्या जीवनांतील निर्मळ साधुता व निःसीम निरभिमान या गुणांनीं त्यांना पूजनीय बनविलें आहे. अमीरांच्या कुटुंबांत जन्म घेऊन त्यांनीं स्वभावाची अमीरी संपादिली आहे. पण स्वेच्छेनें फकीरी स्वीकारून सर्व जीवन आणि सर्व वागणी–राहणी हीं त्यांनीं गरीबा-प्रमाणें बनविलीं आहेत. आपल्या प्रांतांत सर्व ठिकाणीं त्यांनीं शेंकडों मैल पायीं प्रवास केला आहे, सामान्य गरीब लोकाची जाडी भरडी भाकर खाऊन त्यांनीं संतोष मानिला आहे. त्यामुळें हजारों लोक त्यांच्या तोंडून पडलेला शब्द झेलण्यास तत्पर बनले आहेत, हजारों लोकांनीं त्यांच्या बरोबर आपल्या सर्वस्वावर पाणी सोडिलें आहे.

लोकांच्या या प्रकारच्या निष्ठेच्या मूळाशीं त्यांची स्वतःची विलक्षण निष्ठा-शक्ति दिसून येते. " मी केवळ शिपाई आहें, हुकूम बजावणें हें माझें काम; शिपाइगिरी करीत असतांच माझा देह पडावा एवढेंच माझें मागणें आहे." हे शब्द त्यांच्या मुखांतून अनेकवार ऐकावयाला मिळतात. १९३४च्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यासाठीं पुष्कळांनीं विनंति केली तेव्हां त्यांनीं हेच शब्द उच्चारिले आणि दोन वेळां त्यांनीं आपलें नांव सुच-विणाऱ्यांना कडक शब्दांत ताकीद दिली. ज्या पुढारीपणांत दंभ आहे, डौल आहे, बाह्य भपका आहे, त्या पुढारीपणाचा त्यांना तिटकारा वाटतो. नेता म्हणजे सर्वांत श्रेष्ठ सेवक या गांधीजींच्या व्याख्येवर त्यांचा अक्षरशः भरंवसा आहे आणि म्हणूनच या शिपायाला हजारों शिपाई सहज मिळूं शकतात. त्यांच्या या गुणांची सरकारला सर्वांत अधिक भीति वाटते, आणि त्यामुळेंच सरकारनें १९२१ पासून आजपर्यंत त्यांना आठनऊ वर्षें आपल्या लोकांपासून दूर ठेविलें आहे.

ब्रिटिश अधिकाऱ्यांची भेदनीति पहाण्याचे प्रसंग त्यांच्या सर्व आयुष्यांत इतके आले आहेत कीं सामान्यपणें ते ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे साशंक नजरेनेंच पहात असतात, आणि त्यांच्या शब्दांवर त्यांचा तत्काळ विश्वास बसत नाहीं. लॉर्ड चेम्सफर्डचे खासगी चिटणीस मि. जॉन मेफी यांचा महात्माजीशीं फार चांगला संबंध होता, आणि त्याच्या घरंदाज

पणाची गांधीजींवर नेहमींच चांगली छाप पडली होती. हेच साहेब 'सर' जॉन मेफी होऊन सरहद्दप्रांताचे चीफ कमिशनर म्हणून गेले तेव्हां खानसाहेबांच्या कुटुंबाशीं घरोबा असतांही अबदुल गफ्फारखानांवर त्यांची फारशी चांगली छाप पडली नाहीं. म्हणून खानसाहेब गांधीजींशीं मेफीसाहेबांविषयीं बोलत असतां पुष्कळदां त्यांचा उल्लेख व्यंगोक्तीनें 'तुमचे मित्र मेफी' असा करितात आणि त्यांना खूप हंसवितात. पण त्यांच्या अंतःकरणांत अधिकारी वर्ग किंवा इंग्रज यांच्याविषयीं थोडासुद्धां वैरभाव नाहीं, आणि इंग्रज लोकांशीं आपलें वर्तन कसें असावें या बाबतींत गांधीजींचा प्रत्येक शब्द स्वीकारण्यास त्यांना संकोच वाटत नाहीं. डॉक्टर खानसाहेबांचे अनेक अधिकारी मित्र त्यांचेही मित्र आहेत. आजचे गव्हर्नर त्यांच्या घरीं अनेक वेळां पाहुणे म्हणून आले होते आणि सर्व कुटुंबाला ते उत्तम प्रकारें जाणतात. असें असूनही ते आज या दोघांही भावांविषयीं पुष्कळ खोट्या बातम्या कशा फैलावून देतात याचें त्यांना मोठें आश्चर्य वाटतें.

पण त्यांच्या आयुष्यांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट सांगावयाची म्हणजे त्यांची धर्मनिष्ठा ही होय, आणि या धर्मनिष्ठेंतच त्यांचे सगळे गुण येतात. धर्मनिष्ठा म्हणजे अल्लाला समर्पण करून प्रत्येक कार्य करणें. हाच खरा इस्लामधर्म असें त्यांना वाटतें, आणि अल्लाला कोणतीही मलिन किंवा असत्य वस्तु अर्पण करतां येत नाहीं, यामुळेंच त्यांच्या जीवनांत अस्वच्छता किंवा असत्य हें पाहूं गेल्यास सांपडणार नाहीं. गांधीजींच्या जीवनाची परीक्षा देखील याच कसोटीवर त्यांनीं करून पाहिली आहे; आणि या कसोटीस ते पूर्णपणें उतरतात म्हणूनच त्यांची महात्माजींवर असाधारण निष्ठा आहे. गांधीजींचें नांव किंवा प्रतिष्ठा पाहून कांहीं ते त्यांच्याकडे ओढले गेले नाहींत; गांधीजींच्या बंडखोर वृत्तीमुळें किंवा असामान्य त्यागामुळेंही ते आकृष्ट झाले नाहींत. गांधीजींची ईश्वरार्पण बुद्धीनें काम करण्याची रीत हेंच त्यांचें मोठें आकर्षण. ज्याप्रमाणें गांधीजींनीं आत्मशुद्धीला आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनाचें एक सामान्य अंग बनविलें आहे त्याप्रमाणें त्यांनाही आत्मशुद्धि साधणें हें ध्येय वाटतें. राजकारण आणि धर्म अथवा नीति यांचा कांहींसुद्धां संबंध नाहीं असें म्हणणें त्यांना असह्य वाटतें; त्यांना तर ईश्वराला विसरून केलेलें एकही कार्य पसंत नाहीं. मला अनेक मुसलमान

पुढाऱ्यांचा सहवास लाभला आहे, त्यांतील पुष्कळ बावनकशी सोन्यासारखे शुद्ध आहेत. आणि त्यांची देशभक्ति तसेंच हिंदुमुस्लिम ऐक्य साधण्याबद्दलचा त्यांचा उत्साह या बाबतींत दुमत होणें शक्य नाहीं. त्यांचा त्यागदेखील हलका सलका नाहीं. पण जीवनांतील प्रखर पवित्रता, फकीरी आणि ईश्वरश्रद्धा या बाबतींत खानसाहेबांची बरोबरी कोणी करूं शकेल असें वाटत नाहीं. त्यांच्या उपवासमय व संयमी जीवनांतील अनेक उदाहरणें मीं मागें दिलींच आहेत. त्यांचें निष्कलंक जीवन पाहून कोणाच्याही मनांत त्यांच्याबद्दल भक्ति उत्पन्न होईल. सरदार वल्लभभाईप्रमाणें तरुण वयांतच ते विधुर झाले, पण पुन्हां लग्न करण्याचा विचार त्यांच्या मनांत कधींच आला नाहीं. 'परस्त्री मातेसमान' हें सूत्र त्यांनीं आपल्या जीवनांत विस्मयकारक रीतीनें गोंविलें आहे. श्रीमती खोरशेद बहेन यांनीं एक गोट मला सांगितली ती येथें दिल्याशिवाय माझ्यानें राहावत नाहीं. एकदां या बाई त्यांचेबरोबर प्रवास करीत होत्या. एक वीरांगना पठाणांच्या देशांत गेली असतां सर्वजण तिला पहावयास येणारच. डब्यांत बसलेल्या खोरशेद बहेनला सर्वजण न्याहाळून पहात होते. खानसाहेब डब्याच्या दरवाजांत जाऊन उभे राहिले आणि जरा डोळे लाल करून म्हणाले, "बहनजीकी और क्या देखना है? हमको देखो." सर्व तेथून निघून गेले.

पण मीं मागें सांगितल्याप्रमाणें हें सर्व त्यांच्या ईश्वरार्पण बुद्धींतून निपजलें आहे. एकदां त्यांनीं मला म्हटलें, "जेव्हां गांधीजींच्या आयुष्यांत कोठलाही प्रश्न येऊन उभा राहातो आणि गांधीजी कांहीं असाधारण कृत्य करतात, तेव्हां माझें मन मला ताबडतोब सांगतें कीं, 'ईश्वरार्पण बुद्धीनें काम करणाऱ्यांचें पाऊल वांकडें पडणारच नाहीं.' मला तर गांधीजींचे सर्व उपवास खुदाच्या मर्जीनुरूप होत असलेले दिसतात. १९३४ त गांधीजींनीं राष्ट्रीय सभेंतून निवृत्त होण्याबद्दलचे पत्रक लिहिलें व त्यांना दाखवून त्यांचा अभिप्राय विचारिला तेव्हां त्यांनीं सांगितलें; 'गांधीजींनीं हा निर्णय ठरविला. याबद्दल मला यत्किंचितही आश्चर्य वाटत नाहीं. त्यांच्या निर्णयावर शंका घेणें मला नेहमीं अवघड वाटतें; कारण ते ईश्वराला नित्य साक्षी ठेवितात आणि त्याला विचारून सर्व करतात. प्रत्येक महान् सुधारकानें असेंच केलें आहे; आणि प्रत्येक महान् सुधारकाच्या आयुष्यांत असा

समय येतो कीं, जेव्हां त्याला आपल्या अनुयांयाना मागें टाकून त्यांची दुर्बलता व त्यांचे दोष यांच्या बंधनांतून पुढें पाऊल टाकणेंच त्याला श्रेयस्कर वाटतें. पण म्हणून ते अनुयायांचा त्याग करितात, किंवा त्यांची सेवा कमी करितात असें नाहीं, उलट त्यांच्या सेवेचें क्षेत्र पूर्वीपेक्षां अधिक व्यापक बनतें. माझ्याजवळ एकच माप आहे व तें ' ईश्वरार्पण बुद्धीचें.' हेंच माप ते दुसऱ्यांना लावतात आणि दुसऱ्यांनीं देखील याच मापानें आपणांस जोखून पाहावें अशी त्यांची इच्छा असते.'

वडील बंधु वेगळ्या प्रकारचे गृहस्थ आहेत. त्यांनीं जग पाहिलें आहे, परदेशांत १० । ११ वर्षें काढलीं आहेत, अनेक स्नेहसंबंध जोडिले आहेत. म्हणून धाकटे बंधू अधिक अंतर्मुख आहेत, तर वडील बंधु अधिक बहिर्मुख आहेत असें म्हटलें तरी चालेल. धाकटे बंधु एक धुरंधर कर्मयोगी आहेत तरी ते जगापासून दूर राहातात असें वाटतें. वडील बंधूंत ही वृत्ति नाहीं. ते जगाला ओळखण्याचा प्रयत्न करतात, त्याच्याबरोबर संबंध ठेवतात, व्यवहारकौशल्य अंगीं आणण्याचा प्रयत्न करतात. धाकटे बंधु संयम व आत्मनिग्रह यांवर अधिक जोर देतात तर वडील बंधु संयम पाळण्याची संधी येईल तीसाठीं सदैव सज्ज असतात. धाकटे बंधु त्यागाचे प्रसंग हुडकीत असतात. तर वडील बंधु असे प्रसंग येतात तेव्हां आनंदानें त्यांचें स्वागत करतात. एकदां विडी ओढण्याची गोष्ट निघाली असत डॉक्टर खानसाहेब म्हणाले, "मला विडी ओढण्याची इतकी वाईट खोड होती कीं, रोज पन्नास पन्नास सिगारेट मी ओढीत असे. पण १९३१ त मला वाटलें कीं यापुढें तुरुंगापासून दूर राहाणें शक्य नाहीं, इतरांप्रमाणें आपलीही पाळी लौकरच येणार; तेव्हां मीं निश्चय केला कीं, सिगारेट सोडावयाची!" बस्स, त्या वेळीं सिगारेट सोडली ती सोडली. पण खान अबदुल गफ्फार-खानांनीं साऱ्या आयुष्यांत विडीला स्पर्श केला नाहीं.

डॉ. खानसाहेब स्वभावतःच खेळाडू वृत्तीचे आहेत. कॉलेजांत होते तेव्हां कॉलेजांतील क्रिकेट टीमचे ते नायक: होते. लंडनमध्यें असतांना ते क्रिकेट उत्तम प्रकारें खेळत; एवढेंच नव्हे तर फूटबॉलमध्यें देखील त्यांनीं प्राविण्य मिळविलें होतें. १९३० पर्यंत ज्यांनीं जीवनांतील मौजेचा अनुभव घेतला, अनेक मोठमोठ्या मित्रांना पाहुणचार दिला, कांहीं अंशीं थाटमाट देखील

राखला, त्यांना एकाएकीं तुरुंगांत जाणें भाग पडावें व बंडखोर म्हणवून घेण्यांत भूषण वाटूं लागावें ही कांहीं थोडीथोडकी गोष्ट नव्हे. धाकट्या बंधूंनीं तर २९ वर्षांच्या वयांतच कफनीचा अंगीकार केला आणि फकीरी तर त्यांच्या हाडांतच मुरली होती असें म्हणतां येईल. परंतु डॉक्टरसाहेबांना देखील फकीरी स्वीकारण्यास उशीर लागला नाहीं. कारण ते एक उत्तम खेळाडू आहेत. कधीं डाव अंगावर येतो, कधीं यशस्वी होतो. यश मिळाल्याचा जर हर्ष नाहीं तर अंगावर आल्याबद्दल उद्वेग कशाचा? आयुष्यांत कडू घोट घ्यावे लागतात, व मधुर मिळत नाहींत असेंही नाहीं—आपली दोहोंलाही तयारी असावी. पण अबदुल गफ्फारखानांची विचारसरणी वेगळी आहे. त्यांनीं विषांतून अमृत चाखण्याची तालीम आयुष्यभर घेतली आहे आणि तीच चालू ठेवली आहे.

डॉक्टरांच्या खेळाडू वृत्तीचें एक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. कर्नल सॅन्डिमन नांवाचा एक मोठा लष्करी अमलदार १९३१ च्या तडजोडीच्या कालांत आपली तुकडी घेऊन पेशावर येथें आला होता. अमलदारांना ही तडजोड मुळींच पसंत नव्हती हें आपणाला माहीत आहेच. कर्नल सॅन्डिमन यांचा डॉक्टर खानसाहेबांशीं पुष्कळच स्नेह होता, म्हणून त्यांनीं आपली भावना डॉक्टरपासून लपविली नाहीं. डॉक्टरनीं ताबडतोब त्यांचें मनोगत जाणून म्हटलें, "नाहीं, नाहीं कर्नल सॅन्डिमन, तुम्ही हरलांत असें मानण्याचें कारण नाहीं. राजकारण म्हणजे हा एक खेळ आहे, जय पराजय दोन्ही पक्षांना मिळत असतो, क्रिकेटमध्यें ज्याप्रमाणें एक पक्ष खेळ संपल्यावर दुसऱ्या पक्षाशीं आनंदानें हस्तांदोलन करतो, त्याप्रमाणें या खेळांतही आपण लढाई आटोपल्यावर एकत्र कां होऊं नये? पण खरी गोष्ट अशी आहे कीं, आज विजयाचा प्रश्नच नाहीं. आज कोणी हरलें नाहीं आणि कोणीं जिंकलें नाहीं. आपल्यामध्यें ही तडजोड झाली आहे." कर्नल सॅन्डिमन खूष झाले, आणि निघतांना म्हणाले, "बरोबर आहे, आपली मैत्री इतकी जुनी आहे कीं, माझ्या तुकडीला चरसाडांत कोणत्याही प्रकारचें अप्रिय काम करण्याचा प्रसंग येणार नाहीं अशी मला आशा आहे."

धाकटे बंधु आपली धर्मभावना व त्याग इतक्या थराला नेतात कीं कधीं कधीं त्याला असहिष्णुतेचें रूप येतें. वडील बंधु विरोधकांशीं मिळतें घेण्या-

साठीं धाकट्या बंधूंपेक्षां अधिक प्रयत्न करतात. आजकालच्या नवमतांचा वारा डोक्यांत भरलेल्या विद्यार्थ्यांशीं डॉक्टरसाहेब गोड बोलून, हंसून खेळून त्यांच्याकडून काम करून घेतील, तर अबदुल गफ्फारखानांचें त्यांच्याशीं कदाचित् मुळींच जमणार नाहीं. गुलाम देशांत गुलामी शिक्षणासाठीं द्रव्य उधळणें हाच त्यांना गुन्हा वाटतो. तथापि अबदुल गफ्फारखानांना आपल्या मर्यादांची पूर्ण जाणीव आहे. डॉक्टरसाहेबांना असेंब्लीसाठीं उभे रहाण्यास सांगण्यांत आलें तेव्हां थोडा वेळ त्यांना संकोच वाटला, तरी त्यांनीं नंतर कबूल केलें. पण अबदुल गफ्फारखानांना अशी सूचना करण्याचें देखील धैर्य कोणाला होणार नाहीं. राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें त्यांनीं दोन वेळां साफ नाकारलें. वडील बंधूंत विलक्षण मनमिळाऊपणा आहे. अबदुल गफ्फारखान अनोळखी माणसांना कदाचित् तुसडे वाटतील.

परंतु ईश्वरानें दोघा भावांची अजब जोडी निर्माण केली आहे. एक दुसऱ्यांतील अपूर्णता भरून काढतो; तरी दोघांतही साधुता, सत्यनिष्ठा आणि निश्चय हीं सारखींच भरलेलीं आहेत; दोघांतही एकसारखाच विश्वासूपणा आणि घरंदाजपणा हे गुण दिसून येतात. दोघांनाही स्वतःस खुदाइ खिदमतगार म्हणविण्यांत आनंद व अभिमान वाटतो, आणि हें साधें परंतु मोठें नांव धारण करण्यासाठीं त्यांचें सर्व जीवन हा एक अखंड ज्ञानपूर्वक होणारा प्रयत्न आहे.

## प्रकरण बारावें

# वर्ध्यांतील घरांत

सन १९३४ च्या अखेरीस हजारीबाग तुरुंगांतून सुटल्यानंतर दोघांही भावांनीं शेठ जमनालाल बजाज यांचें घर हें आपलेंच घर मानलें. या दोघा भावांशीं जमनालालजींची जमलेली मैत्री हिंदुमुस्लिम ऐक्याच्या इतिहासांत एक उज्ज्वल प्रकरण ठरेल.

दोघे भाऊ सुटल्याची बातमी मिळतांच जमनालालजींनीं दोघांनाही वर्ध्यास येण्याची तार केली. त्या वेळीं स्वतः जमनालालजी मुंबईत आजारामुळें बिछान्यास खिळून होते, पण गांधीजी वर्ध्यास होते म्हणून त्यांनीं ही तार केली आणि दोघांही भावांनीं या आमंत्रणाचा आनंदानें स्वीकार केला. त्यांना सरहद्द प्रांतांत प्रवेश करण्याची मनाई होती इतकेंच नव्हे तर पंजाबांत जाण्याची देखील मनाई होती. बिहारमधील तुरुंगांत त्यांनीं तीन वर्षें काढलीं. त्यामुळें बिहारच्या मित्रांचा आग्रह त्यांनीं तेथेंच आपला मुक्काम कायम करावा असा होता, तरी गांधीजी व जमनालालजी यांच्या आग्रहासच दोघा बंधूंनीं मान दिला. तुरुंगांतून बाहेर निघाल्यावर पूर्णपणें गांधीजींच्या सल्ल्या-प्रमाणेंच वागावयाचें असा निश्चय करूनच ते बाहेर पडले होते. म्हणून स्वाभाविकच वर्ध्याला रहाण्याचा त्यांचा निश्चय झाला.

शेठ जमनालालजी व सौ. जानकीदेवी यांच्या पाहुणचाराचे हे १००दिवस ही त्यांच्या जीवनांतील एक गोड स्मृति होऊन राहील. दोघेही बंधु सगळ्या कुटुंबांत इतके मिसळून गेले होते कीं तिऱ्हाईत माणसाला ते कुटुंबाबाहेरचे आहेत असें क्वचितच वाटलें असतें. दोघांही भावांच्या स्वभावांत कोमळ प्रेमळपणा भरलेला आहे, तरी वडील बंधूंतील मनमिळाऊपणा असाधारण आहे. त्यामुळें धाकटे बंधु गांधीजींबरोबर सांजसकाळ फिरत असतां पुष्कळ कथा-वार्ता सांगत असत, तर वडील बंधु जमनालालजींच्या मुलांबरोबर गंमत जंमत करीत, त्यांचेबरोबर भटकण्यास निघत आणि जमनालालजींच्या रोज

वाढत जाणाऱ्या कुटुंबांत वारंवार आजारी पडणाऱ्या लोकांची सेवा करीत. हळू हळू सत्याग्रहाश्रमास जोडलेल्या कन्याश्रम व महिलाश्रम यांतील भगिनींची सेवा व शुश्रूषा करण्याची मागणी त्यांनीं केली आणि ही मागणी गांधीजींनीं आभारपूर्वक स्वीकारली. त्यानंतर त्यांनीं वर्धा जिल्ह्यांतील खेड्यांत प्रवेश करण्याचा कार्यक्रम तयार केला. रोज दहापंधरा मैल पायीं जात येत आणि खेड्यांतील लोकांची सेवा करीत. त्यांच्यासारख्या आय्. एम्. एस्. अधिकाऱ्याला रोग्यांजवळ बसून त्यांना शेक करतांना व त्यांचें डोकें चेपतांना पाहून कोणालाही आनंद व आश्चर्य वाटल्यावांचून राहत नसे. तापांतून उठलेल्या रोग्यासाठीं भाजीचें पाणी हें एक त्यांचें खास औषध आहे. स्टोवजवळ तास दोन तास बसून हें पाणी ते स्वतः बनवीत व रोग्याची शुश्रूषा करणाऱ्याला तें कसें बनवावें तें शिकवीत. या वेळीं दक्षिण आफ्रिकेंतून दीनबंधु ॲन्ड्रयूज यांच्याबरोबर त्यांचे मि. जोन्स या नांवाचे एक मित्र आले होते, त्यांची प्रकृति अकस्मात् बिघडली; आंतड्यांना सूज आली होती, दुखणें गंभीर होतें. म्हणून मुंबईस जाऊन योग्य शुश्रूषा करून घेण्याबद्दल मित्रांनीं सल्ला दिली. पण डॉक्टर खानसाहेबांनीं म्हटलें, "मी योग्य आहार वगैरे देऊन त्यांना बरें करीन." आणि सतत चोवीस तास लक्ष देऊन त्यांनीं त्यांना बरें केलें. हें त्यांचें रोजचें काम होतें. पुष्कळदां फिरावयास निघालों असतां ते आमच्याबरोबर येत; पण शांतपणें मागें मागें चालत, गांधीजींचें भाषण लक्ष देऊन ऐकत पण मध्यें बोलण्याचा प्रयत्न कधीं करीत नसत.

धाकट्या बंधूंच्या निष्ठेची काय गोष्ट वर्णावी? वर्ध्यास येऊन एकादा महिना होतो तोंच त्यांना तारांवर तारा येऊं लागल्या व ठिकठिकाणचीं आमंत्रणें थडकूं लागलीं; तेव्हां त्या सर्व तारा ते गांधीजींसमोर ठेवीत आणि कोठें जावें, तेथें काय करावें, काय बोलावें, याविषयीं विस्तृत सूचना ते गांधीजींपासून घेत. प्रवासांतून आल्यावर प्रत्येक ठिकाणीं आपण कोणाला भेटलों, किती सभांतून गेलों, तेथें काय काय बोललों, प्रत्येक जागीं कोणकोणते अनुभव मिळाले या सर्व गोष्टींचा बारीक सारीक तपशील सांगत. स्वदेशी प्रदर्शन खुलें करण्यास देखील ते गांधीजींची परवानगी मागत. मुंबईच्या राष्ट्रीय सभेचे वेळीं प्रदर्शन खुलें करण्यास खानसाहेबांची संमति मिळविण्यासाठीं मुंबईच्या मित्रांना गांधीजींना विनंति करावी लागली होती.

गांधीजींनीं आग्रह केला तेव्हांच ते राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळाचे सभासद झाले. १९३४ च्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची त्यांना इच्छा असती तर तें त्यांना सहज मिळालें असतें. बाबू राजेन्द्रप्रसाद यांनीं त्यांना आग्रह केलाच होता, मुंबईच्या कित्येक मित्रांचाही अतिशय आग्रह होता, पण खानसाहेबांची स्वतःची अनिच्छा इतकी बलवत्तर होती कीं, त्यांना आग्रह करण्याची सोयच नव्हती. दोनदां त्यांनीं जोरानें घोषणा केली कीं, "मी फक्त शिपाई आहें. मला हें सरदाराचें स्थान शोभणार नाहीं. मी केवळ लोकांत राहून त्यांची सेवा करीन, राजकारणाची गुंतागुंत माझ्यानें उकलणार नाहीं." आणि तरीही समजा कीं गांधीजींनीं त्यांना आग्रह केला असता कीं राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें पाहिजेच, तर त्यांची आज्ञा त्यांनीं शिरसामान्य केली असती. ही त्यांच्या शिपाईगिरींतील मौज आहे.

डॉ. खानसाहेबसुद्धां शिपाईगिरींत धाकट्या भावासारखेच आहेत. गांधीजींनीं त्यांना असेंब्लीसाठीं उभे राहण्याचा आग्रह केला तेव्हां इतरांशीं बोलतांना जरी त्यांचा शेवटपर्यंत कायदेमंडळांत जाण्याविरुद्धच युक्तिवाद चालला होता तरी ते तत्काळ कबूल झाले.

राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत अशा जाज्वल्य निष्ठेचे नमुने शोधले तरी सांपडणें कठीण. ही निष्ठा त्यांनीं आपल्या घरगुती जीवनांतील प्रश्नांपर्यंत पोहोंचविली आहे. वर्धा येथें मुक्काम असतां खानसाहेब अबदुल गफ्फारखान यांना कन्याश्रम व महिलाश्रम या संस्थांतील भगिनींचें जीवन पाहण्याची संधि मिळाली. त्या भगिनींचा साधेपणा, सरळपणा आणि निर्मलता हीं त्यांना आवडलीं. या आश्रमांतील शांतीचें व स्वतंत्रतेचें वातावरण त्यांच्या मनांत भरलें आणि विलायतेंत डॉ. खानसाहेबांच्या इंग्रज पत्नीजवळ राहून तेथील शाळेंत शिकत असलेल्या आपल्या मुलीला बोलावून आणावें असें त्यांना वाटलें. जिला हिंदुस्थानांत आयुष्य घालवावयाचें आहे, जिला हिंदी लोकांची सेवा करावयाची आहे, तिला इंग्रजी रीतिभाती व इंग्रजी विद्या यांचें शिक्षण कोंवळ्या वयांत मुळींच देतां कामा नये असें त्यांना वाटलें; त्यांनीं आपले विचार गांधीजींना कळविले आणि गांधीजींचा अभिप्राय मागितला. गांधीजींनीं त्यांच्या विचारास अनुमोदन दिलें आणि खानसाहेबांनीं आपल्या मुलीस मीराबहेनबरोबर परत पाठविण्याबद्दल आपल्या भावजयीस तार केली;

पण येथें येऊन तिनें अभ्यास कोठें करावयाचा? गांधीजींनीं म्हटलें, "आपली इच्छा असेल तर कुमारी मेहरताज हिला कन्याश्रमांत जरूर ठेवतां येईल; पण ती बिचारी लहान असल्यामुळें निरामिष आहार व आश्रमांतील कठीण जीवनक्रम हीं तिला झेंपणार नाहींत." खानसाहेब म्हणाले: "पण मीराबहेनसारखी सज्जन भगिनी जर तिला आईप्रमाणें आपल्या पंखाखालीं ठेवील तर सगळें ठीक होईल याविषयीं मला शंका वाटत नाहीं. जर विलायतसारख्या परदेशांत अगदींच अपरिचित वातावरणांत पठाण-कन्या राहूं शकली तर आपल्याच देशांतील वातावरणांत ती कां राहूं शकणार नाहीं?" मीराबहेनबरोबर लहानगी मेहरताज निघाली. दोघीही तिसऱ्या वर्गांतील उतारू म्हणून आल्या आणि २२ नोव्हेंबर १९३४ रोजीं वर्ध्यास पोहोंचल्या. राहिला धाकटा मुलगा अबदुल अली. हा मुलगा कर्नल ब्राउनच्या डेहराडून येथील शाळेंत शिकत होता. या शाळेविषयीं तर खानसाहेबांस कांहींच सांगावयाचें नव्हतें. दुसरा मुलगा याच शाळेंतून सीनियर केंब्रिजची परीक्षा पास झाला होता, पण आतां मुलांना सीनियर केंब्रिजच्या परीक्षांतून उत्तीर्ण करवून काय करावयाचें हा प्रश्न सहजच खानसाहेबांसमोर उभा राहिला. त्या मुलालाही त्यांनीं तार करून स्वतः कानपूर स्वदेशी प्रदर्शन उघडण्यास गेले होते तेथें बोलावून घेतलें आणि आपल्याबरोबर त्याला वर्ध्यास घेऊन आले. पुढें तुरुंगांत जाण्याची वेळ आली तेव्हां दोघांही लहान मुलांना जमनालालजी व सौ. जानकीदेवी यांच्या हवालीं करून खानसाहेबांनीं निश्चिंतपणें निरोप घेतला.

याप्रमाणें आपल्या मुलांना श्री. जमनालालजी व सौ. जानकीदेवी यांच्या स्वाधीन करतांना, किंवा गांधीजींच्या हवालीं करतांना, त्यांना तिळभरही संकोच वाटला नाहीं, उलट हलकें वाटलें. कारण खानसाहेबांनीं गांधीजींना आणि जमनालालजींना सख्ख्या भावाचें स्थान कधींच दिलें आहे. हा भ्रातृभाव वर्ध्यास असतांना जमनालालजींबरोबरच्या त्यांच्या सहवासानें द्विगुणित झाला. वर्धा येथें गांधीजी व जमनालालजींबरोबर त्यांच्या गोष्टी होत. त्या बहुतेक राजकीय नसून धार्मिक असत, आणि बोलण्यापेक्षां एकमेकांच्या जीवनाचें निरीक्षणच त्यांनीं अधिक केलें. या खोल भ्रातृभावाचें मूळ या गोष्टींत राहिलें आहे. खानसाहेब एकही नमाज चुकवीत नाहींत हें सर्वांना माहित होतें, पण चार वाजण्यापूर्वीं उठून जमनालालजींच्या घरून

चालत प्रातःकाळच्या सवाचार वाजण्याच्या वेळेच्या प्रार्थनेसाठीं ते आश्रमांत जात, ही गोष्ट पुष्कळांना माहीत नव्हती. त्या दिवसांत गांधीजी सकाळीं सात वाजतां तुलसी रामायणांतील थोडा भाग व 'हरिने भजता हजी कोईनी लाज जबी नथी जाणी रे' हें भजन गाऊन घेत. या तुळसी रामायणाच्या पाठाच्या वेळीं ते रोज हजर असत, आणि भजनांतील संगीतांत इतके तल्लीन होत कीं आपणांस आश्चर्य वाटावें. तुरुंगांत जाण्यापूर्वीं दोन दिवस अगोदर ते प्यारेलालला म्हणाले, 'यह भजन मुझे बडा प्यार लगता है उसे उर्दूमें लिख दो और उसका मानी भी साथ साथ लिख दो।

दोन दिवसांत खानसाहेब सरकारचे पाहुणे होणार आहेत हें आमच्यापैकीं कोणाच्याही स्वप्नांतसुद्धां आलें नाहीं!

## प्रकरण तेरावें

# परत आपल्या खऱ्या घरीं

याप्रमाणें दोघांही बंधूंचा जीवनप्रवाह शांतपणें चालत असतां आणि दोघेही आपापला भावी कार्यक्रम ठरवीत असतां अवचित धाकट्या बंधूंना सरकारचें बोलावणें आलें. मीं मागें सांगितलेंच आहे कीं, ते गांधीजींना विचारल्याशिवाय क्वचितच कोठल्याही स्थळीं जात, आणि जाहीर सभांतूनही गांधीजींना विचारल्याशिवाय क्वचित्च कसलेंही भाषण करीत. पण मुंबईच्या राष्ट्रीय सभेंतील सप्ताहांत कित्येक ख्रिस्ती मित्रांनीं त्यांना मोह घातला. सर्वांना त्यांची ओळख करून घेण्याची हौस होतीच, हिंदी ख्रिस्ती मित्रांनीं त्यांना आपल्या मंडळाच्या एका लहानशा सभेंत नेलें व खुदाइ खिदमतगारांची ओळख करून देण्याबद्दल त्यांना विनंति केली. खानसाहेबांनीं सरळपणानें आपलें हृदय ओतलें. तें त्यांना भारी महाग पडलें.

राष्ट्रीय सभेंतून आल्यावर कांहीं तरी भक्कम विधायक कार्य हातीं घेण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. ग्रामोद्योग मंडळाच्या कार्यवाहक मंडळाचे सभासद म्हणून त्यांची निवडणूक झाली होतीच. बंगालमधील खेडयांत प्रवास केल्यावर त्यांच्या मनांत तेथें जाऊन काम करण्याची मोठी इच्छा उत्पन्न झाली होती. तेथील खेड्यांतील मुसलमानांची गरीबी पाहून त्यांच्या हृदयास घरें पडले होते, खादीमुळें त्यांची होत असलेली सेवा त्यांनीं प्रत्यक्ष पाहिली होती, म्हणून ग्रामोद्योगाचा संदेश त्यांच्याकडे घेऊन जाण्याचा त्यांचा उद्देश होता. ९ डिसेंबर रोजीं बंगाल प्रांतांत जाण्यासाठीं ते निघणार होते, पण ग्रामोद्योग संघाच्या कार्यवाहक मंडळाची पहिली बैठक १५ रोजीं होती. तोंपर्यंत थांबण्यासाठीं जमनालालजींनीं त्यांस आग्रह केला; त्यास त्यांनीं मान दिला. ७ डिसेंबर रोजीं संध्याकाळीं त्यांच्या बंगालमधील कार्याचा आम्ही विचार व चर्चा करीत होतों, इतक्यांत त्यांना पकडण्यासाठीं वॉरंट घेऊन जिल्ह्याचा पोलीस सुपरिंटेंडन्ट आला. 'तुम्हांला तयार होण्यास किती अवकाश लागेल' असें पोलिसांच्या मुख्य अमलदारानें विचारिलें,

त्याला आदर्श शिपायानें उत्तर दिलें, 'मी तयारच आहें' पण त्यांना आपल्या मित्रांना व मुलांना भेटण्यासाठीं वेळ देण्यांत आला. निरोप देतांना गांधीजींनीं त्यांना आलिंगन दिलें व म्हटलें "खानसाहेब, या वेळीं आपल्याला बचाव करावयाचा आहे हो!" खानसाहेबांना जरा आश्चर्य वाटलें, त्यांनीं विनयपूर्वक म्हटलें, "१९१९ से जो करते आहे हैं वही करना मुझको पसंद पडेगा." गांधीजींनीं सांगितलें; "वह तो मैं समजता हूँ लेकिन इस वक्त अगर हम बाहर रह सके तो जेल नहीं जाना है." त्यावर ताबडतोब खानसाहेबांनीं जबाब दिला. "जैसा आप फरमायेंगे." ही यांची निष्ठा! पण अजूनही या निष्ठेचे दुसरे कित्येक नमुने पहावयास मिळावयाचे होते.

धाकट्या बंधूंबरोबर इतके दिवस एकत्र राहून तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर शंभर दिवसांची सुटी भोगली नाहीं तोंच त्यांच्यापासून दूर होणें वडील बंधूंस फारच जाणवलें. धाकट्या बंधूंनासुद्धां दुःख वाटत नव्हतें असें नाहीं, पण आपल्या मुलांसमोर हें दुःख कसें व्यक्त करावें? मुलें बिचारीं ढळढळ रडत होतीं. मेहरताजला विलायतेहून येऊन एक महिनाही पुरता झाला नव्हता. अलीला डेहराडूनहून येऊन थोडेच दिवस झाले होते. जमनालाल-जींनीं अलीला खानसाहेब पकडले गेल्याची बातमी सांगतांच बिचारा विचारूं लागला. "पण तुम्ही आणि महात्माजी मोकळे आहांत आणि तरीही माझ्या वडिलांना कां पकडलें?" जमनालालजींनीं म्हटलें, "कारण तुझ्या वडिलांनीं मुंबईला राजद्रोही भाषण केलें होते असें म्हणतात." पण राजद्रोह कशाला म्हणतात, हें अलीला काय ठाऊक? तेव्हां त्याला समजेल अशा रीतीनें जमनालालजींनीं राजद्रोह म्हणजे काय हें समजावून सांगितलें, त्यामुळें त्याच्या किंवा त्याच्या बहिणीच्या ज्ञानांत कांहींच भर पडली नाहीं. दोन्हीं मुलें पित्याच्या कुशींत घुसलीं. पित्यानें त्यांना गोड गोड गोष्टी सांगितल्या. तास-भर आम्ही त्यांना एकटेंच सोडून दिलें. सर्वांनीं एकत्र बसून जेवण केलें आणि मुलें हंसत खेळत दूर झालीं. पित्यानें दोघांनाही जमनालालजी व जानकीदेवी यांच्या हवालीं केलें आणि दोघांनाही शूर बनण्यास व संयमी जीवन आचरण्यास सांगून त्यांचा निरोप घेतला.

मात्र एक दुःख त्यांना राहून राहून वाटत होतें खरें. जातांजातां ते म्हणाले,

"मला बंगालमधील मुसलमान बंधूंकडे जावयाचें होतें. तेथें जाऊन त्यांच्यामध्यें राहून काम करावयाचें होतें. आतां त्यांची सेवा कोठून होणार! मला माफ करण्यास त्यांना सांगा." थोडा वेळ थांबून सद्गदित कंठानें ते म्हणाले, "सरहद्द प्रांतांतील लोकांबद्दल तर काय सांगूं? मला पकडलें म्हणून त्या लोकांनीं रागावूं नये किंवा वेडे बनूं नये. सर्व शांतपणें सहन करावें व विधायक कार्य करण्यास लागावें; त्यांनीं आपसांतलीं भांडणें सोडून एक झालें पाहिजे. मला वाईट वाटतें कीं या लोकांत जाऊन त्यांना सुधारण्याची देखील संधि मला मिळाली नाहीं. सरकार आज माझ्या प्रांताला "खुनी प्रांत" म्हणतें, पण या अशिक्षित लोकांना शिक्षण देण्याची किंवा त्यांच्यांत सामाजिक सुधारणा घडवून आणण्याची देखील संधि आम्हांला सरकारनें दिली नाहीं; मग आमचा काय दोष?"

पण हें दुःख देखील क्षणिक होतें. ते मुंबईस जाण्यासाठीं तयार झाले व पोलिसांच्या ताब्यांत गेले तेवढ्यांत या दुःखाची छायाही राहिली नाहीं. जातां जातां जमनालालजी व जानकीदेवी यांना त्यांनीं सांगितलें: "जो खुदाने चाहा सो किया। जितना रोज बाहर रखना था उतना रोज बाहर रखा. अब उसको पसंद है कि मैं अंदर जाके खिदमत करूं. जो उसे पसंद है वह मुझे पसंद है."

इतकें सांगून खानसाहेबांनीं आपल्या खऱ्या घरीं जाण्यासाठीं निरोप घेतला. अबदुल गनीखान यास त्याच्या वडिलांना पकडल्याचें वृत्त दुसऱ्या दिवशीं कळवितांना गांधीजींनीं लिहिलें: "दुःख करूं नकोस. आपणां सर्वांचें जें आज खरें घर आहे तेथें तुझे वडील गेले आहेत."

## प्रकरण चौदावें

# असाधारण निष्ठा

मुंबईच्या हिंदी ख्रिस्त्यांसमोर केलेल्या भाषणाबद्दल त्यांचेवर खटला भरण्यांत आला. तुरुंगांतून सुटल्यावर त्यांनीं मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, बंगाल व मुंबई इत्यादि तीनचार प्रांतांतून प्रवास केला आणि ठिकठिकाणीं भाषणेंही केलीं. हीं सर्व भाषणें निर्दोष असलीं पाहिजेत; कारण मुंबईशिवाय इतर प्रांतांतील सरकारांनीं त्यांच्याविरुद्ध कांहींच आक्षेप घेतला नाहीं. मुंबईतदेखील राष्ट्रीय सभेंत किंवा इतर कोणत्याही ठिकाणीं केलेल्या भाषणासाठीं खानसाहेबांना कोर्टांत उभें करण्यांत आलें नाहीं. हें भाषण भायखळा येथील एका लहानशा ख्रिस्तीमंडळासमोर झालें होतें, त्या वेळीं फार तर पांचशें माणसें हजर असतील. पण सरकारला ही परिस्थिति लक्षांत घेण्याची आवश्यकता वाटली नाहीं. सरकारनें फक्त चालू कायद्याच्या कसोटीवर हें भाषण घासून पाहिलें आणि खानसाहेबांवर खटला भरला.

खानसाहेबांच्या बचावासाठीं वकिलांनीं काम करावें अशी सल्ला गांधीजींनीं दिलीच होती. खानसाहेबांसाठीं उभें राहण्यास कोण तयार होणार नाहीं ? भुलाभाई देसाई आणि कनय्यालाल मुनशी यासारखे वकील व छोटुभाई आणि पकवासा यांसारखे सॉलिसिटर हजर होते, पण गांधीजींनीं असेंही सांगितलें होतें कीं, जर भाषण सरकारच्या राजद्रोहाच्या कायद्यांत येत असेल तर कसल्याही प्रकारचा बचाव न करतां खानसाहेबांनीं एक निवेदन ( statement ) दाखल करावें आणि सविनय कायदेभंगाची चळवळ बंद असतां आणि कायदेभंग करण्याची इच्छा नसतांही अजाणतां कायद्याचा भंग करून तुरुंगवास ओढून घेतल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावी. मुंबईला गेल्यावर खानसाहेबांनीं सरदारांना पुन्हां सांगितलें कीं वकील माझा बचाव करीत आहेत यामुळें माझें काळीज दुभंग होत आहे. तेव्हां सरदारांनीं त्यांचें समाधान केलें. भाषणाची नक्कल मिळतांच सरदार, भुलाभाई, मुनशी वगैरेंच्या सल्ल्यावरून भाई मंगळदास पकवासा

आणि भाई मथुरादास त्रिकमजी हे वर्ध्यास गेले आणि गांधीजींना त्यांनीं सांगितलें कीं, भाषण राजद्रोहाच्या कलमाखालीं आणतां येईल असें आहे. गांधीजींनीं तांबडतोब खानसाहेबांसाठीं निवेदन तयार केलें व खानसाहेबांकरितां पत्र लिहून दिलें. ही गोष्ट थोड्याशा मित्रांखेरीज फारशी कोणाला माहीत नाहीं. पण खानसाहेबांच्या विलक्षण निष्ठेचा नमुना म्हणून जसें घडलें तसेंच येथें देणें जरूर आहे. हें गांधीजींनीं खानसाहेबांस लिहिलेलें पत्र:—

"तुमचें भाषण मीं वाचलें. एवढें लांबलचक भाषण तुम्हीं केलें असेल अशी कल्पना नव्हती. त्यांत कित्येक भाग खात्रीनें असे आहेत कीं, त्यांतील हकीकत खरी असली तरी ते राजद्रोही समजले जातील. भाषणाचा सरकारी तर्जुमा पूर्ण किंवा खरा नाहीं एवढ्यानें मुख्य गोष्टीला बाध येत नाहीं.या सर्व गोष्टींचा विचार करून मीं तुमच्यासाठीं निवेदन तयार केलें आहे. खुदाइ खिदमतगार म्हणून असें एखादें निवेदन तुम्हीं दाखल केलें पाहिजे. राजद्रोहाचे शब्द, नकळत कां होईना, उच्चारल्याबद्दल दिलगिरीचें वाक्य मीं घातलें आहे. आपल्या राष्ट्रीय सभेचें आजचें धोरण तुरुंगवास ओढून घेण्याचें नाहीं, म्हणून या वाक्याची आवश्यकता आहे. म्हणून मला वाटतें तसेंच जर तुम्हांलाही या बाबतींत वाटत असेल तर हें दिलगिरीचें वाक्य जसेंच्या तसें राहूं द्यावें. पण असें करण्यानें सत्याचा विपर्यास होतो असें तुम्हांला वाटत असेल तर तुम्हीं हें वाक्य काढून टाकावें. निवेदन जर तुम्हांला योग्य वाटलें तरच दाखल करावें, नाहीं तर करूं नये. आपण सत्यनिष्ठ असावें आणि सत्यनिष्ठच दिसावें याकरितांच मीं हें केलें आहे."

वरच्या पत्रांत उल्लेखिलेलें निवेदन खालीलप्रमाणें : "माझ्यावर ठेवलेला आरोप मीं वाचला व त्याला जोडलेला माझ्या उर्दू भाषणाचा तर्जुमा पण मीं वाचला. एकंदरीनें पाहतां या तर्जुम्यांत दुरुस्तीला पुष्कळच अवकाश आहे; तरी देखील माझ्या भाषणांत सांगितलेलीं मुख्य वाक्यें खरीं आहेत असें मी कबूल करतों. हीं वाक्यें फौजदारी कायद्याच्या राजद्रोहाच्या कलमाखालीं येण्यासारखीं आहेत अशी माझ्या वकील मित्रांची सल्ला आहे. मी निष्ठावंत

राष्ट्रीय सभावादी आहें; आणि राष्ट्रीय सभेचें आजचें पकडून न घेण्याचें आणि तुरुंगांत न जाण्याचें धोरण मला मान्य आहे, अर्थात् राजद्रोही वाक्यें उच्चारण्याचा माझा इरादा असणें शक्यच नाहीं. म्हणून सरकारच्या दृष्टीनें आक्षेपार्ह असलेलीं वाक्यें माझ्या तोंडून गेलीं याबद्दल मला दिलगिरी वाटते. याबरोबरच मला हेंही सांगितलें पाहिजे कीं ज्या ख्रिस्ती मित्रांनीं मला आपल्यासमोर भाषण करण्यासाठीं बोलाविलें होतें त्यांच्या इच्छेवरून मी त्यांचे समोर खुदाइ खिदमतगारांच्या चळवळीचें वर्णन केलें; त्यांत या चळवळीबद्दलची खरी हकीकत सांगणें हें माझें कर्तव्य होतें आणि तें पार पाडण्याव्यतिरिक्त मीं दुसरें कांहींच केलें नाहीं. कोणाच्या भावना दुखविण्याचा माझा इरादा नव्हताच, हें या भाषणांत मीं माझ्या शाळेच्या इंग्रज हेडमास्तरांची स्तुति केली आहे त्यावरून जाणतां येण्यासारखें आहें. माझें सगळें भाषण वाचल्यावर, सरकारवर आरोप करण्यापेक्षां खुदाइ खिदमतगारांच्या चळवळीच्या निर्दोषतेवरच जोर देण्याचा माझा इरादा होता. याबद्दल कोर्टाला शंका रहाणार नाहीं अशी मला आशा आहे." आपल्यासाठीं गांधीजींनीं निवेदन लिहून पाठविलें आहे व आपल्याला पत्र ही दिलें आहे असें खानसाहेबांना सांगण्यांत आलें. तेवढ्यानें खानसाहेब अगदीं खूष होऊन गेले. त्यांच्या मनावरील भार हलका झाला, त्यांनीं निवेदनावर तात्काळ सही केली. त्यांना सांगण्यांत आलें "खानसाहेब! वाचून तर पहा. सोबतचें पत्रही वाचा. तुम्हांला हें निवेदन बरोबर वाटत असेल तरच तें दाखल करा असें गांधीजींनीं मुद्दाम सांगितलें आहे." खानसाहेबांनीं म्हटलें, "गांधीजींना जें योग्य वाटलें असेल तेंच त्यांनीं लिहिलें असेल कीं नाहीं?" असें म्हणून त्यांनीं पत्र वाचलें, निवेदन वाचलें आणि ते म्हणाले— "बिलकुल ठीक है" सर्वांना आश्चर्य वाटलें. ही विलक्षण निष्ठा पाहून सर्वजण चकित झाले.

पण कोर्टावर या निवेदनाचा किंवा खानसाहेबांच्या सचोटीचा कसलाच परिणाम झाला नाहीं. कोर्टानें कित्येक आक्षेपार्ह वाक्यें निवडून काढलीं, निवेदन उडवून दिलें आणि खानसाहेबांना कायद्याप्रमाणें जास्तींत जास्त देतां येईल तेवढी सजा दिली! तरी देखील या दुःखद घटनेंमधूनही जगाला सत्याग्रहाचा नवा धडा मिळाला, निष्ठेचें नवें दर्शन झालें.

आज खानसाहेब दोन वर्षांची सजा भोगीत आहेत. त्यांच्या भाषणाचें पृथक्करण करण्याची आज आवश्यकता नाहीं. खानसाहेबांस खुदाइ खिदमतगारांच्या चळवळीविषयीं बोलण्यास सांगणें आणि मग सरकारच्या कायद्याचा विचार करून ते बोलतील अशी आशा राखणें हें व्यर्थ आहे. त्यांनीं जें सोसलें आहे, त्यांच्या प्रांतानें जें सहन केलें आहे, त्याचें वर्णन त्यांच्या तोंडांतून निघाल्याशिवाय राहणारच नाहीं. त्यांतूनही सर्व भाषण कोणी वाचून पाहील तर त्याला पठाणांनीं जें सहन केलें आहे तें सांगण्याचा त्यांचा उद्देश होता सरकारची निंदा करण्याचा उद्देश नव्हता, असें आढळून येईल. पण राजद्रोहाचा कायदा सत्यवादीचें रक्षण करीत नसतो. सरकारनें काय काय केलें तें तर त्यांनीं अवश्य सांगितलें, पण " खुदाइ खिदमतगारा " चा धर्मही त्यांनीं उत्तम प्रकारें वर्णिला. एकदोन उतारे येथें देतों.

" प्रत्येक खुदाइ खिदमतगाराला अशी शपथ घ्यावी लागते कीं, मी ख्रिस्ती, हिंदु, पारसी, शीख, जर्मन, फ्रेंच, इंग्रज या सर्वांना ईश्वराचीं लेंकरें मानीन आणि या सर्वांची मी सेवा करीन. ही चळवळ सरहद्द प्रांताचीच नव्हे पण विश्वाची आहे; सरहद्द प्रांतांतील लोकच तेवढे बांधव नव्हेत तर सगळें विश्व हें एक कुटुंब आहे असें मानणारी ती आहे. आम्ही त्यांचें शिक्षण सुरू करतों तेव्हां पहिला धडा हा शिकवितों कीं तुम्हांला सर्व जुलमी लोकांचे जुलूम सहन करावे लागतील आणि मझलूमला* मदत करावी लागेल, मग ते हिंदु असोत, मुसलमान असोत किंवा ख्रिस्ती असोत......हाच खरा धर्म आहे. ख्रिस्ती धर्मांत देखील दुसरें काय आहे? मी एडवर्ड चर्च मिशन हायस्कुलांत शिकलों असल्यामुळें ख्रिस्ती धर्म काय आहे हें मला ठाऊक आहे. माझ्यावर त्या शिक्षणाचा इतका परिणाम झाला कीं आज त्यामुळेंच मी देश व समाज यांचा सेवक बनलों आहे. या शाळेचा मुख्य शिक्षक लंडन येथील एका उमरावाचा मुलगा होता. हा सज्जन गृहस्थ तारुण्यांतच सर्व सुखविलासांवर तिलांजलि देऊन आपला देश सोडून हिंदी लोकांची सेवा

* ' मझलूम ' हा अरबी शब्द ' जुल्म ' यावरून बनला आहे. ' जालिम ' म्हणजे जुल्म करणारा, आणि ' मझलूम ' म्हणजे ज्यावर जुल्म करण्यांत येतो तो.

करण्यासाठीं हिंदुस्थानांत आला होता. या सेवेसाठीं तो पैसा घेत नसे, किंवा त्याला पगारही मिळत नसे. त्याचा सर्व खर्च त्याच्या वडिलांकडून मिळत असे. येशू ख्रिस्त देखील जगांत कशासाठीं आला होता? जगांतील गरीबांची सेवा करण्यासाठींच तो आला होता."

या भाषणांत कडक वाक्यें नाहींत असें नाहीं, पण त्यांचा ध्वनि वेगळाच आहे, त्यांत इंग्रजांबद्दल तिरस्काराचें नांवही नाहीं. शेवटीं देखील सार हेंच आहे कीं, "आपली सरकारविरुद्ध तक्रार किंवा फिर्याद नाहीं, तक्रार आपल्या लोकांबद्दलच आहे. आपल्याच लोकांना समजत नाहीं मग सरकारला आपण काय शिकवणार?" सरकारच्या कृत्यांची त्यांना पुष्कळच चीड आहे पण इंग्रजांबद्दल त्यांना लेशमात्र द्वेष वाटत नाहीं. रेवरंड विग्रम (त्यांचे मिशनरी शिक्षक) यांची स्तुति करण्याला ते कधीं कंटाळतच नाहींत. असा एक सच्चा, नम्र ईश्वराचा सेवक आज तुरुंगांत पडला आहे.

तुरुंगांतून पत्रें लिहितात त्यांतही हीच गोष्ट असतें "खुदाइ खिदमतगारां-विषयीं सांगण्यास मला सांगितलें, मग खऱ्या हकीकतीशिवाय मी दुसरें काय सांगणार?" साबरमती तुरुंगांत त्यांची प्रकृति नीट राहात नसे. त्यांची पंजाब किंवा सरहद्द बाजूच्या तुरुंगांत बदली करण्याबद्दल इन्स्पेक्टर जनरल यांनीं शिफारस केली होती, गांधीजींनींही लिहिलें होतें, पण दोन्ही गोष्टींना सरकारनें नकार दिला. त्याला उद्देशून खानसाहेब गांधीजींना लिहितात "आपकी खिदमतमें मेरी यह अरज है कि आप मेरे हकमें कोइ फिकर न करें, मैं खुदाका एक नाचीझ बंदा हूँ. अगर उसने मेरी बजह से अपनी मखलुक[1] की कुछ खिदमत लेनी है तो उसके लिए मुझे तंदुरुस्त रखेगा महात्माजी, हकीकत यह है कि मुझमें बहुतसी कमजोरियां, जिसको बहार मैं महेसूस करता था, लेकिन उसकी बरदास्त मजबूरी से करता था, अब मैं देख रहा हूँ कि यहां जेलमे आइस्ता आइस्ता बरदास्त हो रही हैं, मेरा बदन कमदोर हो रहा है लेकिन मेरी रुहानी[2] ताकद बढ रही है."

---

१ अरबी शब्द 'खल्क' म्हणजे जग; खालिक म्हणजे उत्पन्न करणारा; मखलुक म्हणजे खालिक खुदानें उत्पन्न केलेली सृष्टि. २ रुहानी ताकदः— आत्मिक शक्ति, मनोबळ.

तुरुंगांत बसल्या बसल्या कोणत्या गोष्टींकडे त्यांचें लक्ष असतें आणि कसल्या गोष्टींत त्यांना गोडी वाटते तें दाखविण्यासाठीं त्यांच्या शेवटच्या पत्रांतील एक उतारा पुरे आहे.

" हिंदी के मुतल्लिक आपका इन्दोर कॉन्फरन्सका रेझोल्यूशन अखबारमें पढकर खुशी हुई। उम्मीद है कि इससे हिन्दुमुसलमानों की गलत फहमीआं[1] रफा हो जायगी।"

गांधीजींबद्दल निर्मल प्रेम व्यक्त करणारा पुढील उतारा देखील अस्थानीं होणार नाहीं.

" मैं कभी कभी आपको ख्वाबमें[2] देखा करता हूं। एक दफा मैंने देखा कि आप और मैं अकेले जा रहे है। आपके पास बकरीका बच्चा है। आगे एक बहुत गहरा पानीका नाला आता है। मैंने आपको कहा कि आप थक गये है। अब बच्चा मुझे दें। आपने दे दिया। जब नाला पार करके उपर चढे तो सामने एक शहर नझर आया। दोनों उसमें दाखल हुए। मैंने आपसे नमाझकी इजाजत ली और जब नमाझ से फारेग होकर आपके पास वापस आता था तो आंखे खुल गईं।"

आपलीं मुलें साधेपणांत वाढावीं, लहानपणापासून राष्ट्रीय भावनांचें त्यांच्यांत पोषण व्हावें, मोठी कमाई करण्यापेक्षां त्यांनीं देशाची सेवा करावी ही त्यांची अभिलाषा आहे. तुरुंगांत जातेवेळीं देखील मुलांना हाच संदेश देऊन ते गेले. तुरुंगांतूनही गांधीजींना हाच संदेश ते वारंवार पाठवितात: " महेरताज देहली में है या दाक्तरसाहेब के साथ सरहद को चली गई है? मैं उसको सादा जिंदगी और सादा लेबास में चाहता हूं, गनी मुस्तकिल[3] मिज़ाज नहीं, बातें बहूत और अमल कम करता है। उम्मीद है कि आपकी तवज्जहसे[4] इसलाह[5] हो जाय।"

शेवटच्या उताऱ्यांत फिरून गांधीजीबद्दलचें निर्व्याज प्रेम दिसून येतें: "महात्माजी, मुझे अपनी दुवामें याद रखें कि खुदाबंद ताला मुझे सबर[6] और इस्तकलाल[7] दे और इस लायक बना दे कि उसकी मखलूक की खिदमत कर सकूं।"

---

१ गलत फहमीआं: = गैरसमजुती. २ ख्वाब = स्वप्न. ३ स्थिर. ४ लक्ष, काळजी. ५ सुधारेल. ६ धैर्य. ७ दृढता.

गेल्या मे महिन्याच्या शेवटच्या तारखेस सरदार व गांधीजी त्यांना तुरुंगांत भेटून आले. त्यानंतर मीं सरदारांना खानसाहेबांचा समाचार विचारला. सरदारांनीं एका वाक्यांत सर्व समाचार सांगितला : "बापूजीवरील निष्ठेंत खानसाहेबांवर सरशी करील असा एकही इसम मला तरी माहीत नाहीं."

हें पुस्तक छापण्यास जाणार त्याच दिवशीं * मी या फकीर ऋषीचें दर्शन साबरमतीच्या तुरुंगांत घेऊन आलों. त्यांच्याबरोबर मीं एक तास संभाषण केलें. पण त्यांनीं राजकारणाविषयीं किंवा अशाच इतर गोष्टींबद्दल इशारासुद्धां दिला नाहीं. फक्त आपलीं मुलें संयमी व त्यागी कशा रीतीनें होतील याबद्दलचें त्यांचें बोलणें चाललें होतें आणि निघतांना त्यांनीं एवढेंच मागितलें : "महात्माजीसे कहिए कि अपनी बंदगी में मुझे याद रखें, और दिलसे दुवा दें कि मेरी दुन्यवी ख्वादिशें सब दब जाय, इस नाचीझ बदनके लिए मुझे कोइ परवा न रहे, और मेरी रुहानी ताकत हमेशा बढती रहे।"

हा महापुरुष आज ब्रिटिश सरकारचा बंदी आहे. त्यांचे वडील बंधु असेंब्लीमध्यें आहेत. पठाण व सरहद्द प्रांत याविषयीं ते प्रश्न विचारतात, व आपलें हृद्गत सरकारला व जगाला जाहीर करतात. दोघांनींही अहिंसेचा स्वीकार केला आहे, दोघांनाही तिच्या पुनरुद्धाराचीं स्वप्नें दिसत असतात.

ईश्वर दोघांही बंधूंना दीर्घायु करो.

REFBK-0005450

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ५४५०
शाखा (प्रथम प्रत)

* ता. १०-८-३५.